


म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भूप्रवास
सं. क्र. ७७५

REFBK-0027772



REFBK-0027772

# हाय अमेरिका...

वर्षा पुराणिक

□ **प्रकाशक**
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

□ **टाईपसेटिंग**
माधव बापट
न्यू वे टाईपसेटर्स अॅन्ड प्रोसेसर्स
डी-१०२, सुनिता अपार्टमेंटस्,
१४१७/१८, कसबा पेठ, पुणे ४११ ०११

□ **मुद्रक**
प्रमोद विष्णू बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०

□ **मूल्य**
चाळीस रुपये

□ **प्रकाशन दिनांक**
१५ डिसेंबर १९९३

**Varsha D. Puranik**
□ © 151, Jennifer Lane,
Bala Cynwyd, Pa. 19004
Tel.: (215) 667 - 6665

# प्रस्तावना

माझे "फणसवाडी ते फिलाडेल्फीया" हे पुस्तक यावर्षीच प्रसिद्ध झाले. अमेरिकेबद्दल अधिक माहिती देणारे हे दुसरे पुस्तक माझ्या स्नेह्यांच्या सांगण्यावरून लिहीत आहे. मागचे पुस्तक काहीसे आत्मकथनात्मक असले तरी ते माहिती देण्याकरताच पण वेगळ्या पद्धतीने लिहिले आहे. माझ्या आयुष्यात घडलेला फक्त इतकाच भाग घेतला आहे की ज्याचा मला अमेरिकेत गेल्यावर फार उपयोग झाला. अमेरिकेत गेल्यावर आलेले स्वानुभवही एवढेच घेतले आहेत की त्यांतून अमेरिकेतील आयुष्याची वाचकांना थोडीफार तरी कल्पना यावी. "फणसवाडी ते फिलाडेल्फीया" हे पुस्तक लिहिण्याचा उद्देशच तो होता. वैयक्तिक सुख-दु:ख लिहिणे हा नव्हता. अमेरिकेला जायचे ठरवल्यापासून ते आतापर्यंत माझ्या आयुष्याचा प्रवाह अंतर्बाह्य ढवळून निघाला. त्याबद्दल विस्तृतपणे माहिती इतरांना दिली पाहिजे, या सूचनेवरून हे पुस्तक लिहीत आहे. यांतील अनुभव माझे एकटीचे नाहीत. ज्या लोकांचा काहींना काही कारणाने परिचय झाला, त्यांच्याशी बातचीत झाली, ते अनुभवही येथे घेतले आहेत. अगदी त्रयस्थाच्या तटस्थ भूमिकेवरूनच हे सर्व लिहीत आहे.

अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्यांच्या माहितीसाठी हे पुस्तक आहे. त्यात परदेशात गेल्यावर आलेले स्वानुभव आणि दुसऱ्यांचे अनुभव यांचा उपयोग केला आहे. त्या जीवनातील मला आवडलेल्या, पटलेल्या गोष्टी आहेत तशाच न आवडलेल्या न पटलेल्या गोष्टीही आहेत. त्यातील प्रत्येक गोष्ट सर्वांना पटावी अशी माझी अपेक्षा नाही. काही गोष्टी पटूनही मला स्वत:लाही जमल्या नाहीत. अमेरिकेत जाणाऱ्या भारतीय मित्रांना काही मित्रत्वाच्या सूचनाही यात केल्या आहेत. ज्यांचा मला निश्चितच आयुष्यात उपयोग झाला. अशा या गोष्टी इतरांनाही उपयुक्त ठरतील. वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांच्यात वावरताना मला आपल्यातले काही दोषही दिसले. ते सुधरायचा मी कसोशीने प्रयत्न केला. अर्थात सर्वस्वी सफल झाले असे नाही. या पुस्तकाच्या रूपाने मला मिळालेली व मिळवलेली अनुभवांची शिदोरी वाचकांसमोर उघडत आहे. ज्याला जे आवडेल, भावेल ते त्याने घ्यावे. बाकीचे सोडून द्यावे.

**– वर्षा पुराणिक**

श्रेयनिर्देश :
शंकर सारडा
अनिल बळेल



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# पासपोर्ट व्हिसा

परदेशात जायचे असेल तर दोन अति महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे पासपोर्ट व व्हिसा. पासपोर्ट हा आपल्याच म्हणजे आपण ज्या देशाचे नागरिक त्या देशाचा असतो. तो पासपोर्टच्या ऑफिसमध्ये मिळतो. तो मिळण्याकरिता निदान दोन महिन्यांचा अवधी लागतो. पासपोर्टवरून आपण कुठच्या देशाचे नागरिक आहोत ते कळते. त्यामुळे एखाद्याबद्दल संशय आल्यास प्रथम पासपोर्ट तपासला जातो. विशिष्ट देशाचा नागरिक असल्याचा कुठल्याही देशात प्रमाण मानण्याता येणारा हा नागरिकत्वाचा पुरावा आहे. त्यामुळे तो अतिशय सांभाळून ठेवावा लागतो. पासपोर्टशिवाय कुठच्याही देशात प्रवेश मिळत नाही. गुन्हेगारीची अथवा अन्य पोलीस केस नसेल तर कोणालाही तो मिळू शकतो. त्याविषयीची अन्य माहिती पासपोर्ट ऑफिसमध्येच मिळू शकते. किंबहुना कुणीतरी सांगितलेल्या माहितीवर संपूर्णपणे विसंबून न राहाता त्या ऑफिसचीच मदत घ्यावी, कारण नियम बदलले असण्याची शक्यता असते.

व्हिसा म्हणजे ज्या देशात आपल्याला जायचे, त्या देशातील सरकारने त्या देशात प्रवेश करण्यास आपल्याला दिलेली परवानगी. व्हिसा असल्याशिवाय आपल्याला त्या देशात प्रवेश मिळू शकत नाही. आपण कोणत्याही मार्गाने दुसऱ्या देशात प्रवेश करा. मग तो विमानाने, आगगाडीने, बोटीने, मोटारीने वा अन्य कुठच्या वाहनाने असो, वा पायी असो, प्रवेश करण्याच्या सीमेवर कस्टमचे अधिकारी

असतात. ते प्रथम आवश्यक ती कागदपत्रे (व्हिसा व पासपोर्ट) पाहातात. ते खरे असल्याची खात्री करून घेतात. मग सामानाची तपासणी होते प्रत्येक देशाचे सामान आणण्याबद्दलचे नियम वेगवेगळे असतात. त्याबद्दलची माहितीही त्या देशाच्या आपल्या देशात असणाऱ्या प्रातिनिधिक ऑफिसमध्ये मिळू शकते.

पोलिस क्लिअरन्स सर्टिफिकेट – पोलिसांकडे गुन्ह्याची काही नोंद झाली असल्यास हे सर्टिफिकेट अर्थातच मिळणार नाही. किंबहुना त्याची माहिती (व्यक्तीने गुन्हा केला असल्यास) मिळण्याकरिताच या सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट – व्हिसाकरिता अर्ज केलेल्या व्यक्तीने आपल्या देशाचा आयकर भरला नसल्यास त्याला / तिला तो देश सोडण्यास परवानगी मिळणार नाही.

व्हिसा मिळण्याकरिता जन्मदाखला वगैरे कागदपत्रे लागतात. प्रत्येक देशात दुसऱ्या देशांचे प्रातिनिधिक ऑफिस असते. त्या ठिकाणीच जाऊन व्हिसाची सर्व माहिती मिळवावी. कुणाला व्हिसा मिळू शकेल त्याबद्दलची माहिती त्या देशाच्या दूतवासात मिळते. कॉन्स्युलेट हे त्या देशाच्या सरकारचे ऑफिस असते. कुणाला आपल्या देशात येऊ द्यायचे त्याबद्दलचे कायदे प्रत्येक देशाचे वेगळे असतात. जरूरीप्रमाणे ते बदलत असतात. या बदलाची सर्वांत ताजी माहिती या ऑफिसमध्येच मिळू शकते. व्हिसा मिळण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहितीही त्याच ठिकाणी मिळते. काही देशांतील लोकांना दुसऱ्या काही ठराविक देशांत जाण्यासाठी व्हिसा लागतच नाही. उदा., भारतीय नागरीकाला नेपाळमध्ये जायला व्हिसा लागत नाही. अमेरिकन नागरिकाला कॅनडा या देशांत जायला व्हिसा लागत नाही व कॅनडातील नागरिकालाही अमेरिकेत यायला व्हिसा लागत नाही. भारतीय नागरीक अमेरिकेला भेट देण्याकरता येतात, त्यावेळी त्यांनी कॅनडाचाही multy entry visa (एकापेक्षा जास्ती वेळा भेट देण्याची परवानगी) घ्यावा. म्हणजे नायगारा फॉल बघायला जाताना वगैरे अडचण येणार नाही. हा फॉल अमेरिकन बाजूकडून दिसतो व कॅनडाच्या बाजूने वेगळ्या आकाराने दिसतो. आणि तो फॉल (धबधबा) पाहिल्याशिवाय अमेरिकेची ट्रीप पूर्ण होत नाही. आणखीही काही व्हिसाधारकांना अमेरिकन/कॅनडियन हद्द पार करण्याची परवानगी नाही. भेट देणाऱ्यांनी त्याची आधी चौकशी करून मगच जावे. युरोपियन देशांतही तसेच आहे. मात्र हेही नियम मधून मधून बदलत असल्याने आधीच त्याबद्दल चौकशी करावी.

जरुरीचे सर्व कागदपत्रे तयार झाल्यावर (व्हिसा करता जी तारीख मिळालेली असते, त्याआधीच सर्व कागदपत्रे तयार करावी लागतात नाहीतर व्हिसा मिळत नाही) ठरलेल्या तारखेला व्हिसा मिळतो. व्हिसा मिळेल की नाही हा पहिला प्रश्न. तो मिळायला लागणारा वेळ हा दुसरा प्रश्न. प्रत्येक व्हिसाची कारणे वेगळी असतात. कोणत्या प्रकारच्या लोकांना आधी व्हिसा द्यायचा व कोणत्या लोकांकरता वेळ लागला तरी चालेल या बाबतीत त्या त्या देशाचे धोरणं वेगळे असते. हे धोरण त्या देशाची त्यावेळी जी गरज असेल त्याप्रमाणे ठरते. गरजच बदलली तर धोरण बदलूही शकते. पण काही सर्वसाधारण नियम आहेतच. अमेरिकेत (कदाचित जगातील कोणत्याही देशात) अमेरिकेचे नागरिकत्व असेल तर नवरा / बायको (Spouse) वेगळे जास्त काळ ठेवत नाहीत. त्याचप्रमाणे लग्न न झालेली मुले, एकवीस वर्षांच्या आतील असतील तर त्यांनाही व्हिसासाठी प्राधान्य मिळते. म्हणजे त्या लोकाचं काम लवकरात लवकर केलं जातं.

त्यानंतरच महत्त्व Permanent resident किंवा Green cardholder म्हणजे ज्यांच्याकडे कायम राहाण्याच्या व्हिसा आहे. त्यांचे Spouse (नवरा / बायको) व लग्न न झालेली २१ वर्षांखालील मुले यांना दिले जाते.

नंतर २१ वर्षांवरील लग्न न झालेली मुलं/मुली येतात. त्यानंतर अमेरिकन नागरिकत्त्व असलेल्यांची लग्न झालेली मुलं /मुली यांचा नंबर लागतो. अमेरिकन नागरीकाच्या भावा-बहिणीचा या कौटुंबिक व्हिस्यामध्ये शेवटचा क्रमांक आहे.

नोकरीनिमित्ताने येणाऱ्यांकरिता सुद्धा गरजेप्रमाणे अग्रक्रम आहेत.

व्हिझिटर व्हिसा म्हणजे नुसतच थोडे दिवसांकरता नातेवाईकांना भेटण्याकरता किंवा देश पाहाण्याकरता येऊन जायचे असेल तर व्हिसा मिळायला वेळ लागत नाही. पण आजकाल खूप लोक, फक्त भारतातूनच असं नाही तर इतरही अनेक देशांतून प्रवासाला म्हणून येतात. किंवा आणखी काही कारणांनी येतात व परत जातच नाहीत. त्यामुळे कॉन्सुलेटमधील लोकांना जर संशय आला की हा माणूस किंवा ही बाई परत मायदेशी जाणार नाही तर ते व्हिसा देणार नाहीत. कधी ते तसं स्पष्ट कारण सांगतील तर कधी सांगणारही नाहीत.

त्याबाबतीत एक उदाहरण सांगते. माझ्या आईवडिलांना १९७८ साली व्हिझिटर व्हिसा मिळायला थोडा त्रास झाला. वडील रिटायर झालेले होते. आईही सर्वसाधारणपणे साठ वर्षांच्या आसपास होती. ती दोघेही माझ्या भावाजवळ

राहणारी होती. आपल्या भारतीय पद्धतीत आई-वडील बहुधा मुलांकडेच राहातात. मुलीकडे राहात नाहीत ही पद्धत अमेरिकन लोकांना ठाऊक नाही. त्यामुळे अमेरिका कितीही आवडली तरी मुलाकरता ती दोघं परत जातील हे आम्हाला माहीत असलं तरी कॉन्सुलेटमधील अमेरिकन लोकांचा त्यावर विश्वास बसायला वेळ लागला.

अशाप्रकारे नियम बदलत असतात. आमचेच उदाहरण द्यायचे झाल्यास श्री. पुराणिकांनी जानेवारी १९७२ मध्ये माझ्याकरता व मुलांकरता पेपर्स फाईल केले. मे महिन्यात मला व्हिसा मिळून मी अमेरिकेत गेले. आम्ही कायमचा व्हिसा म्हणजे ग्रीन कार्ड घेऊन आलो. त्यानंतर काही वर्षांनी परिस्थिती बदलली. मागे उल्लेखिल्याप्रमाणे त्या बदलाचे कारण कळायला वेळ लागला. नवरा / बायको यांना (spouse) झटकन् व्हिसा मिळतो याचा काही चलाख लोकांनी फायदा घेतला. त्यासाठी तात्पुरते लग्न करायचे आणि व्हिसा मिळवायचा, असे प्रकार सुरू केले. भारतातच नाही तर इतरही काही देशांत असे प्रकार घडले. त्यामुळे आता ग्रीन कार्ड असलेल्यांच्या स्पाऊसना व्हिसा मिळायला किमान दोन वर्षे लागतात. त्याही इंटरव्ह्यूच्यावेळी त्यांना संशय आल्यास दोघांना (नवरा/बायको) दोन खोल्यांत वेगवेगळे नेऊन असे प्रश्न विचारतात की दोघे नवरा-बायको म्हणून एकत्र राहिली आहेत की नाहीत हे त्यांना सहज कळू शकते. उदा., तुमच्या बेडरूमला किती खिडक्या आहेत किंवा कुठच्या बाजूला आहेत, फर्नीचर कसले आहे वगैरे प्रश्न विचारतात दोघांची उत्तरे जमली नाहीत तर साहजिकच पितळ उघडे पडते.

एकंदरीत अशा प्रकारची उदाहरणे शेकडेवारीत फार नसली तरी बाकीच्याही लोकांना त्याचे परिणाम भोगायला लागतातच.

अमेरिकन नागरिकत्व असलेल्या माणसाच्या स्पाऊसला व्हिसा सहा महिन्यांत (सध्या) मिळू शकतो. पण प्रत्यक्ष ग्रीन कार्ड २ वर्षांनी हातात मिळते. म्हणजे त्या दोन वर्षांत ते अजूनही नवरा-बायकोच असतील तरच ते मिळते. कारण परत तेच आहे. लग्न green card साठी केले आहे की खरेच संसार करायचा आहे म्हणून केले हे तोपर्यंत स्पष्ट झालेले असते.


या व्हिस्याचे ५/७ प्रकार असतात. त्याविषयी सविस्तर माहिती त्या देशाच्या Consulate मध्येच मिळते. त्यात Student Visa म्हणजे ज्या कुणाला तिकडे जाऊन काही शिकायचे असेल त्यांना हा Visa घ्यावा लागतो. काही विद्यार्थी तिकडच्या युनिव्हर्सिटीची स्कॉलरशिप मिळवून तिकडे जातात. त्यांची तिथली

राहाण्याची / जेवणाची सोय असते. म्हणजे राहाण्या/जेवण्याला एका माणसाला पुरेल इतके पैसे त्यांना मिळतात. त्यांच्या फीचा खर्च पण युनिव्हर्सिटी करते. काही exchange student म्हणून जातात. आपल्या काही विद्यार्थ्यांना तिकडची काही कुटुंबे Sponser करतात, व आपली काही कुटुंबे आपल्या देशात परदेशातील काही मुलांना Sponser करतात. Sponser म्हणजे ही कुटूंबे त्या मुला/मुलींच्या आपल्या देशांतील होणाऱ्या सर्व खर्चाची हमी घेतात. अर्थात हा खर्च करणं हे सधन माणसाचेच काम आहे. अमेरिकन Visitor Visa घेऊन फक्त फिरायला किंवा भेटायला जायचे असले तरी त्याला कुणीतरी Sponser करावे लागते. या Sponser पत्राचा format म्हणजे पत्राची पद्धत ठरलेली असते. त्यात साधारणपणे असे लिहिलेले असते कि "त्या माणसाचा अमेरिकेत येणारा सर्व खर्च मी करीन. तो खर्च म्हणजे खाणे/पिणे आजारपण आणि मृत्यूचासुद्धा त्यांच्यात उल्लेख असतो (in case of sickness or death) अमेरिकेत Sickness म्हणजे गंभीर आजारपण असेल तर फारच खर्चाची गोष्ट आहे. साधा ताप, सर्दी, खोकला वगैरेला over the counter drugs म्हणजे अगदी ग्रोसरीच्या दुकानात जाऊन सुद्धा काही औषधे मिळतात. ही औषधे आणायला डॉक्टरची परवानगी (Prescription) लागत नाही. केमिस्टकडेसुद्धा जाऊन ती नुसतीच मागता येतात. काही औषधांना मात्र डॉक्टरांची परवानगीच लागते. ही सर्वच औषधं एकंदरीत बरीच महाग असतात. व दुखणं त्याही पलिकडे असेल तर हॉस्पिटलमध्येच ठेवले जाते आणि मग येणाऱ्या पाहुण्याचा इंशुअरन्स नसेल तर ज्याने स्पॉन्सर केले असेल त्याच्यावर फार कठीण परिस्थिती येते. त्यामुळे घरी पाहुणा जेवा-खायला राहायला आलेला खूप आवडतो. पण आजारपणाची भीती वाटते. आता अमेरिकेला visitor's insurance निघाले आहेत.

या प्रत्येक व्हिस्यांना काही मर्यादा असतात. ते आपल्याला Consulate च्या ऑफिसमध्येच मिळतात. थोडीशी कल्पना मी देऊ शकते. Permanent Resident म्हणजे Green Card म्हणजेच ज्याला कायमचे अमेरिकेत राहायची परवानगी मिळते त्याला जवळ जवळ नागरिकत्त्वाच्या सुखसोयी असतात - मताधिकार नाही. काही सरकारी नोकऱ्या पण मिळत नाहीत. काही व्हिस्यांना काही तास नोकरी करायला परवानगी मिळते. काहींना पूर्ण वेळ नोकरी किंवा धंदा करायला मिळतो. Business Visa म्हणजे धंदा करण्याकरताच दिला जातो. असे

अनेक प्रकार आहेत. प्रत्येक व्हिस्याची माहिती नीट समजाऊन घेणे आवश्यक आहे. काही शंका असल्यास अमेरिकन कॉन्सुलेटला फोनही करता येतो. नियम काटेकोरपणे पाळले जातात. ते तसे पाळले गेल्यामुळेच सामान्य जीवन सुखाचे जाते.

अमेरीकन वकिलातीचा मुंबई येथील पत्ता :
ॲम्बेसी ऑफ यु एस् ए
लींकन हाऊस, ७८, भुलाभाई देसाई रोड,
मुंबई.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७७५
सं. क्र. २०७७२
२२।१२।९२
ग्रंथ शाखा (स्टेशन शाखा)

# परदेशगमन

व्हिसा व पासपोर्ट हे दोन्ही हातात मिळाले. म्हणजे ट्रॅव्हल एजन्टकडून तिकीट काढता येते. बरेचसे ट्रॅव्हल एजन्ट तिकिटाचा दरही कमी करून देतात. पासपोर्ट व व्हिसा मिळण्याकरितासुद्धा ते बरेच वेळा मदत करतात. पण कुणीही व कितीही मदत केली तरी स्वावलंबनांसारखा दुसरा चांगला मार्ग नाही. पासपोर्ट अथवा व्हिसा यांचे फॉर्मस् भरताना कुणावरही विसंबून राहू नये. स्वतः त्यांचा अर्थ समजावून घ्यावा. समजत नसेल तर सर्वात उत्तम उपाय म्हणजे त्या ऑफिसमध्येच (पासपोर्टचे प्रश्न त्यांच्या ऑफिसमध्ये व व्हिसाचे प्रश्न व्हिसाच्या ऑफिसमध्ये) जाऊन विचारावे. त्यात अनेक नियम लिहिलेले असतात. त्यांची चांगली माहिती करून घ्यावी. समजायला किंवा लक्षात ठेवायला कठीण जात असेल तर आपल्या भाषेत किंवा शब्दांत लिहूनच काढावी. म्हणजे परत कुणाला विचारायची जरून भासणार नाही. प्रथम जाणाऱ्यांना लागू असणाऱ्या अनेक नियमांची माहिती याच ठिकाणी मिळू शकते. प्रत्येक अडचणीला पर्याय आहेतच. त्याची माहिती करून घेऊन त्याप्रमाणे वागणे हे आपले काम आहे. प्रत्येकजण वेगवेगळ्या कारणाने म्हणजेच निरनिराळ्या व्हिसाने जात असल्याने कुणी काही स्वतःचे वेगळे अनुभव सांगितले तरी घाबरून न जाता त्याची पुरी माहिती करून घ्यावी. नियमही बरेच बदलतात. तर ऑफिसमध्ये जाऊन विचारायला किंवा फोन करायला संकोच करू नये. त्याची भारी किंमत द्यावी लागते.

ट्रॅव्हल एजन्ट माहीत नसेल तर प्रत्यक्ष विमान कंपनीला फोन करून आपल्या तिकिटाचे बुकिंग करता येणे. त्यांच्याहीकडे बऱ्याच गोष्टींची माहिती असते, काही ठराविक व्हिस्यांकरता आपले भारतीय सरकार Foreign Exchange म्हणजे परकिय चलन देते ते किती द्यायचे याचेही नियम ठरलेले असतात. पण ते वेळोवेळी बदलतात. आपल्या रिझर्व्ह बँकेतही ही माहिती मिळू शकेल. ते कधी घ्यायचे त्याची माहितीही त्यांनाच विचारावी. बहुधा ती एअरपोर्टवरच मिळते.

परदेशी पोहोचल्यावर विमानतळावर कोणी स्वागताला वा न्यायला येणार आहे किंवा नाही याची खात्रीलायक माहिती काढावी. अनेकांचे अनेक प्रॉब्लेमस् झालेले मी पाहिले / ऐकले आहेत. चूक कुणाचीही असेल पण सर्व विमानतळ स्वत:भोवती गरगर फिरते, असे वाटू लागते. आधीच आपल्या देशापासून लांब आल्याने मनाची काहीशी विचित्र परिस्थिती झालेली असतेच. पैसेही तसे कमीच असतात. अशा वेळी मन शांत ठेवावे. परिस्थिती आणीबाणीची आहे असे त्यावेळी तरी वाटते. म्हणूनच मनाचा समतोल ढळू देऊ नये कारण त्यामुळे आपण आणखीच काहीतरी चूक करून बसतो. एअरपोर्टवर फोन असतात. पुष्कळवेळा आपल्याला न्यायला येणारा माणूस निघालेला असतो व ट्रॅफिक जॅम म्हणजे रस्त्यावरील रहदारीत अडकलेला असतो. काही गैरसमजूत झाली असण्याचीही तितकीच शक्यता असते आणि म्हणूनच फ्लाईट नंबर, एअर लाईनचे नाव, तारीख, वेळ या गोष्टी अगदी स्पष्ट कळवाव्या लागतात. पुष्कळ वेळा असेही होते की आधी एकमेकांना कधी पाहिलेले नसते. कुणाच्यातरी ओळखीने हे ठरलेले असते. अशावेळी जमल्यास एकमेकांना सर्वांत ताजा फोटो पाठवावा. तो जमणार नसेल तर कुठच्या रंगाचा व कुठचा ड्रेस दोघांनी घातला आहे, ते एकमेकांना कळवावे म्हणजे एअरपोर्टवर ओळखणे सोपे पडते. आपल्याला आणायला येणारं माणूस स्वत:च कुठून बाहेरगावाहून येणार असेल तर मात्र यापेक्षा गंभीर प्रश्न येऊ शकतात. त्याकरिता त्याच गावात राहाणाऱ्या आणखी कुणाचं नाव व फोन माहीत असणं आवश्यक असतं.

सध्याच्या नियमाप्रमाणे माझ्या माहितीप्रमाणे एका माणसाला दोन मोठ्या बॅग्ज् व एक हॅंडबॅग इतके सामान विमानातून नेण्याची परवानगी आहे. पण हेही नियम बदलतच असतात. त्यामुळे तिकिट विकत घेताना ट्रॅव्हल एजंटला ते स्पष्ट विचारून घ्यावे. तरीही शंका असल्यास एअर लाईनलाच फोन केला तरी चालतो.

अमेरिकेत फळे, भाज्या, अन्नपदार्थ वगैरे नेण्याचे काही नियम आहेत. इतरही काही नियम आहेत. त्यांची माहिती कॉन्सुलेट ऑफिसकडूनच मिळवावी. बाकीच्या देशांच्या बाबतीतही तेच करावे. विमानतळावर प्रवाशांशिवाय आणखी कुणालाही प्रवेश मिळू शकत नाही. प्रवासी आत गेला की मग त्याच्याशी परत संबंध येत नाही. अर्थात तो प्रवासी स्वत: बाहेर येऊ शकतो. पण विमानतळाच्या बिल्डिंगच्या बाहेर खूप लोकांनी गर्दी केल्यास उतारूंसकट सर्वांनाच फार त्रास होतो. एका उतारूच्या तीन बॅग्ज असतात. तीन-चार उतारू एकदम प्रवास करीत असतील तर त्यांचे किती सामान असेल व ते हलवणे किती जड असेल याची कल्पना करावी म्हणजे काही काम नसताना तिथे जाणे म्हणजे किती गैरसोय होते याची कल्पना येईल. माझ्या दृष्टीने याला अपवाद फक्त जवळचे सख्खे नातलग म्हणजे आई-वडील, बहिण-भाऊ किंवा स्वत:चा मुलगा-मुलगी हे होत. अर्थात यात नवरा/बायको ही पण आलीच. बाकीच्या लोकांनी जाणाऱ्या माणसाला घरीच निरोप दिला तर चांगले.

प्रवाशाने विमानतळाच्या बिल्डिंगमध्ये आपले सामान व योग्य कागदपत्रांसह प्रवेश केला की आपण ज्या एअरलाईनने जाणार आहोत तो काऊंटर शोधावा. घरून निघण्याआधी विमान वेळेवर निघणार आहे की नाही त्याची चौकशी करावी. किती तास आधी विमानतळावर जायचे याचीही चौकशी करावी लागते. आपल्या काउंटरपाशी गेल्यावर मोठ्या बॅग्ज, पासपोर्ट व तिकीट काऊंटरच्या माणसाकडे द्यावी लागतात. ते बॅगवरती नंबर टॅग लावतात. त्याच टॅगचा त्याच नंबराचा दुसरा भाग ते तुमच्याकडे देतात. आपल्या मुक्कामावर बॅग उतरवून घेताना बऱ्याच बॅग्ज सारख्या दिसतात व आपल्यालाच कधी कधी गोंधळल्यासारखे होते. त्यावेळी हा नंबर उपयोगी पडतो. शिवाय कुणालाही बॅगविषयी संशय आल्यास हा नंबर दाखवता येतो. आपली हॅंडबॅग सोडून बाकीचे सामान एअरलाईनच्या ताब्यात देण्याच्या या कामाला Luggage check in म्हणतात. ते झाल्यानंतर एअरपोर्ट टॅक्स (सध्या ३०० रुपये) भरावा लागतो. परकीयचलन (exchange) घेऊन झाले नसेल तर तिथल्याच बॅंकेच्या काऊंटरपाशी जाऊन घ्यावे, व मग परत बाहेर येऊन आपल्या मंडळींना भेटायचे असेल तर भेटता येते. आपली हॅंडबॅग कधीही, कुठेही हातातून खाली ठेवू नये. अनोळखी माणसाकडून कोणतीही वस्तू भेट म्हणून घेऊ नये. असे सुरक्षिततेचे नियम आहेत. आणखीही काही आहेत. त्यांची रीतसर माहिती करून घ्यावी. आपल्या मंडळींना निरोप देऊन मग आत गेल्यावर बाकीच्या

ट्रॅव्हल एजन्ट माहीत नसेल तर प्रत्यक्ष विमान कंपनीला फोन करून आपल्या तिकिटाचे बुकिंग करता येणे. त्यांच्याहीकडे बऱ्याच गोष्टींची माहिती असते, काही ठराविक व्हिस्यांकरता आपले भारतीय सरकार Foreign Exchange म्हणजे परकिय चलन देते ते किती द्यायचे याचेही नियम ठरलेले असतात. पण ते वेळोवेळी बदलतात. आपल्या रिझर्व्ह बँकेतही ही माहिती मिळू शकेल. ते कधी घ्यायचे त्याची माहितीही त्यांनाच विचारावी. बहुधा ती एअरपोर्टवरच मिळते.

परदेशी पोहोचल्यावर विमानतळावर कोणी स्वागताला वा न्यायला येणार आहे किंवा नाही याची खात्रीलायक माहिती काढावी. अनेकांचे अनेक प्रॉब्लेमस् झालेले मी पाहिले / ऐकले आहेत. चूक कुणाचीही असेल पण सर्व विमानतळ स्वत:भोवती गरगर फिरते, असे वाटू लागते. आधीच आपल्या देशापासून लांब आल्याने मनाची काहीशी विचित्र परिस्थिती झालेली असतेच. पैसेही तसे कमीच असतात. अशा वेळी मन शांत ठेवावे. परिस्थिती आणीबाणीची आहे असे त्यावेळी तरी वाटते. म्हणूनच मनाचा समतोल ढळू देऊ नये कारण त्यामुळे आपण आणखीच काहीतरी चूक करून बसतो. एअरपोर्टवर फोन असतात. पुष्कळवेळा आपल्याला न्यायला येणारा माणूस निघालेला असतो व ट्रॅफिक जॅम म्हणजे रस्त्यावरील रहदारीत अडकलेला असतो. काही गैरसमजूत झाली असण्याचीही तितकीच शक्यता असते आणि म्हणूनच फ्लाईट नंबर, एअर लाईनचे नाव, तारीख, वेळ या गोष्टी अगदी स्पष्ट कळवाव्या लागतात. पुष्कळ वेळा असेही होते की आधी एकमेकांना कधी पाहिलेले नसते. कुणाच्यातरी ओळखीने हे ठरलेले असते. अशावेळी जमल्यास एकमेकांना सर्वात ताजा फोटो पाठवावा. तो जमणार नसेल तर कुठच्या रंगाचा व कुठचा ड्रेस दोघांनी घातला आहे, ते एकमेकांना कळवावे म्हणजे एअरपोर्टवर ओळखणे सोपे पडते. आपल्याला आणायला येणारं माणूस स्वत:च कुठून बाहेरगावाहून येणार असेल तर मात्र यापेक्षा गंभीर प्रश्न येऊ शकतात. त्याकरिता त्याच गावात राहाणाऱ्या आणखी कुणाचं नाव व फोन माहीत असणं आवश्यक असतं.

सध्याच्या नियमाप्रमाणे माझ्या माहितीप्रमाणे एका माणसाला दोन मोठ्या बॅग्ज् व एक हँडबॅग इतके सामान विमानातून नेण्याची परवानगी आहे. पण हेही नियम बदलतच असतात. त्यामुळे तिकिट विकत घेताना ट्रॅव्हल एजंटला ते स्पष्ट विचारून घ्यावे. तरीही शंका असल्यास एअर लाईनलाच फोन केला तरी चालतो.

अमेरिकेत फळे, भाज्या, अन्नपदार्थ वगैरे नेण्याचे काही नियम आहेत. इतरही काही नियम आहेत. त्यांची माहिती कॉन्सुलेट ऑफिसकडूनच मिळवावी. बाकीच्या देशांच्या बाबतीतही तेच करावे. विमानतळावर प्रवाशांशिवाय आणखी कुणालाही प्रवेश मिळू शकत नाही. प्रवासी आत गेला की मग त्याच्याशी परत संबंध येत नाही. अर्थात तो प्रवासी स्वत: बाहेर येऊ शकतो. पण विमानतळाच्या बिल्डिंगच्या बाहेर खूप लोकांनी गर्दी केल्यास उतारूंसकट सर्वांनाच फार त्रास होतो. एका उतारूच्या तीन बॅग्ज असतात. तीन-चार उतारू एकदम प्रवास करीत असतील तर त्यांचे किती सामान असेल व ते हलवणे किती जड असेल याची कल्पना करावी म्हणजे काही काम नसताना तिथे जाणे म्हणजे किती गैरसोय होते याची कल्पना येईल. माझ्या दृष्टीने याला अपवाद फक्त जवळचे सख्खे नातलग म्हणजे आई-वडील, बहिण-भाऊ किंवा स्वत:चा मुलगा-मुलगी हे होत. अर्थात यात नवरा/बायको ही पण आलीच. बाकीच्या लोकांनी जाणाऱ्या माणसाला घरीच निरोप दिला तर चांगले.

प्रवाशाने विमानतळाच्या बिल्डिंगमध्ये आपले सामान व योग्य कागदपत्रांसह प्रवेश केला की आपण ज्या एअरलाईनने जाणार आहोत तो काऊंटर शोधावा. घरून निघण्याआधी विमान वेळेवर निघणार आहे की नाही त्याची चौकशी करावी. किती तास आधी विमानतळावर जायचे याचीही चौकशी करावी लागते. आपल्या काउंटरपाशी गेल्यावर मोठ्या बॅग्ज, पासपोर्ट व तिकीट काऊंटरच्या माणसाकडे द्यावी लागतात. ते बॅगवरती नंबर टॅग लावतात. त्याच टॅगचा त्याच नंबराचा दुसरा भाग ते तुमच्याकडे देतात. आपल्या मुक्कामावर बॅग उतरवून घेताना बऱ्याच बॅग्ज सारख्या दिसतात व आपल्यालाच कधी कधी गोंधळल्यासारखे होते. त्यावेळी हा नंबर उपयोगी पडतो. शिवाय कुणालाही बॅगविषयी संशय आल्यास हा नंबर दाखवता येतो. आपली हॅंडबॅग सोडून बाकीचे सामान एअरलाईनच्या ताब्यात देण्याच्या या कामाला Luggage check in म्हणतात. ते झाल्यानंतर एअरपोर्ट टॅक्स (सध्या ३०० रुपये) भरावा लागतो. परकीयचलन (exchange) घेऊन झाले नसेल तर तिथल्याच बॅंकेच्या काऊंटरपाशी जाऊन घ्यावे, व मग परत बाहेर येऊन आपल्या मंडळीना भेटायचे असेल तर भेटता येते. आपली हॅंडबॅग कधीही, कुठेही हातातून खाली ठेवू नये. अनोळखी माणसाकडून कोणतीही वस्तू भेट म्हणून घेऊ नये. असे सुरक्षिततेचे नियम आहेत. आणखीही काही आहेत. त्यांची रीतसर माहिती करून घ्यावी. आपल्या मंडळींना निरोप देऊन मग आत गेल्यावर बाकीच्या

नातेवाईकांनी घरी जायला काहीच हरकत नाही. कारण परत प्रवासी भेटणार नसतो. आत गेलेल्या प्रवाशाला मग Security Check (सुरक्षा कक्ष) मधून जावे लागते. लगेज चेक इन करताना (सामान देतांना) काउंटरवरचा माणूस तुम्हाला सीट नंबर म्हणजे विमानातील खुर्चीचा नंबर देतो. त्याला Boarding Pass म्हणतात. हा नंबर आजकाल ट्रॅव्हल एजंटसुद्धा देतात. यानंतर आपला पासपोर्ट व तिकीट नीट सुरक्षित ठिकाणी ठेवावे. कारण प्रवासात त्याची जरुरी नाही. विमानात चढायच्या वेळी बोर्डिंग पास मात्र हातात ठेवावा लागतो. विमानात (Air Craft) शिरताना आपल्या स्वागतार्थ तेथील कर्मचारी दारातच उभे असतात. त्यावेळच्या वेळेप्रमाणे Good morning किंवा Good Evening म्हणतात. आपणही त्यांना तेच म्हणायचे. तेच आपला सीट नंबर (बोर्डिंग पास) पाहून कुठच्या बाजूला जायचे ते सांगतील. आपल्याला कोणतीही अडचण असेल तर याच लोकांना विचारावे किंवा शेजारच्या माणसालासुद्धा विचारले तरी तेही त्यांना शक्य असेल तर जरूर मदत करतात. आपल्याला माहीत नसले तरी जराही लाजायचे कारण नाही. कारण प्रत्येकानेच कधीतरी प्रथम प्रवास केलेलाच असतो. त्यामुळे कुणीही कुणाची चेष्टा करणार नाही. एअर होस्टेस (हवाई सुंदरी) आपल्याला योग्य वेळी खाणं पिणं आणून देईलच. ते भरपूर दिलं जातं. मांसाहार व शाकाहार अशा दोन्ही प्रकारचं असतं. पूर्ण शाकाहारी माणसांनी तिकीट घेतानाच ते स्पष्ट करावे. आपल्याला पाहिजे ते घ्यावं. विमान कुठे बदलायचं असेल तर त्यची नीट माहिती ट्रॅव्हल एजंटकडून आधीच करून घ्यावी. तरीही मनाचा गोंधळ झाला असेल तर कुणालाही विचारले तरी कुणीही मदत करते. कितीही वेळा हा प्रवास केला तरी काही प्रश्न विचारायची वेळ येतेच. उदा., आपल्याला फ्लाईट नंबर माहीत असला तरी कुठच्या गेटला जायचे ते विचारावे लागतेच. पिक पॉकेटिंग (खिसेकापू) कमी अधिक प्रमाणात सर्व देशांत असतेच. त्यामुळे सांभाळून राहावे. याबाबतीत आमचे स्वत:चे एक मजेशीर उदाहरण देते :

१९८६ साली ब्रुसेलस या युरोपमधल्या एका शहरी आम्ही दोघे – श्री. पुराणिक व मी – गेलो. तिथूनच आमचा युरोपचा दौरा सुरू व्हायचा होता. विमानतळावरून बाहेर पडून तिकडेच शहरात जाणारी ट्रेन पकडली व स्टेशनवर बाहेर पडून रस्ता क्रॉस करायचा होता. फुटपाथवर सर्व सामान घेऊन उभे होतो. तितक्यात दोन दहा-बारा वर्षांची मुलं आली व फ्रेंच भाषेंत काही विचारू लागली.

आम्हा दोघांनाही ती भाषा येत नव्हती. म्हणून आम्ही नुसतच No, No (नाही किंवा नको अशा अर्थाने) असं म्हटलं. तसं म्हणणं सर्वात सुरक्षित वाटलं. तरी ती काहीतरी म्हणतच राहिली व आम्हीही आमचं "No" सोडलं नाही. शेवटी दोन-पाच मिनिटांनंतर आम्ही रस्ता ओलांडला. सामान बरोबर असल्याने सावकाश चाललो. तो रस्ता अगदी अरुंद होता. तेवढाही रस्ता ओलांडेपर्यंत ती मुलं आमच्या मागोमाग धावत आली व त्यांनी आम्हाला काहीतरी हातात दिले व परत फ्रेंच भाषेतच काही सांगितले. त्यांनी जे हातात दिले ते आमचे बोर्डिंग पास होते. श्री. पुराणिकांनी आपल्या जॅकेटच्या आतल्या खिशांत ते ठेवले होते. नशिबाने पैशाचं पाकिटं तेथे ठेवलं नव्हतं. नाहीतर युरोप फिरण्याच्या ऐवजी परत अमेरिकेला जावं लागलं असतं. आमच्याशी बोलताना रस्त्यावर जराही गर्दी नसताना त्यांनी शिताफिने ते पळवले होते. मला किंवा श्री. पुराणिकांना ते कळलेही नाही व त्यांचा त्यांना काहीच उपयोग नसल्याने आमच्याकडे परत आणून दिले होते का कोण जाणे पण राग यायच्या ऐवजी आम्ही अजूनही त्या आठवणीने हसतो. (बहुधा पैसे न गेल्याचा तो आनंद असेल.)

आपल्या मुक्कामी (destination) विमानतळावर विमानांतून बाहेर पडल्यावर immigration मधून जावे लागते. तिथे आपला पासपोर्ट व व्हिसा पाहातात. त्यांना काही शंका असल्यास काही प्रश्न विचारतात. त्याची योग्य ती उत्तरे द्यावीत. उत्तरं माहीत नसेल तर तसंच सांगावं पण घाबरून किंवा नर्व्हस होऊन भलतंच काही सांगू नये. त्यातून बाहेर पडल्यावर Baggage Claim जिथे आपल्या बॅग्ज् येतात (आपण check in केलेल्या) त्या दिशेने जायचे. सर्व विमानतळांवर सामान न्यायला ढकलगाड्या (carts) असतात. काही ठिकाणी फुकट असतात. काही ठिकाणी थोडे पैसे भरावे लागतात. (१ डॉलर) आपल्या सामानाची खात्री करून घेऊन मग कस्टमसमधून जावे लागते. विमानातच तेथील कर्मचारी विमान उतरण्यापूर्वी साधारण तासभर आधी कस्टमसचा फॉर्म भरायला देतात. त्यात आपले नाव-गाव व आपल्या सामानाबद्दल माहिती विचारलेली असते. काही सूचनांही दिलेल्या असतात. सर्व नीट वाचून, समजून घ्यावे. समजले नाही तर तिथेच कुणालाही विचारले तरी कुणीही मदत करतात. तो फॉर्म कस्टमसच्या लोकांना देतात. तरीही ते काही प्रश्न विचारतात व त्यांना वाटल्यास सामान उघडायलाही सांगतात.

परदेशात जाताना व गेल्यावर सर्व गोष्टींना एक नियम आधी पाळावा तो म्हणजे समजले नाही तर परत विचारावे व आपण उत्तर देताना किंवा विचारताना स्पष्ट, सावकाश व थोडे मोठ्याने बोलावे. आता आपण अमेरिकेत आला आहात.

■ ■ ■



# सुस्वागतम्

साधारणपणे १०,००० मैलांवर प्रवास झाला आहे. घरच्या माणसांची खूप आठवण येत आहे. भारतात असताना त्यांचे जे गुण कळले नाहीत ते आता जाणवत आहेत. आपण त्यांच्याबरोबर बोलताना - वागताना केलेल्या चुका आता आपल्यालाच बोचत आहेत. ज्यांच्या घरी उतरला आहात ती माणसं आधीच ओळखीची असली तर ठीक. पण बहुधा ती ऐकून ओळखीची असतात. त्यामुळे तेही एक दडपणच असते. ती माणसं कोणीही असू देत. पण तीही या देशात केव्हातरी नविनच आल्यामुळे आपल्या भावना समजू शकतात. आपण तिकडे पोहोचताना शनिवार-रविवार असेल तर उत्तम म्हणजे घरची मंडळी आपल्याला बराच वेळ देऊ शकतील. पण सोमवार ते गुरुवार या दिवसात गेलात तर दिवसा एकटे पडाल. वेळ आली तर थोडसं बाहेर चालून या. (अर्थात थंडी नसेल तर) सोनेरी केसांच्या पऱ्या व निळे पक्षी (साता समुद्रापलिकडील) आपल्याला इथे पाहायला मिळतील. उन्हाळ्याचे दिवस असतील तर भरपूर पानांनी भरलेली घनदाट झाडी दिसेल. पण बर्फाच्या दिवसांतही एक आगळे सौंदर्य दिसेल. अनेक वेळा असं वाटतं कि स्वर्ग म्हणतात तो हाच. पण तिकडे गेल्याबरोबर हा स्वर्ग पाहिला की मनात येते "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" कितीही आणि काहीही चांगलं पाहिलं तरी ते वाईटच दिसतं. जे लोकं फक्त फिरायला म्हणून अमेरिकेला येतात ते लोक सोडले तरी बाकी जवळ जवळ सर्व लोकांची प्रथम हीच मन:स्थिती असते.

स्वतःला अगदी कठीण हृदयाची म्हणवणारी माणसंसुद्धा रडलेली आहेत. हरकत नाही. एक-दोन दिवस असे जातील. इतकच काय तर परतीचे तिकीट काढून भारतात परत जावे, असेही वाटेल. ही भावना मात्र सहा महिने ते वर्षापर्यंतसुद्धा काही जणांची राहिलेली मी पाहिलेली आहे. पण तीच माणसं नंतर कायम अमेरिकेत राहायला मिळण्याकरता प्रयत्नशील झालेलीही पाहिली आहेत.

आपण विद्यार्थी म्हणून गेला असाल तर पुढे कुठे जायचे याबद्दल आपल्याला माहीतच असेल. ग्रीनकार्ड मिळवून गेलेले असाल व नोकरी आधीच मिळाली असेल तर प्रश्नच नाही. मग स्वतःची जागा पाहाणे झाले. त्याकरता वर्तमानपत्रात जाहिरात पाहाता येणे किंवा एजन्सीजसुद्धा असतात. आपण त्यांना आपल्या खर्चाचा अंदाज दिलात व नोकरीची जागा व आणखी काही अटी असलल्यास त्या सांगितल्यास ते आपल्याला चांगली मदत करतात. ज्यांच्या घरी उतरणार ते लोक पण त्या घराच्या आजूबाजूच्या वस्तीबद्दल सांगू शकतील. दोन-चार दिवसांत जागा सहज मिळू शकते. सर्वचजण प्रथम अपार्टमेंटमध्येच राहातात. ज्यांच्या घरी उतरत त्यांचे मोठे घर (असण्याची बरीच शक्यता आहे.) पाहून भाळून जाऊ नका. काही वर्ष कष्ट केल्यावर कुणालाच ती गोष्ट कठीण नाही. मात्र कष्टाशिवाय ते मिळणारही नाही. अपार्टमेंटस् बहुधा ट्रेन- स्टेशन, ग्रोसरी स्टोअर्सच्या जवळपास असतात, किंवा शक्यतो तसं पाहून घ्यावं. कारण ट्रेन किंवा बसने जायचे असल्यास ते व ग्रोसरी स्टोअर्स घराजवळ असणे अपार्टमेंटमध्ये राहाणाऱ्यांना फार जरुरीचे आहे. कारण थंडीच्या दिवसात विशेषतः बर्फ पडला असताना त्याचे महत्त्व कळते. अपार्टमेंटमध्ये स्वयंपाकघरात काही कपाटे, ४ गॅस किंवा इलेक्ट्रिकच्या शेगड्या, रेफ्रिजरेटर, ओव्हन एवढे असतेच. कधी डिशवॉशरपण मिळतो व अगदी क्वचितच वॉशर, ड्रायर (कपडे धुण्याचे व वाळवण्याचे मशिन) सुद्धा असतात. अर्थात भाडं त्याप्रमाणे जास्त असते. साधारणपणे एक किंवा दोन महिन्यांचे भाडे डिपॉझीट म्हणून घेतले जाते. बाकी पागडी वगैरे काही नाही. बहुधा एक किंवा दोन वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट केले जाते. जागा सोडताना साधारणपणे १ किंवा २ महिन्यांची नोटीस द्यावी लागते.

गॅसच्या शेगड्यांना सिलींडर नसतो तर पाईपमधून गॅस येतो. त्याची किंमत त्यामानाने खूप कमी असते व बरेच वेळा भाड्यातच धरलेली असते. चार शेगड्यांच्या मध्यभागी मेणबत्तीसारखा पण गॅसवर जळणारा पायलट् लॅंप असतो.

त्यामुळे शेगडीचं बटण फिरवलं की गॅस सुरू होतो. लायटर किंवा काड्याची पेटी या लँपमद्ये बिघाड झाला तरच लागते. हा पायलट लँप वरून दिसत नाही. कारण त्यावर पत्र्याचे झाकण असते. हे झाकण या लँपमुळे नेहमी चांगलेच तापलेले असते व त्याचा उपयोग दही लावण्याकरता होऊ शकतो. थंडीच्या दिवसांत दही लागत नाही. पण या पायलट लँपवर ठेवले की चांगले व लौकर लागते.

रोज भाजीपाला किंवा ग्रोसरी आणायला वेळ मिळत नाही. वाटेत येता-येता भाजी आणता येत नाही. त्याकरता मुद्दाम 'वाट वाकडी' करावी लागते. म्हणून आठवड्यातून एकदाच किंवा फार तर दोनदा ग्रोसरीला जातात. दूध, पाव, फळ, भाजी, मटण, मासे, चहा, साखर या खायच्या जिनसांपासून ते लिपस्टीक, नेलपॉलिश, शाम्पू, टूथपेस्ट वगैरे जिनसांपर्यंत सर्व जिन्नस एकाच दुकानात मिळतात. ही भली मोठी दुकानं उन्हाळ्यात एअर कंडिशन्ड व थंडीत उबदार केलेली असतात.

स्वत:च्या घरी राहायला गेल्यावर काहीजण सोबत म्हणून कुणीतरी दुसरे माणूस ठेवतात. थोडेसे स्वस्त पडते. पण मुख्य म्हणजे एकटेपणा जाणवत नाही. शॉपिंग सेंटर्समध्ये तर भांडी वगैरे मिळतातच. पण ग्रोसरीच्या दुकानातसुद्धा ती मिळतात. एकंदरीत संसार मांडायला एक आठवडासुद्धा पुरतो.

■ ■ ■

# पेहराव

प्रत्येक देशाच्या चालीरीती व कपडेलत्ते वेगवेगळे असल्याने त्या संदर्भात आधी थोडीफार त्याची माहिती असली तर टेन्शन थोडे कमी होते. मी स्वत: अमेरिकेत २० वर्षांहून अधिक काळ राहिल्याने त्या संदर्भात मला असलेली माहिती मी इथे देणार आहे.

अमेरिकेत जाऊन कायमचे वास्तव्य खूप भारतीयांनी केले आहे. ते प्रामुख्याने न्यूयॉर्क, शिकागो, फिलाडेल्फिया वगैरे मोठ्या शहरांत दिसते. इतरत्र भारतीय लोक कमीच आहेत. मोठ्या शहरांत रोजच्या कामाला जायचा प्रवास रेल्वेने अथवा बसने असतो कारण कार पार्किंग अतिशय महाग असते. रेल्वे किंवा बसने जाताना कुणी भारतीय दिसला तर त्याच्याशी वा तिच्याशी आपल्याला लगेच ओळख करून घ्यावीशी वाटते. त्या व्यक्तीची जातपात वा प्रांत यांचा अडसर वाटत नाही. ती व्यक्ती मराठी, बंगाली, गुजराथी, कानडी, कोणतीही असो, ती भारतीय आहे याचेच अप्रूप वाटते. भारतीय शब्द ऐकायला कान नेहमीच आतुर असतात. दक्षिण भारतातील माणसे मराठी, बंगाली, हिन्दी भाषिकांना भेटली तरी ती इंग्लीशमध्ये बोलतात. पण तेही आपले वाटते. अगदी थोड्याच दिवसांत अशा भारतीय कुटुंबाची मैत्री होते. सांगायचे तात्पर्य म्हणजे अजूनही भारतीय लोक अमेरिकेत कमी प्रमाणात आहेत. आपल्याकडील पुरुषांना पेहरावाचा फारसा प्रश्न येत नाही. कारण सोईने त्यांनी पाश्चात्य पोशाख केव्हाच स्वीकारला आहे. दिल्ली, मुंबईसारख्या मोठ्या शहरांत

स्कर्ट ब्लाउज अथवा जीनस् घालणाऱ्या मुलीही आजकाल नजरेस पडू लागल्या आहेत. पण अजूनही साडी व पंजाबी ड्रेस हेच आपले मुख्य ड्रेस आहेत. अमेरिकेतही तो पोशाखच स्त्रिया बहुधा कायम ठेवतात. अमेरिकेत येणाऱ्या युरोपियनांना धर्म व रीतीरिवाज एकच असल्याने काहीच फरक पडत नाही. जपानी, चिनी, आफ्रिकन वगैरे लोक अमेरिकेत येतात तेव्हा अमेरिकेसारखा पोशाख करतात. आपली विशिष्ट वेषपद्धती आपल्याच देशात ठेवतात. अमेरिकेच्या पश्चिम भागात जपानी व चिनी लोक मोठ्या संख्येने राहतात. ते कधी किमोनोमध्ये दिसले नाहीत. ते चांगले किंवा वाईट यावर मतप्रदर्शन करण्याचे काहीच कारण नाही.

काही समारंभ किंवा पार्टी असेल तर आपल्याकडील सुंदर साड्या किंवा भरतकाम व इतर कलाकुसर केलेले कपडे घातल्यास कोणाचीच तक्रार नसते. लांब स्कर्ट घातल्यासारख्या या साड्या तशा विशिष्ट प्रसंगांना छान दिसतात. पण ऑफिसमध्ये वा इतरत्र काम करताना पाश्चात्य वळणाचा ड्रेसच योग्य ठरतो. काही डॉक्टर बायका हॉस्पिटलमध्ये साडी नेसून जाताना दिसतात. ऑपरेशन थिएटरमध्ये त्यांनाही युनिफॉर्म घालावा लागतो. शिवाय त्या प्रोफेशनला ते क्वचित चालतही असेल. पण तो ड्रेस ऑफिसमध्ये किंवा इतर कोणत्याही कामावर घातलेला तेथील लोकांना आवडत नसावा. तसं ते बोलून दाखवोत वा न दाखवोत. एकूण तिकडे ऑफिसमध्ये कामही बरेच जास्त करावे लागते. खुर्च्यांच्या पायाखाली येऊन माझ्याही काही साड्या फाटल्या आहेत. माझी त्यावेळची नोकरी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये असल्याने मी साडी नेसलेली चालत असे. पण एकदा तिकडच्या पद्धतीच्या कपड्यांची सवय झाल्यावर कामाच्या वेळी मीही ड्रेसच घालू लागले. माझ्या स्वत:च्या अनुभवाने असे म्हणता येईल की या पोशाषात काम झटपट करता येते. ज्याला अगदी प्रोफेशनल ड्रेस म्हणतात तसे दिसायला पाहिजे असेल तर 'सूट' घातला जातो. ब्लाउज हे आपल्या साडी-ब्लाउजप्रमाणे नसून साधारण बुशकोटाप्रमाणे सैलसर असतात. तरीसुद्धा बायकांचे कपडे वेगळे दिसतात. कारण त्याला फ्रिल (झालर), बो, एम्ब्रॉयडरी वगैरे वेगवेगळ्या प्रकारची फॅशन केलेली असते व त्यावरती जॅकेट घातले जाते. हे जॅकेटही बायकांचे वेगळ्या पद्धतीने शिवले जाते. त्या प्रत्येक ड्रेसप्रमाणे मॅचिंग बूट, शूज किंवा सँडलस् घ्याव्या लागतात. त्यातही थंडीचे कपडे, थोड्या थंडीचे कपडे, कडक थंडीचे, उन्हाळ्याचे कपडे असे हवामानाप्रमाणे कपडे तसेच शूज किंवा सँडलसपण बदलल्या जातात.

ते तसं बदलणं भागच असतं. याशिवाय बायका पँटीहोज वापरतात. पँटीहोज हे नॉयलॉनचे केलेले असतात. त्यांच्यामुळे थंडीपासून संरक्षण मिळू शकते. त्यातही किमतीप्रमाणे नवीन प्रकार मिळू शकतात. ते मोज्याप्रमाणे पण तितके जाड नसतात व निरनिराळ्या लांबीचे असतात. म्हणजे Ankle high (घोट्यापर्यंत म्हणजे मोज्यांच्याच लांबीचे) knee high म्हणजे गुडघ्यापर्यंत व पँटीहोज म्हणजे कमरेपर्यंत असतात. ते सर्वसाधारणपणे स्कीनकलर म्हणजे प्रत्येकाच्या कातडीच्या रंगाप्रमाणे मिळतात. पण काही महागाईचे वेगवेगळ्या मॅचिंग रंगाचेही मिळू शकतात. याचा कपडा इतका नाजूक असतो की थोडी नखं वाढलेली असल्यास पहिल्याच वेळी किंवा बहुधा दोन-चार वेळा वापरताच ते फाटतात. त्याचा एखाद-दुसरा धागा निघाला तरी पायावर तो उठून दिसतो. एखाद्या बाईला दुसऱ्या बाईचा अपमान करायचा असेल तर मुद्दाम दुसऱ्या पुरुषाच्या देखत त्याचा उल्लेख केला जातो. (हा अपमान करायचं कारण बहुधा तो पुरुष किंवा boy friend असतो.)

जॅकेट हे स्कर्ट-ब्लाउज, ड्रेस किंवा पँटवर घातले जाते. इंटरव्ह्यूला जातानासुद्धा असं well-dressed जाणंच पसंत करतात. पण Clerical job म्हणजे कारकुनाची नोकरी असली तर 'सूट' नाही घातला तरी चालतो. हे कपडे बहुधा निरनिराळ्या प्रकारच्या पॉलिस्टरचे किंवा सिल्कचे असतात. घरी घालायचे व ग्रोसरीला जायचे (बाजारात जायचे, कपडे मात्र साधे असतात. त्यातही हवामानाप्रमाणे फरक केला जातो. इथे कडाक्याची थंडी व कडाक्याचा उन्हाळा असंच बरचसं हवामान असल्याने हा फरक करण्याशिवाय गत्यंतरच नसते. याशिवाय प्रत्यक्ष बर्फातून चालायचे बूट वेगळे असतात. थंडीच्या दिवसांत लांब winter coat म्हणजे थंडीचे कोटही तऱ्हेतऱ्हेने आणावेच लागतात. खूप थंडीचे वेगळे व कमी थंडीचे वेगळे. अजूनही इतकी वर्षं उन-पाऊस व थंडीचे नखरे करताना असा विचार मनात येतोच की निसर्गाने नुसती करंगळी जागची हलवली तरी सर्व प्राणिमात्रांची तो कशी त्रेधा-तिरपीट उडवू शकतो. दोन-चार वेळा बर्फावरून गाडी घसरल्यावर व बर्फात गाडी रूतल्यावर काही वर्षं मला अक्षरशः बारा महिने स्वप्नात तेच दिसत असे व घामाघूम होऊन मी जागी होत असे.

शनिवार-रविवार बहुतेकजण जीनस् घालतात. (बायका व पुरुषही) खास काही पार्टी असेल तरच पोषाख बदलतात. नाहीतर सिनेमाला जातानासुद्धा फक्त वर थंडीचा कोट (थंडीच्या दिवसांत) चढवतात व जातात. अशा वेळी मला भारतातील

फार आठवण येते. भारतात सिनेमाला जायचे म्हणजे मी लगेच कोणत्यातरी नवीन पातळाची घडी मोडायचा बेत करत असे. गजरा तर हवाच. अशा तऱ्हेने सिनेमाच्या दिवसाची किती आतुरतेने वाट पाहायची. आता इकडे सिनेमाला जायचं म्हणजे ठरवून ठेवायला लागत नाही. तिकीट मिळत नाही असं सहसा होत नाही. त्यामुळे पटकन् आयत्या वेळी ठरवूनच सिनेमाला जातात.

रात्री झोपताना मात्र सर्वजण नाईट ड्रेस घालतात. भारतातही काही लोक नाईट ड्रेस घालतात. पण इकडे सर्वजण घालतात.

इकडे साड्या कमी वापरायचे दुसरे कारण म्हणजे इस्त्री करण्याचा त्रास. घरीच इस्त्री करावी लागत असल्याने साडीपेक्षा ड्रेस नक्कीच सोपा वाटतो.

■ ■ ■

# रोजचे जीवन

कपड्यालत्त्याप्रमाणे खाण्यापिण्याचेही तसेच होते. एकतर निदान आठला तरी काम करणारी जोडपी बाहेर पडतात. त्यातही बरेच आधी बऱ्याच जणांना बाहेर पडावे लागते. माझ्या अनुभवाप्रमाणे भाजी-आमटी-भात-पोळ्या हे अन्न काहीसे सुस्ती आणणारे आहे. तिथल्या अतिशय जलद जीवनात केवळ ते खाऊन राहाणे कठीण आहे. ती सर्व भांडी घासून इतक्या सकाळी इतक्या थंडीच्या दिवसांत बाहेर पडणे जवळजवळ अशक्य. शिवाय व्हिटॅमिन्स घातलेली अनेक प्रकारची Cereals (कार्न फ्लेक्स व तत्सम) भरपूर मिळतात. त्यांत तांदूळाचे, गव्हाचे, मक्याचे, बार्लीचे, सुकी फळे घातलेले, न घातलेले, साखर घातलेले, साखर न घातलेले, बदाम घालून एक ना दोन असंख्य प्रकार आहेत. या सर्वांत वेगवेगळी वा सगळीच व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स घातलेली असतात. घरात दूध भरपूर आणून ठेवलेले असते. अंडीही आणून ठेवलेली असतात. शरीराला पोषक असे सर्व अन्नघटक यातून मिळतात. शिवाय अननस, संत्री, सफरचंद, पपया वगैरे फळांचे रसही भरपूर मिळतात. आठवड्याला आणलेल्या ग्रोसरीत आपापल्या कुटूंबाला लागणाऱ्या गरजेप्रमाणे जिन्नस आणले जातात. शिवाय मांसाहार खाणाऱ्याला वेगवेगळ्या प्रकारच्या मांसाचे अनेक प्रकार मिळतात. आता मायक्रोवेव्ह ओव्हन हा प्रकार घरोघरी झाल्यामुळे दूध गरम करणे वगैरे प्रकार खूपच सोपे झाले आहेत. आपल्याकडच्याप्रमाणे दूध तापवणे, साय काढणे, लोणी काढणे वगैरे प्रकार तिकडे

नाहीत. दूध प्लॅस्टिकच्या कॅनमध्ये वा पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये मिळते. आपल्याला पाहिजे तितके दूध कपात किंवा ग्लासात ओतून हा ग्लास मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये ठेवून एक मिनिट/अर्ध मिनिट - ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे वेळ adjust करायची - म्हणजे दूध ओतू जाणे ही भानगड नाही. ओव्हन तेवढ्या ठरवलेल्या वेळात आपोआपच बंद होतो. मला वाटतं गरम दूध प्यायची पद्धत बहुतेक आपल्यातच असावी. अमेरिकन लोक रेफ्रिजरेटरमधून काढून तसेच थंड दूध पितात. ब्रेड व लोणी पण बरेच आणून ठेवलेलेच असते. दुपारच्या जेवणाकरता बहुतेक सर्व जण सँडविच घेऊन जातात. शाकाहार करणारे लोक चिज, टोमॅटो, चटणी, काकडी वगैरे प्रकार वापरतात. ब्रेडमध्येही खूप प्रकार मिळतात. मांसाहार खाणाऱ्यांकरता अनेक प्रकारच्या मासांच्या सँडविचमध्ये घालण्यायोग्य चकत्या (slices) अतिशय स्वच्छ व सुंदर तऱ्हेने पॅक केलेल्या मिळतात. शिवाय चीज, मेथोनेस वगैरे असतेच. एकंदरीत या सँडविचमधूनही शरीराला आवश्यक असणारी प्रथिने व व्हिटॅमिन्स मिळतातच. खास लंचकरता फळांच्या व भाज्यांच्या रसांचे लहान डबे किंवा बॉक्स जे बस वा ट्रेनमधूनही सहज नेता येईल असे सर्व ग्रोसरी स्टोअर्समध्ये मिळतात. त्यामुळे फळे / भाज्याही आपोआपच खाल्ल्या (प्यायल्या) जातात. फळांचे प्रकार म्हणजे केळी, सफरचंद, द्राक्षे, अननस, पपनस हे आपल्याप्रमाणेच मिळतात. साधारणपणे मार्च-एप्रिलपासून स्ट्रॉबेरीज, पीच, नेक्ट्रीन (पीचच्या जातीचेच दुसरे सायट्रीक फळ) Black berries म्हणजे आपल्याकडील काळ्या करवंदासारखे पण बिनबियांचे फळ, रासबेरिज्, प्लमस् वगैरे भरपूर प्रमाणात मिळतात. याशिवाय ओले जरदाळू (Apricots, Avocado) अव्होकाडो, क्रॅनबेरीज म्हणजे आपल्याकडील हिरव्या करवंदाप्रमाणे पण लाल भडक रंगाच्या असतात. Star fruit हे नावाप्रमाणेच अगदी चांदणीच्या आकाराचे असते. चेरिमोयाज (cherimoyas) Feijoas - हे मेक्सीकन नाव आहे. हे फळ साधारणपणे हिरवट- करड्या रंगाचे व अंड्याच्या आकाराचे असते. पेपिनो, किवी फळ, पॅशन फ्रूट Honey Dew, Cantaloupe (खरबूज, टरबूज) Pears, Persimmons, Sapotes, Tree tomato यालाच Tamrillo असेही म्हणतात. यातील काही फळांची मराठी नावं मला माहीत नाहीत. सगळी जरी नाही तरी भारतात पण यांपैकी पुष्कळ फळं मिळतात.

भाज्यांत पण असंख्य प्रकार आहेत. उदा. Artichokes, Aspragus,

Broccoli, Bok Choy (एक पालेभाजी) यालाच Chinese Chared Cabbage (कोबी) किंवा Chinse White cabbage असेही म्हणतात. Celery, Horse radish, turnips, cheyali, Fennel यात पालेभाजीचे खूप प्रकार आहेत. जे आपल्यापेक्षा वेगळे आहेत.

यातीलही काही भाज्या तरी नक्कीच भारतात मिळत असतील. फरक इतकाच म्हणता येईल कि जागेच्या किंमती सोडल्यास बाकी सर्व वस्तूंच्या किंमतीत अमेरिकेत कुठेही गेले तरी फारसा फरक जाणवत नाही. फरक असलाच तरी तो नगण्य असतो. आपल्याकडील ट्रॉपीकल फ्रूटस म्हणजे उष्ण प्रदेशांत मिळणारी फळे म्हणजे आंबे मिळतात. पण आपल्यासारखे कलमी नाही. फार थोडे अमेरिकन लोक आंबे खातात. फणस मिळत नाही. आता तो कॅनमधून फिलिपिन्समधून येतो. त्याला jack fruit म्हणतात. पेरू अगदीच क्वचित व तेही चांगले मिळत नाहीत. किंबहुना खूप वर्षांत भारतात यायला मिळालेले नाही तर दुधाची तहान ताकावर भागवायची म्हणून ते पेरू खायचे इतकेच. कलिंगडे भरपूर व अतिश. गोड असतात. पपया खूप लहान पण गोड असतात. अगदी लहान पपयाला २/३ डॉलर्स म्हणजे ६५ ते ९० रुपयांच्या दरम्यान पैसे पडतात. अमेरिकन ग्रोसरी स्टोअर्समध्ये एका आंब्याला १ डॉलर किंवा त्याहीपेक्षा जास्त पैसे पडतात. म्हणजे साधारणपणे ३५ ते ४० रुपयाला एक आंबा पडतो व तोही कलमी नाही. एका नारळाला साधारणपणे १ डॉलर म्हणजे ३० ते ३५ रुपये पडतात. साधारण कल्पना येण्याकरता या किंमती दिल्या आहेत. म्हणजे तिकडे मिळणाऱ्या उत्पन्नांचे जी लोक सतत रुपयांत रुपांतर करतात त्यांनी कृपया याही गोष्टीची नोंद घ्यावी म्हणजे एकदम गेल्यावर धक्का बसायला नको. ओले अंजिर मधून मधून मिळतात. एका लहान अंजिराची किंमत ५० सेंटस म्हणजे १५/१६ रुपये असते. कोथिंबिरीची जुडी इकडे १ किंवा १ ॥ रुपयांना मिळते त्याला तिकडे १ ॥ ते २ डॉलर्स पडतात म्हणजे साधारणपणे ५०-६० रुपये झाले. आपल्याकडील ताडगोळे, चिकू, रामफळ, सिताफळ, जांभळं ही फळे पहायलाही मिळत नाहीत. कदाचित दक्षिण अमेरिकेत यातील एखादं फळं मिळत असेल पण उत्तर अमेरिकेत मी ती कधीही पाहिली नाहीत. आपल्याकडील पालेभाज्यांपैकी तिकडे फक्त पालक मिळतो. चवळी-माठ-अंबाडी वगैरे मिळत नाहीत. भारतीय ग्रोसरीच्या दुकानात मात्र मधून मधून पडवळ, गवार, मेथी, दुधी वगैरे भाज्या मिळतात. याच दुकानांतून आता अनेक भारतीय भाज्या म्हणजे सुरण,

शेवग्याच्या शेंगा, भाजीचा फणस, परवर वगैरे भाज्या, कच्च्या पण कापलेल्या अशा कॅन्समधून मिळतात. ताजं अळूही मधून मधून भारतीय दुकानांतून मिळतं. गुंडाळी केलेल्या व नुसत्या उकडलेल्या अळुवड्या कॅनमधूनच मिळतात. हे सर्व भारतातून तिकडे जाते. हल्ली फरसाण, चिवडा, चकल्या वेगवेगळया तळलेल्या डाळी, केळ्यांचे वेफर्स वगैरे स्नॅक्स प्रकार अमेरिकेतच तयार करून विकायचे उद्योग सुरू झाले आहेत. अशा धंद्यांतून मराठी माणूस अभावानेच पाहायला मिळतो. याशिवाय Frozen food मध्ये चपात्या, ढोकळे, पुलाव, बिर्याणी, सांबार वगैरे उत्कृष्ट प्रकार मिळतात. उंडियो ही गुजराथी पद्धतीची पण सर्वांची आवडती अशी भाजीही भारतातून कॅनमधून निर्यात केली जाते. आणि म्हणूनच मी असं म्हणते की अमेरिकेला गेल्यावर मला भारताविषयी जास्त माहिती झाली. वेगवेगळ्या पद्धतीची लोणची, पापड वगैरेही काही बाटली वा डब्यांतून तर काही मित्रमंडळींकडून अशी तिकडेच माहिती झाली. अमेरिकन ग्रोसरीत तांबडा भोपळा मिळतो. त्याच्यात लहान मोठे आकार असतात. झुकिनी म्हणून एक प्रकार आपल्याकडील घोसाळ्यासारखा असतो. ब्रोकोली नावाची हिरव्या रंगाची एक भाजी मिळते. ती थोडी कॉलीफ्लावरच्या जातीची असते. आणखी थोड्या मोठ्या पानांच्या पालेभाजीच्या जुड्या मिळतात. अमेरिकन लोक बहुधा त्या सॅलडमध्ये वापरतात. त्याचा अळुवड्यांसारखा प्रकार करता येतो. ताजी भेंडी नेहमी नाही तरी मधून मधून मिळू शकते. गाजर भरपूर व खूप मोठी असतात. केळीही भरपूर मोठी असतात. गव्हाचे पीठ अमेरिकन व भारतीय दुकानांत तयारच मिळते. रवा म्हणजे Cream of wheat अतिशय स्वच्छ व Iron म्हणजे लोहयुक्त मिळते. बारीक रव्याला Farina (फरिना) म्हणतात. अमेरिकन ग्रोसरी स्टोअर्समध्ये मिळणाऱ्या तांदूळ-डाळीत दगड-गोटे नसतात. किडी, पोरकिडेही नसतात. या स्वच्छतेमुळे व सर्वत्र चांगल्याच क्वालिटीमुळेच म्हटले जाते की सर्व अमेरिकन लोक अगदी प्रेसिडेंटपासून ते सर्वसामान्य जन एकच अन्न खातात. याचबरोबर आणखी एक उल्लेख जरूर करावासा वाटतो. पाश्चात्य देशांत नोकर माणसं नाहीत हे तर सर्वश्रुतच आहे. पण याचा संबंध फक्त धुण्या-भांड्यांशीच नाही. जर घरचा पुरुष मग तो बाहेर कोणत्याही profession चा असू दे म्हणजे एखाद्या फॅक्टरीचा मालक असू दे, इंजीनिअर असू दे, डॉक्टर असू दे वा कुठल्या कंपनीत मॅनेजरच्या हुद्दावर असू दे. हा घरचा कर्ता पुरुष घरातही तितकाच कर्ता असतो. घरातल्या प्रत्येक

कामात मग त्यात ग्रोसरी आणण्यापासून ते dish-washing वा अन्य घरच्या कामांत त्याचा सहभाग असतो.

आजकाल भारतीय रेस्टॉरन्टसपण खूप ठिकाणी झाली आहेत. त्यामुळे अगदीच ज्यांना घरात करता येत नसेल त्यांना रोज जरी नाही तरी मधून मधून बाहेर खायला जाता येते. वेगवेगळ्या पद्धतीची म्हणजे चिनी, मेक्सीकन वगैरे Fastfood रेस्टॉरन्ट पण जिकडे तिकडे आहेत. लंच वा रात्रीच्या जेवणाची झटपट सोय व थोडक्या पैशांत इकडे होऊ शकते. बाकी सर्व ठिकाणी संध्याकाळचे जेवण सर्व केले जाते. शाकाहारी घेणारे आपले लोक आपल्या पद्धतीचे संपूर्ण जेवण बनवितात. घरी गेल्यावर लगेचच बहुतेक सर्व जेवण करतात. म्हणजे सर्वसाधारणपणे सात / साडेसातला रात्रीचे जेवण घेतले जाते. व त्यानंतर थंडीच्या दिवसांत कुणी चहा / कॉफी तर समर म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसांत जेवणानंतर आईस्क्रीम खातात. चांगल्यापैकी पॅक केलेले आइस्क्रीमचे अनेक प्रकार बारा महिने ग्रोसरी स्टोअर्समध्ये मिळतात व उन्हाळ्यात आणखीही खूप प्रकार असणारी आईस्क्रीमची मोठी दुकाने जिकडे तिकडे उघडतात. उन्हाळ्यात दिवसही खूप मोठे असतात. जितके उत्तरेकडे जावे तितके मोठे म्हणजे १०-१० ।। पर्यंतही बराच उजेड असतो.

■ ■ ■

# गृहिणी जीवन

अमेरिकेत घरातच राहाणारी गृहिणी मला फारच कमी दिसली. मात्र पूर्वीच्या काळी अशा काही गृहिणी होत्या, हे नक्की. मध्यंतरीच्या समृद्धीच्या काळात, म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर भरपूर नोकऱ्या उपलब्ध झाल्या. त्यावेळी अगदी अशिक्षित स्त्रिया फॅक्टरीत नोकरी करीत व मॅट्रिक झालेल्या मुलींचे शॉर्टहँड, टायपिंग बहुतेक शाळेतच झालेले असे किंवा त्या ते नंतर करत. अशा मुली सेक्रेटरी, टायपिस्ट, रिसेप्शनिस्ट वगैरे काम करत. या नोकऱ्या नेहमीच मिळत असत. दुसरे त्यांचे काम म्हणजे ऑफिसचे हिशेब राखणे किंवा कारकुनी काम. या नोकऱ्या केव्हाही मिळत असत. मुली मॅट्रिक झाल्यावर अशा प्रकारच्या नोकऱ्या करीत. ते करतानाच 'मुलगा' शोधायचे त्यांचे काम चालूच असे. त्या वेळेला नोकऱ्या इतक्या मिळत असल्याने एखाद्या ऑफिसमध्ये जर का कुणी योग्य माणूस (लग्नाकरता) दिसला नाही तर दुसरीकडे नोकरी बघत.

नवरा शोधायचे दुसरे ठिकाण म्हणजे बारमध्ये जाणे. बारमध्ये बहुधा Singles म्हणजे लग्न न झालेली, घटस्फोटीत किंवा विधवा / विधूर जातात. ते अर्थात सगळ्यांनाच जमते असे नाही. अमेरिकेतसुद्धा ज्याला Shy (लाजाळू) म्हणतात अश्या व्यक्ती आहेतच. त्यांना आपणहून पुढे होणे व विचारणे फार कठीण जाते. काही जणांना 'नकाराची' भीतीही असतेच.

लग्न झाल्यावरही बाई बहुतेक नोकरी करतेच. मूल झाल्यावर मात्र पुष्कळ

बायका नोकरी सोडत असत. "सोडत असत." असे म्हणण्याचे कारण मुलं थोडी मोठी झाल्यावर त्या परत कामाला जात. पण आता काळ बदलत चालला आहे. मध्ये काही काळ गेला तर नोकरी मिळणे आता कठीण जाते. त्यामुळे Day care center मध्ये मुले ठेऊन किंवा घरी बेबी सीटर बोलवून आजकाल नोकरी चालूच ठेवतात. शिवाय "Professional" बायकाही काम करतातच. मात्र लहान शहरातून मी बऱ्याच गृहिणी अशा पाहिल्या आहेत कि त्या आपल्या मुलांची काळजी घेतात. तीन किंवा चार मुलांची कुटूंबेसुद्धा तिथे आहेत. सकाळी न्याहारीला बहुधा सर्वजण दूध, कॉफी, मोसंबीचा /संत्र्याचा रस, आमलेट किंवा अंड्याचे प्रकार असे काही खातात. त्यानंतर नवरा कामाला जातो. मुलं शाळेत जाणारी असल्यास मुलांना शाळेत जायला तयार करणे अशी कामे येतात. शाळेची बस असेल तरी मुलं बसमधून जाईपर्यंत त्या लक्ष ठेवतात. त्याच वेळी जर घरात बाळ असेल तर ते काम असतेच. यानंतर ब्रेकफास्टची भांडी धुणे व शेगडीची साफसफाई. तीन मुले असतील तर मधल्या मुलाला कदाचित नर्सरीमध्ये न्यायचे असेल किंवा गाण्याचा किंवा स्विमिंगचा क्लास असेल. त्या मुलाला तिकडे नेऊन मधल्या वेळात ग्रोसरी करणे वगैरे काम असते. मग तोपर्यंत तो क्लास संपतो तर त्याला आणायला जाऊन घरी येईपर्यंत बहुधा लंचची वेळ झालेली असते. लंच म्हणजे खूपशा Frozen गोष्टी ट्रेमधून तयार मिळतात. त्या गरम करायच्या किंवा मीटचे (मांस) सँडविचला योग्य काप केलेले असतात. ते घालून व चीज, मेयोनेस, टोमॅटो, लेट्यूस वगैरे घालून सँडविच तयार करणे, स्वत:ला व मुलालासुद्धा. यात बाळाचे काम परत आलेच. सँडविचबरोबर भाज्यांचे सूप (डब्यातूनच मिळते) गरम करून किंवा गारच देतात. याशिवायही मॅकरोनी वगैरे पदार्थ करून देतात. निरनिराळ्या प्रकारचे दह्याचे डबे मिळतात. तेही लंचबरोबर देतात. नंतर काही फळे किंवा एखादे फळ देतात. हे सर्व मुलांच्या तंत्राने पार पाडल्यावर परत भांडी धुणे व साफसफाई मधल्या वेळात बाळाला सांभाळून कपड्यांची लाँड्री करणे, वाळवणे, घड्या घालून ठेवणे अशी कामे चालतात. इतर साफसफाईही थोडीफार चालतेच. घरे मोठी व बहुधा तीन मजली असल्यामुळे काहींना काही साफ करण्याचे काम झालेले असतेच. तोपर्यंत पहिले मूल शाळेतून येते. ३ ते ४ पर्यंत त्यांचा 'स्नॅक टाईम' काही हलका आहार घेण्याची वेळ झालेली असते. तोपर्यंत डिनरचा विचार करायचा. ६ वाजताच रात्रीचे जेवण होत असल्याने त्याची सुरूवात करावी लागते. हे जेवण मात्र बहुधा ताजे

असते. त्यांत मुख्य पदार्थ म्हणजे चिकन किंवा बिफ किंवा पोर्क (डुकराचे मांस) किंवा मासे सॅलड (कच्च्या चिरलेल्या भाज्या) एखादी उकळलेली भाजी, ताजे सूप, कधी भात व घरी केलेला किंवा विकत आणलेला ब्रेड असे असते. नंतर काहीतरी गोड खायचे म्हणून केक, आईस्क्रीम वगैरे असते. पुष्कळशा गृहिणी केक घरी बनवतात. कुकीज् म्हणजे गोड बिस्कीटे घरी बनवतात. ब्रेड घरी बनवतात. हे सर्व घरी बनवणे म्हणजे त्या भांड्यांची साफसफाई स्वत:लाच करावी लागते. बहुतेक सर्व पुरुष ६-६ ॥ पर्यंत घरी येतात. एकत्र जेवण जेवतात. नवरा नंतर मागचे आवरायला व भांडी धुवायला बरोबरीने मदत करतो. नंतर मुलाचा अभ्यास, बाळाचे काम, मधलं मूलही तसं फार मोठं नसल्याने त्याचेही काही हट्ट पुरवणे, त्यांच्याशी खेळणे हे साधारणपणे दोघांचेही काम आहे. नंतर तिन्ही मुलांच्या आंघोळी हा कार्यक्रम दोघं मिळून कामाची वाटणी करूनच करतात. त्यानंतर त्यांना झोपताना गोष्ट वाचून दाखवावी लागते. बाळ ८-८ ॥ ला झोपते. मधलं मूलही ८ ॥ पर्यंत झोपते व शाळेत जाणारा मुलगा ९ वाजेपर्यंत झोपतो. यानंतरचा वेळ नवरा-बायकोला एकत्र मिळतो. यावेळी T.V. वर रात्रीचा सिनेमा ९ वाजताच सुरू होतो व अकरा वाजेपर्यंत संपतो. मध्ये मुलं उठली तर त्यांच्या खोल्या वेगळ्या असल्याने आईला अथवा वडिलांना उठून जावे लागते. अशी साधारण दैनंदिन दिनचर्या झाली. मी आजपर्यंत कोणत्याही गृहिणीला दुपारचे झोपताना पाहिले नाही.

काही गृहिणी आपली 'figure' राखायला क्लबमध्ये जाऊन व्यायाम (एरोबिक वगैरे) करतात. कुणी टेनिस खेळतात. मुलं लहान असताना घरच असे निवडतात की शेजारी पाजारी बरोबरीचे मुले असतील. मोठी मुले शेजारीच घर असेल तर एकटी जातात किंवा घराबाहेर खेळतात. मुलं लहान असली तर वार वा दिवस ठरवून आपापसात पाळ्या करून एकमेकांकडे मुले खेळायला पाठवतात. म्हणजे सर्वच मुलं आपापल्या घरात एकटी पडतात. त्यांना दुसरी मुलं खेळायला लागतात. फार लहान मुलांना एकटं बाहेर सोडता येत नाही. म्हणून हा प्रकार करावा लागतो. शनिवार-रविवार शॉपिंग चालते. प्रत्येक सिझनला कपडे बदलावे लागतात. बूट बदलावे लागतात. वाढणाऱ्या मुलांना या वर्षीचे कपडे पुढच्या वर्षी होत नाहीत. बाहेर बागेचे काम करायचे असते. सबंध उन्हाळयात (६ महिने) गवत कापायचे असते. नंतर मोठी झाडं दारात असतील तर फॉल सिझन सुरू होतो.

झाडांची पाने गोळा करणे, बर्फाच्या दिवसांत बर्फ काढणे (रोज नसते) ही बाहेरची कामे असतात. नविन फुलझाडे लावणे वगैरे बागकामसुद्धा असते. काही गृहिणी कपडे घरी शिवतात. जर घरची परिस्थिती उच्च मध्यम वर्गीय असेल तर शनिवारी, शुक्रवारी किंवा रविवारी कधी सोईचे पडेल तसे मुलांना बेबी सीटरकडे ठेवून नवरा-बायको सिनेमाला किंवा जेवायला बाहेर जातात. मध्यम परिस्थितीत सुद्धा महिन्या-दोन महिन्यांनी तरी जातातच. सतत मुलांचे केल्यावर काही काळ फक्त दोघांना मिळणे हे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मुलांनाही ते लायब्ररीत घेऊन जातात. मधून मधून त्यांच्याकरिता लायब्ररीत खास कार्यक्रम असतात. अशी माझ्या पाहाण्यात हल्ली बरीच सुखी, समाधानी कुटुंबे आली आहेत. मुलं बाळं असलेली कुटुंब शक्यतो शहराबाहेर राहाणे पसंत करतात. म्हणजे मुलांना चांगले वाढवता येते. जागाही मोठी मिळते.

■ ■ ■

# संस्कृती

अमेरिकेतील संस्कृतीबद्दल लिहावे तितके थोडेच आहे. या महासागराला असंख्य नद्या येऊन मिळालेल्या आहेत आणि त्याही जगाच्या कानाकोपऱ्यांतून आल्या आहेत. वेगवेगळे हवामान, वेगवेगळे चढउतार व खाचखळगे यातून मार्ग काढून आलेल्या या नद्या या महासागरात विलीन झाल्या तरी काहीसे स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व ठेवू इच्छितात. आणि ते वाटते तितके सोपे नाही.

या महासागरात अनेक रत्ने आहेत, मोती आहेत, अमृत आहे आणि विषही आहे. अमृताचा लाभ घ्यायचा असेल तर विष पचवायचं सामर्थ्य असावं लागतं. ते नसेल तर जे मिळवावं लागतं, कमवावं लागतं व ते सामर्थ्य मिळवायला सर्वांत महत्त्वाचं म्हणजे इच्छा लागते. इच्छा असली की मार्ग आपोआपच सापडतो.

कोणत्याही पाश्चात्य देशाचा विचार ज्यावेळी करतो त्यावेळी प्रथम विचार आपण तेथील संस्कृतीचाच करतो. पण संस्कृती (culture) म्हणजे तरी नक्की काय याचा विचार मी तरी कधी केला नव्हता. तो करायला लागले तर मला त्याची नक्की व्याख्या सापडेना. त्यावेळी मी भारतातच असल्याने काही ओळखीच्या मित्रमैत्रिणींना विचारायचा प्रयत्न केला. व्याख्या अशी कुणालाच सांगता आली नाही तरी आमच्या सर्वांच्या संभाषणांतून साधारणपणे मला असे वाटते, संस्कृती म्हणजे पूर्वापार चालत आलेले रीतीरिवाज, कौटुंबिक पद्धती व पर्यायाने समाज-पद्धती. मी असं धरून चालते की, समाजाच्या स्थैर्याकरता व स्वास्थ्याकरता घालून

दिलेली (कोणी ते माहीत नाही) काही व्यवस्था वा रुढी आपली भारतीय संस्कृती खूप जुनी आहे याबद्दल इतर भारतीयांप्रमाणेच मलाही खूप अभिमान होता व आहे. पण तो अभिमान नेमका कशाबद्दल व का आहे याचाही कधी विचार केला नाही. सत्ययुगात तयार झालेल्या रुढी सर्वच्या सर्व कलीयुगात पाळणे अशक्यच आहे. काळच काय तर जागा बदलली म्हणजे खेड्यातून शहरात आले तरी ते नियम बदलतात. उत्तर हिंदुस्थानातील नियम दक्षिण हिंदुस्थानात लागू पडतातच असं नाही. साधं उपासाचच उदाहरण घेतलं तर उपास म्हणजे पोटाला पूर्ण विश्रांती हे सुद्धा पुष्कळ जण विसरून गेलेले दिसतात. मला स्पष्ट आठवतं की मी तर उपासाच्या दिवसांची म्हणजे महाशिवरात्र, हरतालिका, एकादशी वगैरे दिवसांची वाटच पाहायची. म्हणजे आता त्या दिवशी भात खायला नको व खिचडी, किस, गोड भरली केळी वगैरे खायला मिळणार म्हणून. म्हणजे पचनसंस्थेला दुप्पट काम पडत असे. माझ्या दक्षिण भारतीय मैत्रिणीशी उपासाबद्दल बोलताना कळले कि त्यांच्यात फक्त तांदूळ व तांदूळाचे कुठचेही पदार्थ खात नाहीत. पण पोळी चालते. उपासाच्या कल्पनेबद्दल बसलेला आश्चर्याचा पहिला धक्का तो होता. त्यावेळी उपासाचा अर्थ असा लावला की (change of food) रोजच्या आहारात फक्त बदल पण उपास म्हणजे काहीच खायचे नाही हे कळायला फारच उशीर लागला (व आचरणात तर अजूनही आणता येत नाही) याचा अर्थ काळाच्या ओघात व जागेच्या बदलात एकाच धर्माने घालून दिलेल्या आदर्शाच्या कल्पनाच बदलल्या.

लोकांच्या वेगवेगळ्या रुढी, प्रथा वगैरे समजावून घेताना माझ्या अशा अनेक पाप-पुण्याच्या कल्पनांना धक्के बसले आहेत. तडे गेले आहेत व काहींचा चक्काचूर झालेला आहे. अमेरिकेला येऊन मी बदलले असं म्हणतात. कुणालाच नेमका बदल सांगता आला नाही. पण हे लिहिता लिहिता माझा मलाच तो उमगला. आणि हा बदल अपरिहार्यच होता. ज्यांची पोटं नेहमी तुडूंब भरलेली असतात, त्यांनाच उपासाचं महत्त्व आहे. ज्यांना नेहमीच अर्धपोटी किंवा रिकाम्या पोटी राहावे लागते त्यांना त्या पुण्याचा विचार शिवलाही नसेल.

कदाचित आपल्या भारतीय संस्कृतीची हीच महती आहे की संयम संयमाने षड्रिपूंना (राग, लोभ, मद, मत्सर वगैरे) व इंद्रियांना आवर घालणे. तो आवर घालायला सोपे जावे म्हणून पाप-पुण्याच्यां कल्पना आहेत. त्या श्रद्धेची काठी धरून ही जीवनाची वाटचाल चालायची. ही संस्कृती सर्वांनीच मनापासून पाळली तर

फारच सुंदर आहे, यात शंका नाही.

दुसरं एक गमतीशीर उदाहरण नुकतच पाहाण्यात आलं. आमच्या कोकणच्या बाजूला जाल तर पटकन एकमेकांना एकेरी नावाने हाक मारतात. त्यात आम्हाला जास्त आपुलकी वाटते. पण महाराष्ट्रातच काही ठिकाणी अगदी दोन वर्षांच्या मुलाला सुद्धा बाळासाहेब वगैरे म्हणताना पाहिले आहे. उत्तर प्रदेशातही आई मुलाला 'आप' म्हणून संबोधताना मी पाहिले आहे. एकेरी नावाने हाक मारणे त्यांना उर्मटपणाचे वाटते.

हे नियम एकाच देशात राहून व एकाच धर्माचे असून बदलू शकतात तर अमेरिकेला येऊन त्यातले कितीसे व किती दिवस हे पाळले जाणार ? हे नियम म्हणजेच संस्कृती धरली तर त्यात अमेरिकेत आल्यावर जमीन-अस्मानाचा फरक पडतो. अमेरिकेइतके ऑफिसचे कामाचे तास व कमी रजा जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही नाही. युरोप व इतर देशांतून आलेल्या लोकांच्या संभाषणातून मला हे कळले. त्याचप्रमाणे इतक्या मोठ्या जागाही क्वचितच कुठे असतील. जागा मोठी असणे म्हणजे ती चांगली राखण्याचे कामही तितकेच वाढले. नोकरीची सुरक्षितता (job security) नसल्याने जवळजवळ सर्वांनाच नोकरी करणे भाग असते. या सर्व प्रकारात घरची गृहिणी, जिला आपण साक्षात लक्ष्मी मानतो तिलाच लक्ष्मीला घरात आणायला बाहेर जावे लागते. ही परिस्थिती आता भारतातही आली आहेच व त्याचप्रमाणे गृहिणीचा 'लक्ष्मीचा' मान व पतीचा 'परमेश्वराचा' मान या गोष्टी इतिहासजमा होऊ लागल्या आहेत.

कोलंबस अमेरिकेला येऊन पोचण्यापूर्वी इकडे जे लोक राहात होते त्यांचा इतिहास माहीत नाही. तो आला त्यावेळी त्याला वाटले की हा हिंदुस्थान आहे (India) म्हणून या लोकांना तो (Indian) इंडियन समजला. आता त्यांना 'रेड इंडियन' म्हटले जाते. कारण नंतर चूक लक्षात आली. अजूनही अमेरिकन माणूस त्यांचा उल्लेख करताना 'इंडियन'च म्हणतो. त्यामुळेच व्हिस्याकरता भरायच्या फॉर्मवर भारतीय लोकांनी आपली 'रेस' 'ईस्ट इंडियन' असं लिहायचं असतं.

अमेरिकेत आल्यावर स्पॅनिश, ब्रिटिश, फ्रेंच वगैरे लोकांनी इथल्या लोकांना हाकलून लावले. बरीच कत्तल झाली. तो इतिहास आहे. आता त्या लोकांना अमेरिकेत ठराविक जागा दिली आहे. नंतर ब्रिटिशांविरुद्ध युद्ध होऊन अमेरिका हे स्वतंत्र राष्ट्र तयार झालं, व तेव्हापासूनचा दोनशे वर्षांचा इतिहास आहे.

त्यावेळेपासून बाहेरून लोक येतच आहेत. पण ते बहुतेक सर्व युरोपियन आहेत. भारतीय लोकांप्रमाणे नसली तरी त्यांचीही काही संस्कृती आहे, धर्म आहे व हे सर्व मनापासून मानणारेही आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया खंडातीलही अनेक लोक इकडे आली. गुलाम म्हणून आफ्रिकेतून आणलेली लोक होतीच. आता गुलामी गेली असली तरी त्यांची प्रजा इथे आहेत. अशा तऱ्हेने अमेरिकन लोक म्हणजे जगातील कानाकोपऱ्यांतून आलेल्या लोकांचे मिश्रण असल्याने अनेक तऱ्हा पाहायला मिळतात. हे मिश्रण सर्वच सुंदर न होता ते थोडं गढुळलेलं झालेलं आहे. मूळचा रंग शोधून काढणं अशक्य आहे. जागेची विपुलता, निसर्गाचा वरदहस्त व दुसऱ्या महायुद्धानंतर आलेली सधनता ही मुख्य कारणे तर आहेतच. पण अमेरिका म्हणजे भारताप्रमाणेच लोकशाही राज्य आहे. दोन्हीही देशांत व्यक्तिस्वातंत्र्याला मान दिलेला आहे. आणि त्यामुळे कुटुंब पद्धती ढासळून पडत आहे. त्याग हा शब्द आता बराचसा नाहिसा होत चालला आहे. आर्थिक स्वातंत्र्य यायला लागल्यावर भारतातही, विशेषत: शहरातून बायकांना स्वत:च्या आस्तित्वाची जाणीव होऊ लागली आहे. जरी आर्थिक स्वातंत्र्य आले तरी जागेची विपुलता शहरांत तरी नाही. त्यामुळे प्रेम असो वा नसो नवरा-बायको एकत्रच राहातात. अमेरिकेत “आजचा दिवस खरा” किंवा “आयुष्य हे एकदाच जगायचे आहे” हे कटु सत्य कळल्यामुळे एकत्र राहाणे सुखाचे नसेल तर विभक्त होतात. दुसरी जागा मिळणे फारसे कठीण नसले तरी विभक्त झाल्यानंतर पैशाचे खूप नुकसान होते. लहान मुलांच्या मनावर झालेल्या परिणामाची किंमत तर पैशात करणे कठीणच आहे. इतक्या लहान वयात मनावर आघात झाल्याने चांगल्या-वाईटावरचा त्यांचा विश्वासच बरेचदा उडतो. सर्व नीतिमूल्ये गुंडाळून ठेवली जातात व बाहेरच्या जगात कुणाच्याही गोड बोलण्याला वा क्षणिक सुखाला बळी पडतात. त्याच्या परिणामाची कल्पना नसते, असं नाही पण त्याच्या खोल विचार करण्याइतकी maturity प्रगल्भता वयाने फार लहान असल्याने आलेली नसते. अशा मुलांपासून तयार झालेल्या पुढच्या प्रजेचे हाल तर विचारायलाच नकोत. मुळात ही मुलं स्वभावाने वाईट असतात असं नाही. पण नव्या बाळाची जबाबदारी घ्यायला नक्कीच समर्थ नसतात. त्यांचे स्वत:चे शिक्षण पुरे झालेले नसते. त्यामुळे नोकरी मिळणेसुद्धा कठीण असते. मिळेल ते काम करून कसंबसं राहातात. ही मुलंही लग्न करतातच असं नाही. ती कधी करतात, कधी लग्नाशिवाय एकत्र राहातात तर कधी बाळाच्या आजीकडेच मुलगी राहाते.

यातील सर्व गोष्टी प्रत्येक विभक्त कुटूंबात घडतातच असे नाही. आईवडिलांना ड्रग्सचे किंवा पिण्याचे व्यसन असेल तर मुलंही तेच करू शकतात किंवा यातूनच गुन्हेगारी प्रवृत्तीकडेही वळतात. इकडे काका-मामा, वा अन्य नातेवाईक मुलांना दिसतीलच असं नाही. किंबहुना असतीलच असंही नाही. त्यामुळे मन मोकळे करून बोलायलाही कुणी नाही. म्हणून तर मानसशास्त्राच्या डॉक्टरांची इकडे चांगली चलती आहे.

आपण सर्व माणसंच·असल्याने यातील कोणतीच गोष्ट भारतात नाही असं नाही. पण प्रमाण अत्यल्प आहे. अगदी असह्य झालं तरच बाई बाहेर पडते व तेही तिला एकटीला राहाणे शक्य असेल. (पैशाच्या व जागेच्या दृष्टीने) तरच समाजाची व नातेवाईकांची बरीच बंधने भारतात असतात. भारतातूनच अमेरिकेत आलेल्या लोकांतही घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढले आहे. अमेरिकेत या विषयावर मोकळेपणाने बोलता येते. भारतात आता मोठ्या शहरांतून तशी उदाहरणे दिसू लागली आहेत तरी लोकसंख्येच्या मानाने ती कमी आहेत. एकत्र कुटुंबाची पद्धत इकडे मुळीच नाही. १८-२० वर्षांच्या दरम्यान मुले घराबाहेर सोय बघतात ती कधी शिक्षणामुळेही होते तर नोकरी त्याच गावात असली व घर कितीही (आईवडिलांचे) मोठे असले तरी आपली स्वतंत्र जागा घेऊन राहातात. Arranged marriage म्हणजे आई-वडिलांनी लग्न जमवण्याची पद्धत नाही. प्रत्येक मुलाला व मुलीला स्वत:चा जीवनसाथी निवडावा लागतो. त्याकरता डेटिंग करावे लागते. एकमेकांचा "चांगला" परिचय झाल्याशिवाय लग्न करत नाहीत. फार थोड्या मुली लग्नापर्यंत कुमारिका राहातात. कधी कधी लग्न न करता नुसतेच एकत्र राहातात व मग कधी लग्न करतात तर कधी तशीच विभक्त होतात. मुलांना शाळेतच लैंगिक शिक्षण दिले जाते.

शाळेत शिक्षकांशी अदबीने बोलायची पद्धतच इकडेही आहे. पण त्यातही एकप्रकारचा मोकळेपणा आहे. मुलांच्या मनात काहीही शंका आली तरी शिक्षकांना किंवा आई-वडिलांना विचारायला ती कचरणार नाहीत. शिक्षकाला 'Sir' असे न म्हणता. Mr. म्हणून आडनावानेच हाक मारले जाते. शिक्षिकेला Madam न म्हणता Miss किंवा Mrs व आडनावानेच हाक मारले जाते. या व्यतिरिक्त इतर ओळखीच्या लोकांना, नावानेच हाक मारली जाते.

हे सर्व झाले तरी चांगली कुटूंबेही इकडे पाहायला मिळतात. प्रत्येक घरामागे

शाळेचा Tax आकारल्यामुळे शाळेत सर्व सोई उपलब्ध आहेत. पुस्तके सहज मिळू शकतात. मुलांना सर्व प्रकारचे शिक्षण म्हणजे पोहोणे, ड्रायव्हिंग, स्वयंपाक वगैरेसुद्धा, शाळेत दिले जाते. मुलांचे करणे हे काम फक्त आईचेच असे न धरता वडीलही त्यांत खूपच मदत करतात व बाकीच्या कामांनाही मुलांकरता खास वेळ दिला जातो. मुलांनी वेळेवर झोपणे व वेळेवर उठणे याकडेही कटाक्षाने लक्ष दिले जाते. आई-वडील कितीही श्रीमंत असले तरी मुले १०-१२ वर्षांपासून काहींना काही काम करून पैसे मिळवू लागतात. अर्थात बरेचवेळा आई-वडिलांना त्या कामांत मदतही करावी लागते.

अनेक कुटूंब दर आठवड्याला म्हणजे रविवारी सकाळी न चुकता चर्चमध्ये जातात. ज्यू लोक त्यांच्या देवळात जातात. साधारणपणे चर्च ठरलेलेच असल्याने, त्यानिमित्ताने लोकही भेटतात व अनायसे Socialization होते. त्यांच्या पद्धतीने लग्नेही चर्चमध्येच होतात. मग पार्टी कोणत्याही हॉटेलांकत असू दे. बेबी झाल्यावरही नंतर चर्चमध्ये नेऊन आणतातच व आयुष्याचा शेवटचा निरोप म्हणजे मृत व्यक्तीलाही दफन करण्यापूर्वी चर्चमध्येच नेले जाते. चर्चमध्ये बेबीकरता Godmother व Godfather सांगितले जातात. अर्थात ते आई-वडिलांनी आधीच निवडलेले व विश्वासाचे असतात. आई-वडिलांना काही झालेच तर हे आईवडील (गॉडमदर, गॉडफादर) बेबीची काळजी घेतात. सर्व समारंभाच्यावेळी त्यांची शिस्तबद्धता वाखाणण्यासारखी असते. वेळेची किंमत फार आहे. त्यामुळे सर्वजण वेळेवर येऊन वेळेवर जातील. ऑफिसमध्येही यायची वेळ, जायची वेळ, लंचची वेळ, कॉफीची वेळ सर्व काही ठरलेले असते व ते कडक शिस्तीने पाळले जाते.

न्युयॉर्क हे शहर गुन्हेगारीमध्ये बदनाम झालेले आहे. एकंदरीत सर्वच मोठ्या शहरांतून गुन्हेगारीचे प्रमाण नाहीतरी जास्तीच असते. तिथेच घडलेली ही खरी गोष्ट आहे. रेल्वे स्टेशनवर उभा असलेला एक माणूस गाडीच्या रुळावर पडला (बहुधा चक्कर येऊन असेल.) पाच-सहा मुलांनी ते पाहिलं व त्याला बाहेर काढायला रुळावर उडी टाकली. गाडी यायची वेळ झाली होती व ती यायच्या आंत त्या मुलांना त्या माणसाला बाहेर काढायला जमले नाही. गाडीची शिटी ऐकली. मुलं भराभर परत प्लॅटफॉर्मवर चढली. पण त्यातील एक मुलगा त्या माणसाबरोबर दोन रुळांमध्ये राहिला. गाडी गेल्यावर परत बाकीची मुलं खाली उतरली व त्यांनी त्या माणसाला बाहेर काढलं. न्यूयॉर्कमध्येच अशी जिवाला जीव देणारी मुलेही आहेत.

वरील प्रसंगांत त्या मुलांनी जे शौर्य दाखविले तेही अमेरिकन संस्कृतीचाच भाग म्हणावा लागेल. अमेरिकन संस्कृतीच्या इंद्रधनुष्यातील हा एक सुंदर रंग आहे. असे अनेक सुंदर रंग इथे दिसतात. स्वत:ला मूल नसलेले तर दत्तक घेतांना दिसतीलच पण मूल असूनसुद्धा आणखी दत्तक घेणारे आहेत. हॉस्पिटलमध्ये रेडक्रॉसमध्ये, नर्सिंगहोममध्ये जिकडे तिकडे सोशल वर्क म्हणून ६० वर्षावरील बायका काम करताना दिसतात. अम्ब्यूलन्स चालवायलाही अशी फूकट काम करणारी मोठी माणसे व तरुण मुले आहेत. या लोकांच्याकडे मेडिकलचे ज्ञानंही आहे. त्यामुळे पेशन्ट हॉस्पिटलमध्ये पोचायच्या आधीच काही उपाययोजना आवश्यक असेल तर तीही ते करू शकतात. श्रीमंत लोकांच्या देणग्यांवरच चाललेली ही सर्व्हिस इतकी चांगली आहे की त्याची किंमत पैशांत करता येणारच नाही.

संस्कृतीचा विचार करायचा म्हणजे धर्माचा विचार आलाच पाहिजे. सध्यातरी अमेरिकेमध्ये मुख्य धर्म ख्रिश्चन आहे. ज्यू धर्माची लोकंसुद्धा खूप आहेत. पण धार्मिक सुट्ट्या फक्त दोन आहेत. पहिली एप्रिलमध्ये येते. ती ईस्टरची सुटी व दुसरी म्हणजे ख्रिसमसची सुट्टी. बाकी बुद्ध, हिंदू, मुस्लीम, जैन, पारशी वगैरे सर्व धर्माची लोक आहेत. सर्व धर्मीय स्वत:च्या सोईने, सवडीने, आपापले सण साजरे करतात. सुटी घेता येत नाही म्हणून शक्यतो शनिवारी किंवा रविवारी कार्यक्रम करतात. मोठ्या शहरांतून भारतीय लोक तर आपला स्वातंत्र्यदिनसुद्धा साजरा करतात. आजकाल काही कुटूंबे घरी गणपती आणतात व सर्व ओळखीच्या लोकांना बोलवून गणेशोत्सव एकत्र साजरा करतात. जवळजवळ सर्व ठिकाणची महाराष्ट्र मंडळे गणपती व दिवाळी साजरी करतात. आजकाल संक्रांतसुद्धा करू लागली आहेत.

ख्रिसमस हा सण मात्र सबंध अमेरिका साजरी करते. आपल्याकडील दिवाळीसारखाच तो सण असतो. फक्त फटाके वाजवत नाही. आवाजाचे नाहीत व बिनआवाजाचेही नाहीत. पण सर्व ठिकाणी रस्त्यावर, डिपार्टमेंट स्टोअर्समध्ये घरी-दारी सर्व ठिकाणी दिव्यांची सुंदर रोषणाई केलेली असते. नातेवाईक व मित्रमैत्रिणींत (बक्षिसे) दिली-घेतली जातात. बहुतेक सर्व ऑफिसमध्ये लोक निदान चार दिवसांची सुटी घेऊन आपल्या दूर राहाणाऱ्या नातेवाईकांकडे एकत्र जमतात.

दुसरा साजरा होणारा उत्सव म्हणजे Thanks giving. हा दिवस नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात गुरुवारी साजरा केला जातो. याही वेळी जितक्या लोकांना जमेल तितके लोक शुक्रवारी रजा घेऊन लांब राहाणारे नातेवाईक व मित्रमंडळी एकत्र जमून टर्कीचे जेवण करतात. कोलंबस अमेरिकेला येण्यापूर्वी जे अमेरिकेत राहात होते. त्यांनाच Indian म्हटले गेले. नंतर अनेक युरोपियन लोक अमेरिकेत आले. त्यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवले व प्रथम जरी त्यांना मूळच्या अमेरिकने - Indian लोकांशी लढावे लागले तरी नंतर दोन्ही बाजूंनी समेट झाला. तो दिवस Thanks Giving म्हणून साजरा केला जातो. सर्व अमेरिका मनापासून हा दिवस साजरा करते.

ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी म्हणून एक दिवस साजरा केला जातो. आपल्याकडील हा दिवस शिमग्यासारखाच फक्त शिव्या देत नाहीत व रंग उधळत नाहीत. तरुण मुलं मुली व लहान मुलांचा हा दिवस जास्त आवडीचा आहे. तांबड्या भोपळ्याचे या दिवशी महत्त्व आहे. (जसे आपल्याकडे संक्रांतीला तीळाचे असते तसेच काहीसे) तोंडावर निरनिराळ्या प्रकारचे mask चढवितात. काही ठिकाणी मोठ्या पाट्र्या सुद्धा होतात. लहान मुलं-मुली आपल्या आसपासच्या घरी व जवळच्या मित्रांच्या घरी जातात. त्यांना चॉकोलेट-कॅंडी असे काहीतरी देतात. याशिवाय ४ जुलैला अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो. त्या दिवशी काऊंटी (Country) व शहर (City) मधील सरकारी लोक एका ठरलेल्या मोकळ्या मैदानावर फटाके (बिनआवाजाचे) लावतात. त्याला Fire work असे म्हणतात. पाहाणाऱ्याच्या तोंडून उत्स्फूर्त उद्‌गार निघावेत इतके ते सुंदर दिसतात. सर्व लोकांना ते आकाशात दिसू शकतात. पण सामान्य जनांना त्या फटाके लावण्याच्या ठिकाणापासून लांब ठेवतात. ते लावण्याची वेळ आधीच वृत्तपत्र व दूरदर्शन वर सांगितली जाते. बालगोपाळांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत सर्वांनी उपभोगावे असे हे फायर-वर्क असते.

याशिवाय बाकी सर्व लोक म्हणजे इटालियन, ग्रीक, भारतीय वगैरे. आपापल्या पद्धतीने साधारणपणे उन्हाळ्यात आपापले उत्सव करतात. त्याबद्दलही आधीच पेपरमध्ये माहिती येते. वेगवेगळे अन्नाचे स्टॉल्स असतात. नृत्याचे, गाण्याचे कार्यक्रम होतात. कुणीही येऊन या जत्रांचा आनंद उपभोगू शकते.

अशा तऱ्हेने एकंदरीत चांगल्यापैकी आयुष्य उपभोगत असताना मग मी

माझ्याच मनाला प्रश्न केला, की आमची पहिली पिढी जी अमेरिकेला गेली ती इतके वर्ष होऊनही असं नक्की काय भारताबद्दल "मीस" करते ? अजूनही भारताबद्दल नेमकी कसली ओढ बाळगून आहे ? सर्व सणवार तिकडे होतात. नातेवाईक नाही तरी चांगल्यापैकी मित्रपरिवार जमा केलेला आहे. अनेक संधी मिळाल्यामुळे बहुतेकजण त्याही बाबतीत तृप्त आहेत. आणि तरीही आमच्यापैकी कुणी आता भारतात जाणार आहे असं म्हटलं कि इतका आनंद होतो. मनाच्या कोपऱ्यांत थोडी असूयाही वाटते की आपल्याला जाता येत नाही. या सर्व भावनांना क्वचित् अपवाद असतील. पण अगदीच क्वचित् आहेत.

त्याचं मला विचारान्ती मिळालेलं उत्तर असं आहे - त्यांच्याशी सर्वच सहमत होतील, अशी माझी अपेक्षा नाही — कोणत्याही भावनात अमेरिकन माणूस गुंतून पडत नाही. कदाचित परिस्थितीने तसं बनायला होत असेल. कारण भारतीय लोकांची पुढची पिढीसुद्धा आता तशीच बनत आहे. लहानपणापासून नोकरीला सुरुवात, मोठेपणी त्या बदलत जातात. मोठे झाल्यावरही एकच नोकरी करणारे फारच कमी लोक आहेत. त्याही लोकांनी एकच नोकरी केली तरी त्या कंपनीत बाकीचे लोक बदलतील. यामुळे निदान ऑफिसच्या बाबतीत तरी कायम स्वरूपाची मैत्री मिळणे फार कठीण असते. आता घरगुती जीवनाचा विचार केला तरी लहानपणापासून घरं बदलायची (वडिलांच्या नोकरीमुळे) काही वेळ येतेच. नोकरीमुळे नसेल तर आई-वडिलांचा घटस्फोट असू शकेल. नंतर १८-२० वर्षांची मुलं-मुली शिक्षणाकरता अथवा लग्न करून घराबाहेर पडतात. मग त्यांच्याही आयुष्यात येणाऱ्या अडचणींमुळे त्यांना घरे बदलावी लागतात. त्यामुळे भारतात जे पिढ्यान पिढ्या शेजारी आयुष्य घालवलेले असतात. तसं दृष्य वा तशी मैत्री इथे (अमेरिकन) होऊच शकत नाही. त्यामुळेच असेल कदाचित पण कोणत्याही गोष्टींत भावना गुंतवून ठेवणे फारसे परवडणारे नसते. घर घेतानाही त्यामुळे आपल्या स्वतःच्या आवडीपेक्षा ते विकताना सोपे जाईल का किंवा त्याची किंमत वाढेल का असाच विचार जास्त असतो. नोकरी सोडली की परत त्या लोकांशी संबंध नाही व जागा सोडली तरी तीच हकीकत आणि म्हणूनच सतरा वर्ष चाळीत राहून अजूनही त्या आठवणी जितक्या गोड वाटतात, तितकं, त्याहून अधिक काळ एका घरात अमेरिकेत राहूनही संवेदना एक प्रकारच्या थंड वाटतात. कारणं काही असू दे पण हा फरक भारत व अमेरिकेत आहेच. आता परिस्थिती (भारतीय-अमेरिकन) अशी

झाली आहे की पुढची पिढी तर बरीचशी अमेरिकन झाली आहे. ते अपरिहार्यही आहे. भारतातही परिस्थिती खूप बदललेली दिसत आहे. त्याही गोष्टीला मी परिस्थितीच जबाबदार मानते. (निदान मोठ्या शहरांतून तरी) खेड्यापाड्यांतूनही बदल झालेला दिसला तरी अजून आपली संस्कृती टिकून आहे.

— अमेरिकेत राहूनही भारताबद्दल 'ओढ' वाटण्याचे हेच खरे कारण आहे.



# आचार - विचार

१९८६ पासून वारंवार भारत भेटीला येत आहे. १९७२ ते १९८६ संसारात अगदी बुडून गेले होते. मुलीचे लग्न १९८० साली झाले. १९८६ साली माझा मुलगा इंजीनिअर झाला व R.O.T.C. हा एअर फोर्सचा कोर्सही त्याने संपवला. त्या १४ वर्षांच्या काळात मला कधीही भारतात कायमचे परत येऊन राहायचा विचार रुचला नाही. तात्पुरते भेटीला यायला मात्र आवडत असे. पण मुलाची जबाबदारी संपली व तो ५५० मैलांवर नोकरीकरता दूर गेला. मुलगी आधीच दुसऱ्या दिशेने ३७५ मैलांवर गेलेली होती. जी जबाबदारी संपण्याची इतके दिवस मी वाट पाहात होते, तो दिवस उजाडल्यावर एकूणच पोकळी व रितेपणा वाटू लागला. माझ्याच समवयस्क मैत्रिणी अजून या जबाबदाऱ्यांतून मुक्त झालेल्या नव्हत्या. त्यामुळे नेमके काय करावे सुचेना. नोकरीत मन रमेना. सर्वकाळ माझी नोकरी लेखाविभागात होती व आता सर्व संगणकीकरण झाल्यामुळे त्यात तितकी मजा राहिली नव्हती. माझ्या भारतभेटी वाढत गेल्या. तसे मन इकडेच जास्ती रमू लागले. आता तर माझ्या मनात तुलनाही येत नाही इतकी मी परत भारतीय झाले आहे.

माझे एक नातेवाईक मुंबईहून पुण्याला राहायला जायच्या विचारात होते. प्रथमच जागा घेऊन व आईला घेऊन पुण्याला आले. त्यावेळी त्यांना पुण्याला यायची कोण घाई झाली होती. पण या अगोदरचे आयुष्य अगदी निर्विकार व संथ गेल्यामुळे पुण्याला प्रथम आल्यावर त्यांच्या आईचे तिकडे मन रमेना. आधी

पुण्याला यायची घाई झाली होती व एकदा आल्यावर सारखी मुंबईची आठवण यायला लागली. सर्व आल्यागेल्यांसमोर मुंबईच्या आठवणी उगाळल्या जाऊ लागल्या. खरं म्हणजे मुंबईपेक्षा ही पुण्याची जागा मोठी होती. हवा-उजेड भरपूर आहे. पाणी चोवीस तास आहे. पण छे ! चांगलं काही दिसतच नाही. खरं म्हणजे जड मला जायला पाहिजे होतं. माझ्या अमेरिकेतील जागेच्या तुलनेने एकचतुर्थांशच माझी येथील जागा आहे. बाहेरच्या बगीचा तर सोडूनच द्या. गॅस सिलेंडरची अडचण मी भारतात असताना नव्हतीच. अमेरिकेत ते चांगलेच सुख आहे. कुठच्याही घराबरोबर किंवा अपार्टमेंटबरोबर इलेक्ट्रीकच्या किंवा गॅसच्या चार शेगड्या व ओव्हन हे असतेच. त्यामुळे या अडचणींची सवय नव्हती. रॉकेलेचीही तीच अवस्था हे सर्व ताप-मनःस्ताप असूनही इकडून पळून अमेरिकेला परत जावे, असे मात्र कधी वाटले नाही. याचा अर्थ असा मात्र नाही की अमेरिका मला आवडत नाही. किंबहुना परिस्थितीबरोबर कमीत कमी तक्रार करून मिळतेजुळते घ्यायचे प्रशिक्षणच मला अमेरिकेत मिळाले. पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी जमवून घ्यायला इतकी अडचण वाटते तर साता समुद्रापलीकडे जाऊन जिथे आपलं कुणीही नाही; भाषा वेगळी, अन्न वेगळे, चालीरिती वेगळया, हवामान, कपडेलत्ते सर्वच वेगळे. तक्रार तरी करणार कुणाजवळ ? मुलगी सासरी गेली की तिलाच १०० टक्के बदलायला लागते, तरच ती नवीन कुटूंबात रुजू शकते. तसेच नवीन प्रांतात, नवीन देशांत जाणाऱ्यांचे आहे. पण गंमत अशी होते की सासरच्या पद्धतीप्रमाणे आपल्या आवडी निवडी बदलल्या तर थोडे दिवसांनी माहेरी गेल्यावर मग सासरच्या आठवणी-पद्धती एकदम विसरायला होऊ शकतील का ? प्रयत्नांनी त्या बाणवून घेतलेल्या असतात. त्याची आठवण व काही प्रमाणात तुलनाही अपरिहार्यच नाही का ?

हीच परिस्थिती परदेशी गेलेल्यांची होते. आपल्या भारतीयांची सुरुवातच चहाच्या कपाने होते. आपल्याला इकडे भरपूर साखर, दूध घालून तो भरपूर उकळून प्यायची सवय असते तर तिकडे Tea bags (चहाच्या पुड्या) कपात एक पुडी टाकायची. किटलीत पाणी उकळायचे व त्या पुडीवार ओतायचे. दूध गायीचे म्हणजे म्हशीच्या दुधापेक्षा चांगलेच पातळ असते. त्या चवीची सवय होईपर्यंत बरेच दिवस जातात. तिथल्या अन्न-पाण्याची सवय हळूहळूच होते.

अमेरिकेत गेल्यावर अगदी साधी गोष्ट कुणी कुणाकरता केली तरी 'Thank

you' म्हणावेच लागते. आपल्याकडे तशी मुळीच पद्धत नाही. आपल्याला कुणी जवळपास असताना शिंक आली किंवा खोकला लागला तर 'excuse me' म्हणायचे असते. ढेकर आली तरी तसेच म्हणायचे असते. शिंक किंवा खोकल्यातून जंतू बाहेर पडतात व ते सांसर्गिक असल्याने दुसऱ्याला अपायकारक होऊ शकतात. म्हणून ती पद्धत असावी. शिवाय खोकताना किंवा शिंकताना तोंडावर रुमालही धरायचा असतो की जेणेकरून जंतू निदान जास्ती पसरू नयेत म्हणून. आपल्यासमोर कुणाला शिंक आल्यास त्या व्यक्तीला आपण 'God bless you' असे म्हणायचे असते. मला प्रथम ते काय म्हणतात तेच कळत नसे. मग माझ्या एका मैत्रिणीला विचारल्यावर तिने मला सांगितले कि, 'शिंक येणं' हे सर्दीचं लक्षण. फार सर्दी होऊन काही गंभीर आजार वगैरे होऊ नये म्हणून. God bless you! त्यावर शिंक आलेल्या माणसाने 'Thank you' म्हणायचे असते. प्रथम मला 'God bless you' म्हणताना खूप हसू यायचे. आता सवय झाली. त्याचप्रमाणे मी इकडे आल्यावर मला जर ढेकर आलीतर मी excuse me (मला माफ करा) असे म्हटले तर माझी बहीण हसून म्हणते, 'अग, तुझ्या या excuse me म्हणण्यानेच आमच्या लक्षात येतं कि तू ढेकर दिलीस म्हणून नाहीतर आम्हाला ती कळली सुद्धा नव्हती.' मलाही ते समजू शकते पण परत गेल्यावर सवय गेलेली नको म्हणून या सवयी मी आता मोडू इच्छित नाही. कुणालाही मनापासून 'थँक यू' म्हटले तर त्याचा होणारा जादूच्या कांडीसारखा परिणाम मी अनुभवला आहे. ते कृतज्ञतेचे शब्द आहेत. ते शब्द, शब्द न ठेरता आपल्या हृदयांतील कृतज्ञतेच्या भावना त्यांत प्रकट झाल्या पाहिजेत. मला असं वाटतं कि तुमच्या भावना चांगल्या आहेत तोपर्यंत जगांतील सर्वच भाषा गोड आहेत. कोकणच्या माणसाने एखादी शिवी हासडून काही स्पष्टपणें म्हटले तरी त्यांत एकप्रकारची कौतुकाची/आपलेपणाची भावना असते व म्हणून त्याचा मुळीच राग येत नाही.

दुसरी मला आवश्यक वाटणारी आपण चारचौघांत असतानाची पद्धती म्हणजे सर्व लोकांना समजेल अशाच भाषेत बोलावे. कल्पना करू या की आपल्यासमोर दुसरी कुणीतरी दोघंजण आपल्या ओळखीचीच व ग्रुपमधलीच पण आपल्याला अजिबात न कळणाऱ्या भाषेत बोलताहेत तर हे मुद्दाम आपल्याला कळू नये, असे काही बोलताहेत असे वाटणे. हे खरेच असे असेल व मुद्दाम कुणाला कळू नये असे बोलायचे असेल तर ते वेगळ्या ठिकाणी वेगळ्या वेळी बोलता येते. याबाबतीत मी

बऱ्याच जणांकडून ऐकले आहे की जसं खूप जणं करतात. खरं म्हणजे आपण मराठी माणसंच त्या मानाने तसं कमी करतो. खूप जणांनी एक चूक केली तर आपणही का करू नये हे argument मला कधी पटलेच नाही व इथे भाषेच्या अभिमानाचाही प्रश्न आहे, असे मला कधी वाटले नाही. विशेषत: आपण दुसऱ्या देशात गेल्यावर तरी तसं दाखवायची काहीच जरुरी नाही व अगदीच काही कारणाकरता तसे बोलायचे झाल्यास ज्यांना आपली भाषा कळत नाही अशांना excuse me म्हणून मग बोललं तर त्यांनाही त्या आपल्या भाषा ऐकायला आवडतात. कुतूहलाने तेही काही शिकायचा प्रयत्न करतात व ऐकूणच दुरावा कमी होतो, असा माझा अनुभव आहे.

दोन किंवा अधिक माणसे बोलत उभी असली, ती आपल्या ओळखीचे असोत वा नसोत पण आपल्याला त्यांच्या मधून जाण्याची वेळ आली तर 'excuse me' म्हणावे लागते नाहीतर ते उर्मटपणाचे वाटते. कुणाचे आपल्याकडे लक्ष वेधून आपल्याला कुणाला काही शंका विचारायची असली तरी 'excuse me'नेच सुरुवात करावी लागते.

आणखी एक गोष्ट मी अमेरिकेला येऊन शिकले. मला वाटतं सर्वच पाश्चिमात्य देशांत ती पद्धत आहे.. कुणाचं काही आवडलं म्हणजे गाणं किंवा स्वयंपाक किंवा एखादी कला तर ते मोकळेपणानें त्या व्यक्तीला सांगणं. मला तसं सांगावं असं नेहमीच वाटे पण स्वभाव थोडाफार बुजरा होता. चार माणसांत जायची वेळही फार आली नव्हती. कुणा मोठ्या कलावंतांसमोर जायची वेळ आली तरी बोलायचं धारिष्ट्य होत नसे. आता मला हे लिहितानासुद्धा गंमत वाटत आहे. पण त्याचा अर्थ "कुणा बड्या व्यक्तीच्यासमोर पुढे पुढे करणे" असाही होत असे. दोन प्रकारच्या वागणुकीमध्ये फरक आहे. दुसऱ्या सामान्य लोकांना तुच्छ लेखून फक्त नावाजलेल्या व्यक्तींच्याच तैनातीत राहाणं हे पुढे पुढे करणं होऊ शकेल. पण सर्वांशीच त्याच आदराने वागून एखाद्या बाबतीत तिच्या चांगल्या गुणांची पावती देणं मला वाटतं फार आवश्यक आहे. याकरता खूप मोठा कलाकारच पाहिजे असं नाही, तर साधं कुणाकडे जेवायला गेल्यावर त्या बाईने अथवा अन्य कुणी जे आपल्याकरता कष्ट घेतलेले असतात, जेवण केलेले असते ते आवडले किंवा छान झाले असे म्हणायला काहीच हरकत नाही. मग ते आवडले नसले तरी त्याची अवास्तव स्तुती नको पण सर्वसाधारणपणे "सर्व छान झाले आहे", असं म्हणायला

काहीच हरकत नाही. याबाबतीत प्रश्न येतो फक्त मनाच्या श्रीमंतीचा, पैशाचा नाही. आपल्याकडील 'अन्नदाता सुखी भव' हे म्हणण्याचा प्रधान याचकरता नाही का ? भावना एकच आहे. परिस्थितीत थोडासा फरक इतकाच झाला आहे की, पूर्वीच्या काळी एकत्र कुटूंबात दोघी-चौघींनी स्वयंपाक केला असण्याची शक्यता आहे. शिवाय बायका-पुरुषात इतकं direct बोलणंही होत नसेल. हे घरगुती पातळीवर झालं. पण ऑफिसमध्येही हाच attitude खूप महत्त्वाचा ठरू शकतो. वेळोवेळी हाताखालच्या माणसांना त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल appreciate करत गेले तर त्यांनाही काम आणखी चांगले करायला हुरूप येतो. त्या उलट ऑफिसरने किंवा सुपरव्हायझरने किंवा मॅनेजमेंटने आपल्याकरता काही चांगले केले व ते आपण acknowledge केले म्हणजे त्यांच्याजवळ तसे स्पष्ट बोलून दाखवले तर त्यांनाही ते तितकेच आवडते. यामुळे शंभर टक्के जरी नाही तरी बऱ्याच प्रमाणात हेवे-दावे व दुष्ट प्रवृत्तींना आळा बसू शकतो.

■ ■ ■



# जीवन रहाणी

थंडीचे सहा महिने अगदी घरात बसून राहावे लागल्याने अमेरिकन लोक उन्हाळ्याचा एकही दिवस वाया घालवणार नाहीत. Sunny-day म्हणजे निरभ्र आकाश व भरपूर सूर्यप्रकाश ही पर्वणीच. आपण भारतीय जितकं उन्हात जायचं टाळतो त्याउलट हे लोक समुद्र किनाऱ्यावर किंवा गोल्फ कोर्सवर सबंध दिवस उन्हात घालवतात. बिकिनीसारखे कमीतकमी कपडे घालून बायकाही जमेल तेव्हा बीचवर जायला जमले नाही तर घराच्या मागच्या अंगणात आरामखूर्ची टाकून त्वचा टॅन (अती उन्हाने भाजून त्वचेचा रंग बदलतो) होण्याकरता अक्षरश: वाळत टाकल्यासारख्या कुणी वाचत तर कुणी झोपून राहातात. मी ज्यावेळी प्रथमच अमेरिकेत गेले त्यावेळी तो प्रकार बघून थक्कच झाले. माझ्या एका अमेरिकन मैत्रिणीला अक्षरश: उन्हात भाजलेली मी पाहिली आहे. तिला स्वत:लाही त्या त्वचेला स्पर्शही करता येत नव्हता. नेहमी गोरीपान दिसणारी तिची त्वचा चांगलीच डार्क ब्राऊन झाली होती व त्याचा तिला कोण अभिमान वाटत होता. मी माझ्या दुसऱ्या अमेरिकन मैत्रिणींना याचे कारण विचारले तर त्यांना वाटले की अगदी गोऱ्यापान पांढरट रंगापेक्षा अशी ब्राऊन स्क्रीन म्हणजे आपण ज्याला गव्हाळी रंग म्हणतो तशी त्वचा असणं म्हणजे सुदृढतेच म्हणजे पर्यायाने अधिक सुंदरतेचं लक्षण मानलं जातं. गंमत अशी की असं मुद्दाम जास्तीत जास्त वेळ उन्हात राहून दरवर्षी उन्हाळ्यात स्वत:ला भाजून घेऊनही ही मंडळी थंडी सुरू होताच परत

आपल्या मूळ वर्णावर म्हणजे गोऱ्यापान रंगावर जातात. आणि मग मला ऑफिसमध्ये काहींना विचारले, "How can you manage to keep your skin colour always brown." आणि मग मी त्यांना अभिमानाने सांगायची "I am gifted Jim, I am gifted

रात्रीच्या जेवणाकरता ग्रोसरी स्टोअर्समध्ये फ्रोजन पॅकेटस् सुद्धा मिळतात. अर्थात ती अमेरिकन पद्धतीची असल्याने त्यांच्यात मुख्यत्वे मटण किंवा मासे असतात. Peas म्हणजे आपल्याकडे मटार म्हणतात, ते किंवा उकडलेले गाजर, mashed potato म्हणजे बटाटा उकडून तो कुस्करून त्याच्यात काही प्रकारचे सॉस वगैरे घालून केलेले असते. प्रत्येक ट्रेत एका माणसाला पुरेल इतके अन्न असते. त्यात वेगवेगळे प्रकार मिळतात. अमेरिकेतही जगाच्या कानाकोपऱ्यांतून आलेली माणसे असल्याने खाण्याचे प्रकारही तसेच मिळतात. जास्तीत जास्त सर्वांचे आवडीचे म्हणजे इटालियन - कि ज्यांच्यात चीज जास्त वापरतात व टोमॅटोचे सॉस जास्त वापरतात. दुसरी आवड म्हणजे मेक्सीकन. यात आपल्यालाही तिखट लागतील इतक्या झणझणीत हिरव्या मिरच्या असतात. चिज असते, मक्यापासून बनविलेले टॉर्टीलाज व बऱ्याचशा आपल्या पद्धतीच्या पोळया असतात. अर्थात मांस / कोंबडी पण असतेच. भातही थोडा फार दोन्ही प्रकारच्या जेवणात असू शकतो. चिनी अन्नप्रकारसुद्धा बराच आवडीचा आहे. मला वाटतं आजकाल भारतीयांनासुद्धा त्याबद्दल बऱ्यापैकी माहिती आहे. ग्रोसरी स्टोअरमध्ये दुसऱ्या मिळणाऱ्या वस्तू म्हणजे तेथील बेकरी डिपार्टमेंट. येथे विविध प्रकारचे केक्स मिळतात. साधारणपणे बिस्किटांना लागणाऱ्या पिठाप्रमाणे एक प्रकारचे पीठ तयार मिळते. हे तयार असते ते अमेरिकन पद्धतीच्या जिनसांकरता. पण आपल्या पद्धतीच्या जिनसांकरताही वापरता येते. ह्याच्या गोळ्याही तयार असतात. त्या लाटून त्यात चटणी किंवा भाजी भरून मग ओव्हनमध्ये ठराविक तापमानाला ठराविक वेळ ठेवले की त्यांचा तिखटमिठाचे चिरोटे केळयासारखा किंवा baked सामोश्यासारखा पदार्थ होतो. मांसाहार खाणाऱ्याला त्यात खिमा घालून मटण सामोश्यांप्रमाणे करता येते. भाजलेले व सोललेले दाणे मिळतात, काजू मिळतात. राईस क्रिस्पीठा म्हणजे आपल्या इकडच्या भाजक्या पोह्यांसारखा प्रकार मिळतो. हे सर्व स्वच्छच असल्याने चाळणं, निवडणं हा प्रकार नाही. त्यामुळे Rice Crispies, कॉर्न फ्लेक्स यांसारखी सिरियल्स वापरून अक्षरश: दहा-पंधरा मिनिटांत पाहिजे

तेवढा चिवडा तयार होतो. यांत व्हिटॅमिन्स व दाणे काजू वगैरे घातल्यामुळे शरीर पोषणाच्या दृष्टीनेही कितीही खाल्ल्यास काही अडचण नाही.

अशा तऱ्हेने Genius बायका खूप अमेरिकन - भारतीय प्रकार सोप्या पद्धतीने करू शकतात. भाज्या जवळ जवळ सर्व प्रकारच्या कापलेल्या व स्वच्छ पॅक केलेल्या frozen किंवा Cannel मिळू शकतात. वेगवेगळ्या प्रकारची सूप्स कॅनमध्ये वा सुकवलेली पाकिटांतून मिळू शकतात. या कॅनमधल्या सुपांना फोडणी देऊन तिखट वगैरे घातले तर आपल्याच पद्धतीचे लागते. लग्न न झालेल्या पुरुषांना किंवा विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे जिन्नस अगदी सोप्या पद्धतीने व थोडक्या वेळात करता येतात. Frozen पोळ्याही अमेरिकन पद्धतीच्या, ज्या काहीश्या भाकऱ्यांसारख्या लागतात अशा व भारतीय पद्धतीच्या, भारतीय ग्रोसरी स्टोअर्समधून मिळू शकतात.

भांडी घासायचा एखादे दिवशी कंटाळा आला असेल तर असे फ्रोजन ट्रेज् आणून आपल्या Freezer मध्ये ठेवून द्यायचे, व पाहिजे त्या वेळेला ओव्हनमध्ये गरम करून घ्यायचे. व मग पाहिजे तर ट्रे कचऱ्याच्या पेटींत टाकून द्यायचे. जेवण झाल्यानंतर जे विद्यार्थी असतात ते अभ्यास करतात. ज्यांना अजून मुलंबाळं नाहीत ते टेलिव्हीजन पाहातात किंवा वाचतात किंवा तसेच हौशी असतील तर क्लबमध्ये वगैरे जातात. ज्यांची मुलं लहान आहेत, त्यांचा मुलांच्यातच वेळ जातो व ज्यांची मुलं थोडीफार मोठी झाली आहेत, त्यांच्या काही अभ्यासाशिवायच्या इतर Activities असतात. म्हणजे शाळेव्यतिरिक्त ही मुलं काही ना काही शिकत असतात. अशा मुलांना तिकडे एकटं जाता येत नाही. त्यांना त्यांच्या पालकांनाच गाडीतून घेऊन जावे लागते व परत परत जाणे-येणे अशक्य असल्याने आईला किंवा वडिलांना तिकडेच थांबावे लागते. घरी परत येईपर्यंत झोपायची वेळ होते. या व्यतिरिक्त त्यांना अभ्यासातही मदत करावी लागते. हे कार्यक्रम झाले भारतीय कुटूंबियांचे. या व्यतिरिक्त काहीजण संध्याकाळच्या कॉलेजला जातात. काही ठिकाणी दोघंही नवरा बायको कॉलेज करतात. शनिवार/रविवारचे कार्यक्रम ठरविले जातात. कुणी पाहुणी यायची असल्यास ग्रोसरी. शॉपिंग किंवा लॉंड्री वगैरे शनिवार/रविवार करायची कामे मधल्या वारीच करावी लागतात. ही सर्वसाधारण राहाणी झाली. यात काहीजणांवर कुटूंबाची जास्त जबाबदारी असते. कुणाची आईवडिलांची तर कुणाचे सासूसासरे, बहीण भावंड वगैरे. त्यात कुणी

करमणुकीच्या कार्यक्रमात भाग घेतात त्याची प्रॅक्टीस करणे. कुणाकडे भारतातून येणारे पाहुणे बरेच असतात. हे पाहुणे नात्याचे वा मित्रच असतील असे नाही. नातेवाईकांचे मित्र असू शकतील. मित्रांचे नातेवाईक असू शकतील किंवा आणखी काही. ते भारतीयच असतात एवढेच.

अमेरिक़न कुटूंबात थोडाफार फरक पडतो. तिकडे विभक्त किंवा घटस्फोटीत जोडप्यांची संख्या जास्त आहे. जोडपं विभक्त झाल्यानंतर त्यांना मूल नसेल तर ठीक आहे. मूल असेल तर त्या बाबतीत ते कुणाकडे राहाणार, कुणाकडे राहाणार नाहीत त्याचे visiting rights म्हणजेच त्या मुलाला किंवा मुलांना भेटण्याच्या वेळा ठरविल्या जातात. त्या कोर्टानेच ठरविलेल्या असतात. हे सर्व जोडपं निर्व्यसनी असेल तर ठीक. त्या मानाने सिगरेटचं व्यसन हे साधं म्हणावं लागेल. पण दारू किंवा ड्रगचे व्यसन आई किंवा वडिलांना किंवा दोघांनाही असेल तर मात्र मुलांचे हालच हाल असतात. याशिवाय घटस्फोट घेतल्यानंतर मुलाची/मुलांची आई व वडील यांच्या कॅरॅक्टरप्रमाणे मुलाची कस्टडी सोपवली जाते. दोघंही नॉर्मल असतील तर १२ वर्षापर्यंत मूल आईकडे राहाते व मग वडिलांकडे राहाते. कुणाकडेही मूल राहिले तरी दुसऱ्या व्यक्तीला Visiting rights असतात. म्हणजे आठवड्यांतून ठराविक वेळा भेटण्याचा अधिकार असतो. त्यावेळी आई/वडील मुलाला बाहेर घेऊन जातात. तो ठराविक वेळ त्यांचे जेवणखाण काही गेम्सना जाणं किंवा आणखी काही करमणुकीचा कार्यक्रम (वयोमानाप्रमाणे) वगैरे होऊन मुलाला/मुलीला त्यांच्या आईकडे/वडिलांकडे पोचवलं जातं.

याशिवाय दुसरी पद्धत म्हणजे घटस्फोट झाल्यानंतर, आई-वडिल दोघेही दुसरीकडे dating सुरू करतात. मुलांना ते (मान्य) करणं फार कठीण जातं. हे फार साध्या शब्दातील वर्णन झाले. पण ज्या मानसिक कुचंबणेतून ही मुलं जातात. त्याचे त्यांच्यावर, त्यांच्या स्वभावावर पुष्कळ वेळा फार गंभीर परिणाम होतात. अशा वेळी कधी ती गुन्हेगारीकडे वळतात किंवा ड्रग्जच्या व्यसनात सापडतात. मुली घरांतून निघून जाऊन वाममार्गाला लागू शकतात. हे अर्थातच ती मुलं स्वत:हून करत नाहीत तर त्यांच्या मानसिक परिस्थितीचा फायदा घेणारे लोक ते काम करतात. प्रमाण कमी असलं तरी असे लोक मला वाटतं जगाच्या पाठीवर सर्वच ठिकाणी आहेत.

Baby sitter चे प्रश्न असतात. मुलाला सांभाळणाऱ्या मुलीचे अथवा बायकांचे ड्रग्जचे अथवा drinking म्हणजे दारू पिण्याचे वगैरे प्रॉब्लेम्स असू

शकतात. हे सर्व चांगलं जमलं तरी ते कायम स्वरूपाचं काहीच नसल्याने पुन्हा हा प्रश्न कोणत्याही दिवशी येईल याची शाश्वती नाही.

त्यांच्या कुटूंबातली दुसरी अडचण म्हणजे dating. डेटिंग ही अडचण म्हणून नाही पण आपल्यापेक्षा वेगळी पद्धत आहे व ती बऱ्याच लवकर वयात सुरू होते. तुम्ही आईवडील या नात्याने राहात असाल तर मुलांच्या बाबतीत काळजी व मुलं म्हणूनच असाल तर स्वतःच्याच बाबतीतील आशा/निराशा, आनंद/दुःखाच्या लहरी येत जात राहाणार. माझ्या अमेरिकन मैत्रिणींचा मी खूप जवळून या बाबतीत अभ्यास केला आहे. ऑफिसमधून घरी गेल्यावर किंवा परस्परच त्यांची तारीख ठरलेली असते. कुठेतरी जाऊन घरी आल्यावर जेवण बाहेर झाले नसल्यास काहीतरी खाऊन घरातील काही इतर काम नंतर आंघोळ, मग केस धुतल्यावर ते रोलर वगैरे लावून सेट करणं, घरात पेटस् म्हणजे कुत्री, मांजरं कुणीतरी असतातच. त्यांची काळजी घेणं वगैरेंसारखी अनेक कामे करून १२ वाजेपर्यंत झोपून परत सहा वाजता उठावेच लागते. संध्याकाळ नंतरही त्यांना दमलेला चेहेरा ठेवून चालत नाही. त्याशिवाय घटस्फोटींत बायका-पुरुषांचेही 'डेटिंग' चालू होतेच. मग त्यांचे वय कितीही असो. डेटिंग नसेल तर त्याचा शोध घ्यावा लागतो. त्याकरता फिगर वगैरे चांगली ठेवावी लागते. त्यामुळेच असेल कदाचित पण 'या वयात हवेत कशाला हे नखरे ?' किंवा 'या वयाला शोभतं का हे वागणं ?' ही वाक्ये तिकडे मी कधीही ऐकली नाहीत. तुमची इच्छा असेल तर तरुण राहायची तुम्हाला समाजाकडून परवानगी आहे.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ८७५
ग्र. क्र. ३०८७०२
२२।७।२००
(स्थळ प्रत)

# सामाजिक संकेत

काटेकोरपणे नियमांचे पालन व शिस्तबद्धता उत्तर अमेरिकेतच नाही तर सिंगापूर, युरोपयन देशांतही कटाक्ष असतो. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्याला ३०० डॉलर्स दंड आहे. अन्नात भेसळ करणाऱ्याला म्हणजे त्यात ग्रोसरी स्टोअर्स आणि तशीच हॉटेल्स व रेस्टॉरन्टस् पण आली. यांपैकी कुणालाही अतिशय कडक दंड होतो. एखादा जिन्नस खराब म्हणून परत नेऊन दिला तर विनातक्रार परत बदलून देतात. तिकडे दुकानदार व गिऱ्हाईक एकमेकांना सहसा ओळखत नाहीत. परत नेऊन दिलेला जिन्नस त्यांच्याचकडून घेतला आहे का व तो कधी घेतला होता हेही ते पाहात नाहीत. स्टोअर्स खूप अवाढव्य असतात, एकदा मी एक तेलाचा पॅकबंद डबा (जे नेहमी पॅकबंदच असते. सुटे मिळत नाहीं.) नेला. त्याचं पॅकींग असं विचित्र झालं होत की आम्हाला घरात कुणालाच तो उघडता येईना. तिकडे ग्रोसरी सर्व साधारणपणे आठवड्यातून एकदाच करतात. जो डबा घरी आणल्यानंतर दोन-तीन आठवड्यांनी मी तो उघडायचा प्रयत्न केला होता कारण तोपर्यंत घरात दुसरे तेल होते. तोपर्यंत ग्रोसरीची पावती हरवून गेली होती. (मी ती पावती टाकून दिली असणार). मला तारीखही आठवत नव्हती. तरी मी एक चान्स घेऊया म्हणून तेलाचा डबा घेऊन स्टोअरमध्ये गेले. तिकडच्या स्टोअरमध्ये काम करणाऱ्या एका बाईला सांगितले की मला डबा उघडता येत नाहीं. पण माझ्याकडे पावतीपण नाही तर तो उघडून मिळाला तर बरं होईल. त्या बाईने पटकन सांगितले की दुसरा घेऊन जा.

असं म्हणत तिथून निघूनही गेली; कुठचीही गोष्ट इतक्या सुखात मिळण्याची मला सवय नाही. मी अक्षरश: बावळटासारखी ती बाई मला काही उलटसुलट प्रश्न विचारील म्हणून तशीच उभी राहिले. पण ती काही माझ्याकडे येईना. मला वाटलं की, मला नीट कळलं नसेल. थोडा वेळ वाट बघून मीच तिला परत भेटले व विचारले कि परत करायला आणखी काहींच करायला नको का ? म्हणजे कस्टमर सर्व्हिसला भेटणे वगैरे. जर तिने परत तसचे पटकन् उत्तर दिले की त्याची काहीच जरुरी नाही. व परत निघून गेली. सर्व ग्रोसरी घेऊन झाल्यावर कॅशिअरकडे आले व तिला सांगितले की हा डबा बदलीचा आहे तर तिचेही काहीच म्हणणे नव्हते. मला त्या दोघीपैकी कुणीच आधी ओळखत नव्हत्या. माझ्याकडे खरेदीचा कुठलाही पुरावा नसल्याने मी एक दोन तरी प्रश्नांची अपेक्षा केली व मग मी त्यांना काय उत्तर द्यायचं वगैरे विचार करून गेले होते. मला त्यांनी 'Thank you' म्हणायची पण संधी न मिळाल्याने मी विचित्र बेचैन झाले. तितकीच त्या माणसांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाने आनंदीतही झाले.

■ ■ ■



# विवाह

भारतीय व अमेरिकन भारतीय यांच्यामधील लग्नाबद्दल लिहीण्याअगोदर आपल्या लग्न संस्थेविषयीच काही लिहावेसे वाटते. त्याबाबतीत खरं म्हणजे किती लिहावे तेवढे थोडेच आहे. कारण घरोघरी थोडीशी सारखी पण बरीचशी वेगळीच दृश्ये दिसतात. व त्याबाबतीतील प्रत्येकाची मतंसुद्धा ज्याच्या त्याच्या अनुभवा-प्रमाणे वेगळीच असतांत. माझी मतं ही फक्त स्वानुभवांवरून नसून दुसऱ्यांचीही उदाहरणे पाहून त्याबद्दल बरच मनन-चिंतन करून तयार झालेली आहेत.

आई-वडिलांनी लग्न जमवण्याची आपली पद्धत, म्हणजे बराचसा नशिबावर हवाला टाकून खेळलेला जुगारच. तो जुगार असला तरी त्यातही काही सुंदर गोष्टी आहेत. दोन हृदयपुष्पांचं होणारं मीलन ही तर त्यातील सर्वांत सुंदर गोष्ट आहे. ते मीलन सर्वात सुंदर व्हायला पाहिजे असेल तर या जमवलेल्या लग्नांत दोन्ही कुटुंबाच्या माणसांच्या मदतीची, समजुतदारपणाची, नितांत गरज आहे. या कुटुंबांची आधीच ओळख असेल तर हा फारसा प्रश्न येत नाहीं. मुलगा व मुलगी आधीच थोडीफार एकत्र आल्यास एकमेकांच्या व कुटूंबांचा परिचय झाला असेल तरीही हे बरेचसे सुकर होते. दोन्ही कुटूंबांनी एकमेकांना योग्य तो मान देऊन मनमोकळेपणा ठेवला तर अशा वातावरणात वाढलेल्या मुला-मुलींनाही एकमेकांशी जमवून घ्यायला फारशी अडचण पडू नये. दुसऱ्यांच्या मनाला व मताला ज्यांना मान देत येतो अशा कुठच्याही दोन व्यक्ती जवळ आल्या तरी त्यांचे

जीवन सुखरूप होणार.

प्रत्यक्षात काय चालते ते सूज्ञ वाचकांना मी सांगयची आवश्यकता नाही. हे विचार म्हणजे नुसतंच गोड स्वप्न नाही असं वाटणारी माणसं क्वचित कुठे तुरळकपणे, दिसतातही. अहो भाग्यम् !

९९ टक्क्यांपेक्षा जास्त लग्नांत देवाण-घेवाणीला महत्त्व दिले जाते. मागच्या भारतभेटींत मी एका लग्नाला गेले होते. मुलीकडच्या बाजूने. मुलीबरोबर दिलेल्या किंवा दिल्या जाणाऱ्या जिन्नसांची यादी लिहून मुलाच्या आई-वडिलांकडे दिली. मुलाकडच्या आई-वडिलांची ती पद्धत नव्हती त्यामुळे माझ्यासकट आम्हा सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. हुंडा किंवा दागदागिने यांची कसलीही अपेक्षा वा मागणी त्यांनी केली नव्हती. कुटुंबे सुखवस्तू होती. पण अनेकांत ती प्रथा आहे. आपल्याकडे 'लग्नाचा बाजार' हा शब्दप्रयोग रूढ आहेच लहानपणापासूनच हा बाजार पाहात आले आहे. लग्नातील 'बैठक' या प्रकाराचा लहानपणापासून तिटकारा होता. पण मग काही ठिकाणी पाहिलं की आम्हाला काही नको असं म्हणून मनात (किंवा जनातही) काही मिळण्याच्या अपेक्षा असायच्या व पुन्हा 'हुंडा घेतला नाही' म्हणून मिरवायला तयार. त्यापेक्षा बैठकीतली बोलणी व लिखाण बरे असं वाटायची वेळ आली. निदान त्यात प्रांजळपणा जरी दिसतो. आता हा प्रकार भारतीय व अमेरिकन भारतीय लग्नात तरी होऊ नये. या संदर्भात मी काही विचार मांडणार आहे. खूप गोष्टी मलाही माहीत नाहीत. अनुभव एकमेकांच्या अगदी उलट असेही आहेत. 'घटाघटांचे रूप आगळे, प्रत्येकाचे दैव वेगळे' हे खरे आहेच.

अमेरिकेत रजा खूप कमी असते. सर्वसाधारणपणे वर्षाला १० दिवस रजा असते. त्यालाच शनिवार व रविवार जोडून घेतले तर सर्व मिळून दोन आठवड्यांची रजा होते. माझ्या माहितीप्रमाणे याला अपवाद म्हणजे काही सरकारी नोकऱ्या, काही मेडिकल प्रोफेशनमधल्या नोकऱ्या व स्वतःचा धंदा, हे आहेत. पण जास्तीत जास्त लोक दोन आठवड्यांच्या रजेतच येतात. क्वचित् कुठे दोन वर्षांची रजा जोडून दिली जाऊ शकते. या दहा दिवसात भारतात येऊन मुलगी / मुलगा पाहून पसंत करून लग्न करणे म्हणजे केवळ फक्त मुला-मुलीच्या दृष्टीनेच विचार करून पाहावा. त्याकरता आई किंवा वडील किंवा दोघांनाही मुलगी / मुलगा पाहून ठेवायला पाहिजे. हे आई-वडील भारतातच राहाणारे असतील तर ते फारसे कठीण नाही. पण तेही अमेरिकेतच राहाणारे असतील तर बहुतेक दोघंही नोकरी करणारेच असणार.

म्हणजे पुन्हा तोच रजेचा प्रश्न आला. रजा कमी तर असतेच, पण महत्त्वाच्या हुद्यावर असतील तर दोन आठवडे जोडून मिळणेही अतिशय कठिण होऊन बसते.

भारतातील मुलं / मुली बघण्याचं मुख्य कारण म्हणजे संस्कृती. आपली संस्कृती फार पुरातन आहे यांत शंकाच नाही. ती उच्च आहे असंही म्हणतात. मला स्वत:ला त्याबाबत लिहिण्याचा अधिकार नाही. कारण ती संस्कृती पाळणारे लोक मला खूप कमी भेटले. मात्र भेटलेच नाहीत असं मी म्हणून शकत नाही. माझ्या मनात एकूण संस्कृतीबद्दल अनेक प्रश्न आहेत. एकंदरीत हल्ली वारंवार झालेल्या भारत भेटीत मला असं वाटतं की संस्कृतीचा अर्थ, काहीही असो पण प्रत्येकजणाने तो आपल्या सोईनेच लावलेला व घेतलेला आहे. जोपर्यंत तो स्वार्थाकरता बदललेला नाही तोपर्यंत त्यात काही चूक आहे असेही वाटत नाही. किंबहुना बदलत्या जगाप्रमाणे काही जीवन नियम बदलणे अपरिहार्यच आहे.

आतापर्यंत संस्कृतीशिवाय दुसरं कारण असंही होतं की परदेशांत आलेली आपली लोक खूप कमी आहेत व तीही खूपशी शेकडो किंवा हजारो मैलांवर पसरलेली आहेत. त्यांची माहिती होणे फार कठीण पडते. तरी आता परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. लग्नाची मुलं-मुली खूप वाढली आहेत. त्यांच्या लग्नाकरता प्रयत्न करणारीही आता खूप आहेत. त्यांना एकत्र भेटता यावं व ओळखी व्हाव्यात याकरता खूप पार्ट्या किंवा तत्सम् प्रोग्रॅम आखले जातात. किंबहुना बरीचशी मुलं-मुली आता इथेच वाढलेल्या मुलं-मुलींची लग्नाकरता निवड करतात.

याशिवायही भारतीय मुला-मुलींशीच लग्न करण्याची काहींची वैयक्तिक कारणे असू शकतील. कुणाकडे पालकांना किंवा आजी – आजोबांना तसे पाहिजे असेल, वगैरे.

भारतीय मुला-मुलींनी अमेरिकेतील मुला-मुलींबरोबर लग्न करण्याचे मुख्य कारण माझ्या अंदाजाने (बऱ्याच लोकांच्या अनुभवावरून) अमेरिकेत यायला सर्वात सोपा, व खात्रीचा उपाय, हे आहे. मग अमेरिकेची ओढ वाटायला त्यांची कारणे वेगळीही असू शकतील. त्यातील फारच थोड्या लोकांना इथं येऊन काही करायला संधी मिळेल, असे वाटते. बहुतेक लोकांच्या मताने इथे पैसा खूप आहे व म्हणूनच त्यांना त्याचे महत्त्व वाटते. याव्यतिरिक्त आणखी काही कारणांची मला माहिती नाही. पैशाचे आकर्षण व गरज कुणाला नाही ? पैसा म्हणजेच सर्वस्व नसले

तरी बरेच काही आहे. तो किती मिळाला म्हणजे सुख याच्या प्रत्येक व्यक्तीच्या कल्पना वेगळ्या आहेत. मला फक्त इतकंच सुचवावसं वाटतं कि अमेरिकेतील जीवनाचा संपूर्ण अभ्यास करून मग त्या पैशाचा हिशेब करावा व निर्णय घ्यावा.

मुलामुलींची निवड हा मुख्य सोहळा झाल्यानंतर मग दुसरी पायरी म्हणजे बैठक. अमेरिकेंत आलेले निदान मराठी लोक तरी दागिन्यांविषयी जवळ जवळ विसरूनच गेलेले असतात. रोज दागिने घालायची इथे पद्धत नाहीं. एखादी १४ कॅरेटची चेन गळ्यात घालतात व कानांतही बारीकसे काही १४ कॅरेटचेच. पुष्कळदा ड्रेसला मॅचिंग खोटेच (प्लॅस्टिकचे वगैरे) घालतात. ही आमची पद्धत आहे. व आपलेही लोक आता एखादी सोन्याची बांगडी व चेनच घालात. मंगळसूत्राची माहिती इकडील लोकांना नाही. लग्न झालेली बाई व पुरुषसुद्धा डाव्या हाताच्या करंगळीजवळच्या बोटात साधारणपणे ठराविक पद्धतीची अंगठी घालतात. पुरुषांची अंगठी १४ कॅरेटच्या सोन्याची असते. बाईला Engagement ring म्हणजे साखरपुड्याची अंगठी नवरा देतो. ही अंगठी हिऱ्याची असते. हिऱ्याचा आकार, वजन वगैरे गोष्टी मात्र त्याच्या ऐपतीप्रमाणेच असते. लग्नाच्या दिवशी दोघं एकमेकांना अंगठी देतात. त्याला Wedding ring म्हणतात. त्यात नवरीची अंगठी हिऱ्याचीच असते व त्याचीही किंमत ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे असते. हिऱ्याची अंगठी साखरपुड्याला दिली व नंतर लग्न मोडले तर ही अंगठी परत मुलाला दिली जाते. या दोन्ही अंगठ्यांचा खर्च (मुलाच्या व मुलीच्या) त्या दोघांनीच केलेला असतो.

आता तर इथे भारतीय पद्धतीने दागिने मिळतातही व साधारण स्थिरस्थावर झालेल्या अगदी मध्यमवर्गीयांना सुद्धा ते अशक्य नाहींत. जसा भारतात 'दागिने काय घातले' हा प्रश्न आवर्जून विचारला जातो तसा इथे कुणी विचारणार नाहीत (आश्चर्य म्हणजे भारतात आल्यावर मीही तो प्रश्न एक-दोन लग्नकार्यांत विचारला आहे. पण माझ्या विचारण्याचा उद्देश मात्र आजकाल पद्धती बदलत आहेत की पूर्वीच्याच आहेत हे पाहाण्याचा होता व दागिन्यांच्या बाबतीत कुणीही बदललेलं मला आढळलं नाहीं.) जरी इथे दागिने आणता आले तरी भारतात ते घेऊन येणे कस्टम्सच्या नियमानुसार फार त्रासाचे आहे. काहीजण नियम धुडकावून ते करतातही. पण सर्वांनाच जे जमतं असं नाही व सर्वांनाच ते तितकं महत्त्वाचं वाटत, असंही मला वाटत नाही. अशा नियमबाह्य गोष्टी करताना येणारा मानसिक दबाव

हा प्रत्येक व्यक्ती-व्यक्तीवर वेगळा येत असला तरी काहींना तो भारी वाटतो.

लग्नात घातलेले दागिने जास्तीत जास्त लोकांना दिसतात हे सर्वांत महत्त्वाचे. त्यायोगे आपली प्रतिष्ठा वाढते नंतरही ते प्रौढीने मिरविता येते. नवविवाहीत सुखी आहेत का हा प्रश्न लोकांच्या मनात यायचे कारणच नसणे. त्यामुळे मागाहून दागिने केले तर "आता काय उपयोग ?" असं म्हटलेल ऐकू येईल. अमेरिकन भारतीय हुंडा देणारे-घेणारे असतील असं मला वाटत नाही व असलेच तर मला माहीत नाहीत. हुंडा व दागिने या व्यतिरिक्त 'मानपान' हा बैठकितला दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. याबद्दल बैठकीतच खुलासा झालेला असेल व शब्दाला जागणारी माणसं असतील तर भांडणाचा काहीच प्रश्न येत नाही. पण अशी 'गुळगुळींत' लग्नं मुलींच्या आईवडिलांना पसंत असले तरी बाकी वऱ्हाडी मंडळींना व बाकीच्या मित्रमंडळी व ओळखीच्या लोकांना (विशेषत: बायकांना) त्यात मजा येत नाही. कारण दागिन्यांशिवाय काय दिलं-घेतलं' याबद्दल कमालीचे औत्सुक्य असते. म्हणजे कुठच्या बाजूने काय दिले किती दिले, साड्यांचे रंग, रूप, किंमती वगैरेंबद्दल चर्चा केली नाही असे कधीच झाले नसेल. नवरा-नवरीची उत्सुकता 'आणखी' कशात असेल पण बाकीच्या हजर व गैरहजर मंडळींनाही फक्त याच बाबातीत उत्सुकता असते कुणाला काही कारणाने लग्नाला जाता आले नाही तरी तेही या सर्व गोष्टींची आवर्जून चौकशी करतात. त्याला मी तरी अपवाद कुठे आहे ?

आजकाल भारतात वारंवार येण पसंत करते त्याला थोडंफार हेही कारण आहेच. अगदी बारीकसारीक खरेदीसुद्धा शेजारी-पाजारी दाखवणं, त्याबद्दलचं कौतुक, रस्त्याने ती वस्तू घालून किंवा साडी नेसून गेल्यावर ओळखीच्या लोकांनी विचारलेले प्रश्न व अनोळखी लोकांनी नजेरेने दिलेली पसंतीची पावती या सर्व गोष्टींची अमेरिकेत तशी उणीवच भासते. 'शेजारी' हा प्रकार जवळ जवळ नाहीच. रस्त्याने व्यायामाकरीताच बहुधा चालायची वेळ येते. तीही उन्हाळ्यात. त्यावेळी म्हणजे चालायला जाताना घालायचे कपडे साधारण ठरलेलेच असतात. 'माणूस' पाहायला मिळणं हेच अप्रूप असल्यानं त्याने कोणते कपडे घातले आहेत याला काहीच महत्त्व राहात नाही ! व अशाने shopping मधला माझा सगळा आनंदच गेला.

लग्नाच्या आधी नुसताच फिरायला जाऊन परिचय होणं व लग्नांतर एकत्र राहून संसाराला सुरुवात झाल्यावर जे स्वावलंबनाचे पैलू दिसतात त्यात मला

वाटतं बऱ्याच (किंवा सर्वांच्या) जणांच्या बाबतीत जमीन-आसमानाचे अंतर पडतं. त्यांत कुणी एक वाईट असतं, असं मला वाटत नाही. किंवा कुणा एकाची चूक असते असंही नाही. माझ्या कल्पनेप्रमाणे. अपेक्षा व अधिकार बदलतात. व ते जितके rigid तितके प्रॉब्लेमस् जास्त. हे भारतातीलच नवरा-नवरी असतील तरी होऊ शकतं. आता त्यांपैकी एक अमेरिकेतील किंवा परदेशातील असेल तर त्यांत असंख्य अडचणींची भर पडते.

अमेरिकेत एकत्र कुटुंबपद्धती नाही. मुलगा आणि मुलगीसुद्धा आजकाल शिक्षण झाल्यावर आपली स्वतंत्र जागा घेऊन वेगळी राहातात. कॉलेज शिक्षणाकरताही शालेय शिक्षण संपल्यावर बहुतकेजण लांबच राहिलेली असतात. summer vacation मध्ये म्हणजे ज्याला आपल्याकडे उन्हाळ्याची सुट्टी म्हणतात, त्या काळात कुठेतरी नोकरी करतात. ती गावातच असेल तर आईवडिलांच्या घरी राहातात नाहीतर परत स्वतःची स्वतःच राहाण्याची सोय करतात. म्हणजे शालेय शिक्षण झाल्यावर लगेचच ती घराच्या बाहेरच पडलेली असतात. ही अमेरिकन जीवनपद्धती भारतीय-अमेरिकन लोकांनी, अगदी मराठी माणसांनीसुद्धा घेतलेली आहे. काहींनी सहज घेतलेली आहे तर काहींनी नाईलाजाने घेतलेली आहे. बहुतेक सर्वांकडे आई व वडील दोघही नोकरी करणारी असल्याने खूपशी स्वतंत्रपणेच वाढतात. प्रत्येक मुलाला वा मुलीला जन्मापासूनच स्वतंत्र खोली मिळते. पहिला स्वतंत्रपणाचा धडा म्हणजे स्वतःच्या हाताने जेवण. तेही भारतीय मुलांच्या तुलेनेने इथे खूपच लवकर सुरू होते. आजपर्यंतच सर्वांत लवकर वयाचं ऐकलेलं उदाहरण म्हणजे आमच्या ऑफिसमधीलच एका माणसाचं की वयाच्या ९ व्या वर्षांपासूनच काहींना काही कामे करून त्याने थोडेफार पैसे मिळवायला सुरुवात केली. आपल्याकडे अशी अनेक मुलं-मुली आहेत की त्याही आधी ती चरितार्थ चालवायला कामाला सुरुवात करताहेत ती परिस्थिती दुर्दैवाची असते की त्यांना बालपण मिळतच नाही. पण मी देत असलेलं हे उदाहरण त्या पद्धतीचं नाही. श्रीमंत घरांतील मुलं मुलेही त्यांच वयोमानाप्रमाणे व शिक्षणाप्रमाणे सुट्टीच्या दिवशी व उन्हाळ्याच्या सुट्टीत काहींना काही काम मिळवतात व आपला काही विशेष, खर्च म्हणजे थोडेफार कपडेच, कुणाला काही भेट देणं वगैरे भागवतात. थोडे मोठे झाल्यावर, कॉलेज शिक्षणाचाही म्हणजेच पर्यायाने त्याच्या अफाट खर्चाचाही विचार सुरू होतोच. अशा तऱ्हेने स्वतःची काळजी बरीचशी

स्वत:च घ्यायची सवय लहानपणापासूनच लागलेली असते. स्वत:चे पैसेही ते स्वत:च सांभाळतात. अशा तऱ्हेने स्वतंत्र वृत्तीने वाढलेल्या मुला-मुलींची एक विशिष्ट वृत्ती बनते. आई-वडिलांकडून नाही तर कुणाच्याकडून त्यांच्या कसल्या फारशा अपेक्षा नसतात. अर्थात त्यांना काही भावनाच नसतात असा त्याचा अर्थ नाही पण आपल्याकडे ज्या पध्दतीच कोडकौतुक चालतं त्याच्या शतांशानेही इकडे चालत नाही किंवा भावना व्यक्त करण्याची आपली पद्धत खूप वेगळी आहे. आणि माझ्या मताप्रमाणे सर्वांत कठीण गोष्ट हीच आहे. दोन्हीही बाजूच्या जीवनपद्धतीत खूप बदल असतो. पंचविशीतली काहीशी मस्तीही दोघांच्या अंगांत असते. आजकाल भारततही मुली मुलांप्रमाणेच वाढवल्या जातात. 'रागावूनी ते जरी बोलले बोलू नको त्यावरी' ही कण्वमुनींनी शकुंतलेला दिलेला सासरी जातानाची समज पुराणात जमा झाली आहे. (आता ती समज मुलाला द्यायची वेळ आली आहे असं म्हटलं तर फारशी अतिशयोक्ती होऊ नये. निदान शहरातून तरी).

दोघांनाही एकमेकांच्या या पार्श्वभूमीची व पर्यायानें स्वभावाची कल्पना येणं अशक्यच आहे. आणि म्हणूनच ज्याला Delicate situation म्हणजे नाजूक परिस्थिती म्हणतात तशी तयार होते. ती समजू शकणारा दुवा म्हणजे असलाच तर अमेरिकेतील आईवडीलच होऊ शकतील. आता ह्या दुव्याच्यासुद्धा स्वत:च्या अडचणी आहेतच. एकतर त्यांचीच स्वत:ची मतं जुळत असतील असं नाही. भारतातून अमेरिकेत जाऊन किंवा कुठच्याही पाश्चात्य देशात जाऊन तिथे स्थायिक होण्याकरता केलेली धडपड, अतोनात कष्ट, मनाची झालेली घालमेल, त्याबरोबर आलेले जीवनाचे व माणसांचे अत्यंत कडू अनुभव; ती संपूर्णपणे वेगळी संस्कृती व जीवनपद्धती आत्मसात करायची प्रत्येकाची मानसिक ताकद या सर्वांची कल्पना मला वाटणं भारतातील माणसांना कदाचित कधीच येणार नाही. ही अशी त्रिशंकूची अवस्था ही प्रथम आलेली पिढी कायमच सोसत आली आहे व कमी-जास्त प्रमाणांत (त्यांच्या जीवनाच्या अतापर्यंत सोसतच राहाणार आहे, ही मानसिक धग ज्यांच्या मनात जास्त त्यांच्या मुलांनाही त्याचं झळ अपरिहार्यपणे पोचतेच. आणि यात गंमत अशी आहे की ज्या काही संस्कृतीनामक गोष्टीला ही पिढी चिकटून राहिली आहे, त्या भारतीय संस्कृतीच्या बाबतीत खुद्द भारतच खूप पुढे आणि झपाट्याने बदलत चालला आहे.

दुसरं म्हणजे वरील अडचण जरी नसली तरी कुटूंबांत आलेलं हे नवीन माणूस,

जावई अथवा सून यांच्याशी परिचय होऊन आवश्यक तो जिव्हाळा निर्माण व्हावा लागतो. तोपर्यंत सगळीच एकमेकांना परके असतात. अगदी भारतातच दोन्ही कुटूंबे असली तरी खाणं-पिणं, आचार, विचार, पद्धतीत खूप फरक असतो. कुतूहलाच्या दृष्टीने पाहिलं असे फरक पाहाण्यात एक प्रकारचा आनंद आहे. पण टेनिस कोर्टाप्रमाणे नेटच्या दोन बाजूंना उभं राहून बॉल सतत दुसऱ्याच्या बाजूलाच टाकायचा प्रयत्न करीत गेलं तर प्रश्न चिघळत जायची शक्यता जास्त आहे. अगदी टेनिसचेच उदाहरण झाले तरी त्यातही खिलाडूपणा असू शकतो. तो असणं अत्यावश्यक आहे. तो खेळ आहे, लढाई नाही हे भान राखणं जरुरीच आहे. दोघांनीही शेवटी मित्रत्वाचं हस्तांदोलन करायचं आहे, ते विसरून चालणार नाही.

या सर्व विचित्र परिस्थितीत कुणाचा दोष आहे असं निदान मला तरी वाटत नाही. काही वेळा तर "तुका म्हणे उगी रहावे, जे जे होईल ते ते पाहावे असंही धोरण बरंच उपयोगी पडतं. अर्थात हे सांगायला सोपं असलं तरी अमलात आणायला फार कठीण आहे. पण प्रयत्नांती खूपसं जमतं. नवीन देशात येऊन बाहेर नवीन चालीरिती व घरांतही नवीन चालीरिती, बोलायला 'आपलं' कोणी वाटत नाही. अशी काहीशी परिस्थिती असेते. तरीही ही अशक्य परिस्थिती नाही. स्वत:च्या गुणांनी कुणालाही आपलंस करता येतं. फक्त इच्छा पाहिजे व दोन्ही बाजूच्या कुटूंबातील सर्वांचेच त्या दृष्टीने सहकार्य पाहिजे. कपडेलत्ते व दागिने मिळवणं अमेरिकेत मुळीच कठीण नाही. महत्त्वाचं आहे ते माणसं मिळवणं. त्याची किंमत प्रत्येकाने स्वतंत्रपणे करायची असते.

'डेट' म्हणजे दिवस किंवा तारीख, मुलं-मुली एकमेकांना भेटण्याची वेळ किंवा तारीख ठरवतात त्याला डेटिंग म्हणतात. डेटिंग हा एक पाश्चात्य देशात लग्न जमवण्याचा प्रकार आहे. आपल्याकडे भारतात सर्वसाधारणपणे आईवडील मुला-मुलींचे लग्न जमवतात. आपल्याकडे ज्याला "लव्ह मॅरेज" म्हणतात म्हणजे मुला-मुलीने स्वत:चे लग्न स्वत:च जमवणे तीच कल्पना डेटिंमध्ये आहे. कल्पना तीच असली तरी त्याचा विस्तार व त्याकडे पाहायची समाजाची पद्धत मात्र अगदी वेगळी आहे. आपल्याकडील प्रेमविवाहाचा मला स्वत:ला अनुभव नाही. मी माझ्या मैत्रिणींना प्रश्न विचारून त्याची थोडीशी माहिती करून घेतली. त्याप्रमाणे बहुधा पुरुष बाईला प्रथम विचारतो. पाश्चात्त्यातही पुरुषच बाईला प्रथम विचारतो. फरक असा आहे कि, डेटिंगमध्ये पुरुष बाईला विचारतो ते एकदम लग्नाबद्दल नाही तर

कुठे सिनेमाला जाण्याचे अथवा जेवणाचे निमंत्रण असते. त्यापेक्षाही कुठेतरी नुसतेच फिरायला जाणेही असू शकते. एकमेकांची माहिती करून घेणे, स्वभाव पाहाणे व परिचय वाढवणे, हाच हेतू असतो. याबाबतीत त्यांच्या आईवडिलांनाही आपल्यासारखीच उत्सुकता असते. किंबहुना आपल्या मुला-मुलीने विशिष्ट वयानंतर डेटिंग केले नाही तर आईवडिलांना काळजी उत्पन्न होते. ती कुणाबरोबर डेटिंग करतात हेसुद्धा त्यांना महत्त्वाचे वाटते. धार्मिक वातावरणात वाढलेली मुलं-मुली बहुधा आपल्याच धर्माची मुलं निवडतात. काही वेळा भेटल्यानंतर त्यांना साधारण कल्पना येते. पण हे करताना त्यांना दुसरं कुणी जास्ती आवडणारं भेटलं तर ते त्या माणसाबरोबरही जाऊ शकतात. त्या माणसालाही त्याची कल्पना असू शकते की ही व्यक्ती आधीच दुसऱ्या कुणाबरोबर डेटिंग करीत आहे. एक मुलगी चार मुलांबरोबरसुद्धा डेटिंग करू शकते. म्हणजे ती मुलगी एका मुलाबरोबर डेटिंग करते तरी बाकीची मुले आशा सोडत नाहीत. त्या मुलीचे लग्न होईपर्यंत बाकीच्या मुलांना संधी असते. अर्थात हीच गोष्ट उलट प्रकारेही होऊ शकते. मुलींनाही पुष्कळ वेळा याच प्रकारच्या स्पर्धेमध्ये उतरावे लागते. लग्नानंतरही त्यांना बेसावध राहून चालत नाही. याबाबतीत मला असे वाटू लागले आहे की, भारत असो व अन्य कोणताही देश असो, अती बुद्धी किंवा अती सौंदर्य ही देणगी बाईला वरदानापेक्षा शापच आहेत. बुद्धीबरोबर शहाणपणा असेल तर ठीक. नाहीतर ज्ञानाच्या बाबतीत बाई पुरुषापेक्षा श्रेष्ठ किंवा वरचढ झाली तर पुरुषाचा अभिमान जागा होतो व ते लग्न सुखाचे होऊ शकत नाही. सौंदर्याच्या बाबतीतही नवऱ्याला लग्नाआधी ते कितीही चांगले वाटले तरी लग्नानंतर डोकेदुखी होऊ शकते. मला वाटतं काहीं अपवाद सोडले तर हे 'Universal truth' आहे.

मुलगा व मुलगी एकाच माणसाबरोबर डेटिंग करत असतील व काही दिवस किंवा काही महिने हे चालू असेल तर ते 'steady' आहेत असे म्हटले जाते. यांत पुष्कळ वेळा वर्षंही जातात. बहुतेक वेळा याबाबतीतला लग्नाचा निर्णय घेतलेला असतो. पण शिक्षण वगैरे चालू असेल तर लग्न लगेच होत नाही. कधी कधी लग्न करून एकमेकांना शिक्षणाकरता मदत करतात. आई-वडील सधन असतील तर लग्नाला मदत करतात. हुंडा हा प्रकार नाहीच. आई-वडिलांचा आधार नसेल तर स्वतःलाच सर्व जबाबदारी घ्यावी लागते.

■ ■ ■

# शिक्षण पद्धती

अमेरिकेतील शाळा, कॉलेज सप्टेंबरमध्ये चालू होतात. शाळा जूनपर्यंत सुरू असतात. कॉलेज साधारणपणे मे महिन्यात संपतात. पुष्कळ मुलं-मुली समर व्हेकेशनमध्ये म्हणजे मे-ऑगस्टपर्यंत काही दुसरा अभ्यासक्रमही करू शकतात. High School Graduate म्हणजे आपल्याकडे ज्याला भारतात S.S.C. म्हणतात ते १२ वर्षांचे असते. ६ व्या वर्षी मुलगा-मुलगी पहिलीत जातात. त्याच्या आधी एक वर्ष K.G. चे असते. व K.G. च्या आधी एक वर्ष Nursary असते. शाळेच्या व कॉलेजच्या सर्व दिवसात परीक्षा मधून मधून चालूच असतात. आपल्यासारख्या वार्षिक परीक्षा अमेरिकेत नाहीत. त्यामुळे जी मुले नियमितपणे शाळा-कॉलेजमध्ये गेलेली असतात ती सहसा नापास होत नाहीत. त्यांच्याकडून व्यवस्थित अभ्यास करून घेतलेला असतो. शाळा जशा सरकारी आहेत तशा खाजगीपण आहेत. सरकारी शाळांना फी नाही. प्रत्येक घरामागे शाळेचा स्वतंत्र टॅक्स आकारलेला असतो व त्याच खर्चातून शाळा चालतात. पूर्वी मुलांना शाळेत लंच मोफत असे. आता अगदी कमी दराने पण चांगला लंच देतात. शाळेची वेळ साधारणपणे ८ ॥ ते २ ॥ पर्यत असते. काही ठराविक अंतरापासून आणायला-न्यायला बस असते. तुम्ही ज्या भागात राहाता त्या भागाला ठरलेली शाळा असते. मुलं बसमधून उतरताना - चढताना बसचे लाल दिवे लागतात. त्यावेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूचा ट्रॅफिक पूर्णपणे थांबतो. शाळा भरण्याच्या, सुटण्याच्या व लंचच्या वेळी शाळेच्या

परिसरात फक्त ताशी १५ मैलाने गाडी चालवावी लागते व हा नियम दर्शविणारा दिवा त्या परिसरांत लागतो. शिवाय मुलांना रस्ता ओलांडायला मदत करायला खास पोलीस असतात. बसचे लाल दिवे लागलेले असताना जर कुणी गाडी न थांबता पुढे गेली, तर बसचा ड्रायव्हर (बाईही असू शकते) त्या गाडीचा नंबर घेऊन तक्रार करू शकतो.

शाळेचा बराचसा अभ्यास शाळेतच होतो व थोडेसे होमवर्क असते. आपल्या भारतीय लोकांना अभ्यासाची सवय असल्यामुळे ते खूप सोपे जाते. पहिली ते पाचवी elementary, सहावी ते ८ वी ज्युनिअर हाय व ९ वी ते १२ वी सिनिअर हाय असे शाळेचे तीन भाग होतात. शाळेतील गणिताचे स्टँडर्ड भारतीयांच्या मानाने खूप कमी आहे. स्पेलिंग व इंग्लीश लिहिणेही विशेष उच्च दर्जाचे नाही. भाषांमध्ये इंग्लीश, फ्रेंच, स्पॅनिश वगैरे भाषा शिकवल्या जातात. Science, Social Studies, Histroy, Maths हेही विषय शिकवले जातात. पुस्तकं, वह्या सर्व शाळेमध्येच मिळते. शिक्षकांना मिस्टर, मिस किंवा मिसेस व नावानेच हाक मारतात. "सर" किंवा "मॅडम" असं म्हणत नाहीत. शिक्षक वर्गात आल्यावर उठून उभं राहायचीही पद्धत नाही. तरी साधारणपणे त्यांच्याविषयी आदर बाळगला जातो.

भारतासारखी S.S.C. ची परीक्षा नसल्यामुळे मनावर दडपण नसते. एकंदरीतच शालेय जीवनात भारतापेक्षा अमेरिकेत कमी मानसिक ताण असतो. कदाचित् मुलांच्या शारीरिक वाढीला जास्त महत्त्व दिले गेले असेल. आपल्यापेक्षा वेगळे म्हणजे अमेरिकन शाळेत Guidance Counseller असतात. ही व्यक्ती अनेक प्रकारे विद्यार्थ्यांना मदत करते. मुलांना guide करणं म्हणजे योग्य मार्ग दाखवणं हेच त्याचं काम. यात विद्यार्थ्यांच्या अनेक अडचणी सोडविल्या जातात. उदा., नोकरी हवी असेल तर कुठल्यातरी बारीक नोकरीची सोय केली जाते. एखादा विषय घ्यावा किंवा नाही किंवा आणखी काही मनाचा गोंधळ असेल तर त्याती बाबतीत निर्णय घ्यायला मदत करतात. पुष्कळ मुलांना घरच्या खूप अडचणी असतात. त्याही बाबतीत ती व्यक्ती मुलांना मदत करते. सर्व शिक्षक निदान कॉलेजची ग्रॅज्युएट तरी असतात. फक्त हायस्कूल ग्रॅज्युएटना शिक्षकाची नोकरी अगदी पहिल्या-दुसरीच्या वर्गाकरता सुद्धा मिळत नाही.

उन्हाळ्याच्या सुटीशिवाय डिसेंबरमध्ये ख्रिसमसच्या वेळी दोन आठवडे सुट्टी असते व ईस्टरच्यावेळी एक आठवडा सुटी असते. त्याशिवाय जे बँक

हॉलिडेज असतात ते सर्व शाळेला मिळतात. शाळेत प्रार्थना म्हटली जात नाही. पण अमेरिकन लोक नॅशनल अँथेम (राष्ट्रगीत) म्हणतात. तेव्हा अतिशय श्रद्धेने व देशप्रेमाने म्हणतात. मुलांचे शालेय शिक्षण संपल्यावर मोठी पार्टी केली जाते. शाळेत पार्टी होते त्याला प्रॉम नाईट म्हणतात. त्यावेळी मुलं-मुली जोडीने नाच करतात. सर्वांत चांगला मुलगा व सर्वांत चांगली मुलगी निवडली जाते. शिवाय घरी पार्टी केली जाते.

कॉलेजमध्ये मात्र मुलांना खूप अभ्यास करावा लागतो. वेगवेगळ्या युनिव्हर्सिटीज् मध्ये शिक्षणपद्धतीत खूप फरक असतो. आपल्याकडील पुष्कळ लोक इंजीनिअर अथवा डॉक्टर बनू इच्छितात. भारतातून डिग्री घेऊन गेले तरी अमेरिकेतही डिग्री घ्यावीच लागते.

अमेरिकेत भारतातून जाणारे इंजीनिअर्स म्हणजे कुणी IIT ची परीक्षा दिलेले असतात. तर बाकीचे दुसऱ्या कॉलेजची डिग्री घेतलेले असतात. त्याबाबतीत काही जणांना विचारले असता मला कळलेला फरक असा : IIT ची पद्धत अमेरिकेसारखीच म्हणजे Grade Point Average आहे. अन्य कॉलेजमधील भारतातील पद्धत म्हणजे Absolute System Percentage पद्धत आहे. ही पद्धत adjust करायला सोपी जाते. गणितात अमेरिकन मुलं कमी पडतात.

स्कॉलरशिप मिळवून अमेरिकेत आलेल्या मुलांना खूप Lonely (एकाकी) वाटते. Depressed म्हणजे खिन्न-उदास वाटते. त्यांना मिळणारे पैसे इतके कमी असतात - सध्याचे म्हणजे नक्की काय ते मला माहीत नाही पण साधारण अंदाज असा की एक हजार डॉलर्स महिना मिळतात म्हणजे ३०,००० रुपये झाले. ३०,००० रुपये भारतात दर महिन्याला मिळाले तर चांगल्यापैकी राहाता येते. पण अमेरिकेत एक हजार डॉलर्स हातात आले तर ४००-४५० डॉलर्स अगदी लहान जागेला भाड्यात जातील व बाकीच्या पैशात कपडे, जेवण व इतर खर्च म्हणजे काहीही शिल्लक राहाणार नाही. सर्व कामे स्वत:लाच करावी लागतात. लॉन्ड्री करणे (कपडे धुणे) हे मशिनमध्ये असलं तरी या अपार्टमेंट बिल्डिंगमध्येच मशिन असेल असं नाही. तर बाहेर लॉन्ड्रोमॅटमध्ये जावे लागते. त्याला पैसे टाकावे लागतात. थंडी व बर्फातून चालत जावे लागते. सर्व लॉन्ड्री करून घरी यायला दोन तासांचा वेळ (साधारणपणे) लागतो. त्यानंतर त्या कपड्यांना इस्त्री करावी लागते. जरी बाहेर पुष्कळ गोष्टी मिळत असल्या तरी दिवसातून एकदा तरी घरी काही

करावेच लागते. एक तर घरचं खाणं खावसं वाटतं व दुसरं म्हणजे चार वेळा बाहेर खाणं महागात पडतं. जेवण केलं म्हणजे मागची भांडी घासणं व थोडी तरी साफसफाई करावीच लागते. आठवड्यातून एकदा तरी टॉयलेट, बाथरुम स्वत:लाच साफ करावी लागतात. श्रीमंतांच्या मुलांना तर या कामाची सवय नसतेच. फार तर त्यांच्या आई-वडिलांची त्यांच्याकडून पैशाची अपेक्षा नसेल. मध्यम परिस्थितीतल्या मुलांनासुद्धा या कामांची भारतात सवय नसते. या गोष्टींशिवाय आपल्या माणसांपासून लांब असल्यामुळे एकाकीपणा असतोच. पण कॉलेज म्हणून विचार केला तर अमेरिकेतील कॉलेज १०० पटीने आवडल्याचे काहींनी सांगितलं. त्यात थोडी अतिशयोक्ति असेल कदाचित, पण काही तथ्यही आहे. काही ठरलेले कोर्सेस सोडले तर बाकीच्या कोर्सेस आपल्या आवडीने निवडता येतात. प्रत्येक युनिव्हर्सिटीमध्ये कती क्रेडीटस् पाहिजेत त्याचे नियम वेगळे आहेत. भारतात अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना निवडता येत नाही. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील परस्पर संबंध खूप वेगळे असतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांना अमेरिकेतील कॉलेज (graduate schools) फार आवडते. भारतात आदरयुक्त असली तरी शिक्षकाविषयी एक प्रकारची भीती असते. Money Magazine च्या रिपोर्टप्रमाणे अमेरिकेतील कॉलेज् जगात उत्तम आहेत.

१२ वी नंतर चार वर्षांचा इंजीनिअरींगचा कोर्स असतो. ज्याला अंडर ग्रॅज्युएट म्हणतात. आजकाल आणखी पुढे शिकावे लागते. म्हणजे Masters in Engineering किंवा M.B.A. किंवा Ph. D. वगैरे काहीतरी करावे लागते. पैशाची निकड असेल तर पूर्णवेळ किंवा अर्धवेळ नोकरी करून हे करता येते. पण वेळ जास्त लागतो.

मेडिकलला जायचे असेल (डॉक्टर व्हायचे असेल) तर १२ वी नंतर चार वर्षांचे कॉलेज करायचे कि ज्यांत Biology असेल. B.Sc. त्यानंतर मेडिकल कॉलेजला अॅडमिशन घ्यावी लागते. ते चार वर्षांचे असते. त्यानंतर ३ वर्षे रेसिडेन्सी (residency) करावी लागते. शाळेसारखंच मेडिकल कॉलेजमध्ये कॉलेजला जाण्याचा नियमितपणा व अभ्यास असेल तर सहसा कोणी नापास होत नाही. आपल्यासारखी पाठांतरांची पद्धत इथे फारशी नाही. काही स्टेटसमध्ये १ वर्षाची रेसिडेन्सी लायसेन्स मिळायला पुरेशी असते. पण प्रत्येक स्टेटसचे त्यांचे स्वत:चे नियम आहेत. त्याची पूर्ण चौकशी करावी. कुणाही एका व्यक्तीवर विसंबून राहू नये.

भारतामध्ये जरी मेडिसिनमध्ये काही specialization केले असले तरी अमेरिकेत ते मानत नाहीत. Residency व Specialization सर्व परत करावे लागते. स्टेटसमध्ये किंवा हॉस्पिटलसमध्ये सर्वच नियम सारखे असतात. जरुरीप्रमाणे ते बदलतात. साधारण नियम असा कि आधी रेसीडेन्सी करायची व मग फेलोशिप करायची. आमच्या ओळखीच्या एका डॉक्टरला एका हॉस्पिटलने आधी फेलोशिप दिली व मग त्यांना रेसीडेन्सी तर करायला लागणारच आहे. पण आधी फेलोशिप झाल्यावर मग रेसीडेन्सी करणे किती मानहानीकारक होईल त्याची कल्पना करावी.

भारतातून अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्या डॉक्टरनी E.C.F.M.G. Educational Commission for Foreign Medical Graduates च्या ऑफिसशी संपर्क साधावा. त्यांचा फक्त अमेरिकन कॉन्सुलेटमध्ये मिळू शकतो. E.C.F.M.G. ऑफिस आपल्याला माहितीपत्रक व पुस्तक पाठवेल. माझ्या सध्याच्या माहीतीप्रमाणे कॉन्सुलेटमधून एक Green Book हिरवे पुस्तक मिळेल. ते पुस्तक म्हणजे United States Information Service for Hospitals. सध्या रेसीडेन्सी मिळवायला V.Q.E. Visa Qualifying Examination पास व्हावी लागते. सर्वच डॉक्टरांना Mal Practice Insurance पण घ्यावा लागतो. तोसुद्धा सर्वांना सारखा नसतो.

दातांच्या डॉक्टरांना (Dentist) भारतात B.D.S. ही पदवी मिळते. अमेरिकेत D.P.S. किंवा D.M.D. ही पदवी मिळते.

भारतातून आलेल्या दातांच्या डॉक्टरांना, मान्यता पावलेल्या कॉलेजमधून दोन वर्षांचा Continuing Education Programme करावा लागतो. हा प्रोग्रॅम झाल्यानंतर नॅशनल बोर्ड पार्ट १ व नॅशनल बोर्ड पार्ट २ या परीक्षा नंतर Pre Clinical and Clinical Exam on Patient (Practical) या द्यावा लागतात. हे सर्व संपल्यावर प्रॅक्टीस करायला लायसेन्स मिळतं. मात्र डिग्री मिळायला तुम्हाला परत कॉलेज करावे लागते.

आपल्याकडे जर भारतातील Masters डिग्री असेल तर आपण अमेरिकेत शिकवू शकाल पण प्रॅक्टीस मात्र करू शकणार नाही.

हे सर्व संपवायला येणारा खर्च साधारणपणे २०-२५ हजार डॉलर्स आहे. प्रत्येक कॉलेजप्रमाणे तो बदलतो. जे करायला कोणतीही स्कॉलरशिप मिळत नाही.

अमेरिकेत अनेक युनिव्हर्सिटीज् आहेत. काही खाजगी युनिव्हर्सिटीज् आहेत.

प्रत्येक स्टेटेची स्वतःची युनिव्हर्सिटी आहे. त्याची कॉलेजेस् सबंध स्टेटभर विखुरलेली आहेत. काही ख्रिश्चन कॉलेजेस् आहेत. फारच थोडी कॉलेज म्हणजे दोन तृतीयांश फक्त स्त्रियांकरता आहेत. बाकी सर्व मुलामुलींकरता आहेत. शिक्षणाची क्वालिटीसुद्धा प्रत्येक कॉलेजची वेगळी आहे. कुठच्या कॉलेजमध्ये जाता हा प्रश्न "मी कॉलेजमध्ये जातो" असं म्हटल्यावर येणारच. कारण कॉलेजच्या नावावरून शिक्षणाचा दर्जा (व पर्यायाने तुमच्या ज्ञानाचाही) कळतो. उदा. हारवर्ड येल, कार्नेगी मीलन, डेक्सेल, एम. आय. टी. वगैरे नावे घेतलीत की लगेच "Oh" असा उद्गार येईल. या व आणखीही काही नावाजलेल्या युनिव्हर्सिटीज आहेत. असं म्हणतात की जगातल्या उत्कृष्ट युनिव्हर्सिटीज् अमेरिकेत आहेत. या ठिकाणचा शिक्षण खर्च पण फार आहे. मुलगा/मुलगी खास शिक्षण म्हणजे डॉक्टर वगैरे होऊन कॉलेजबाहेर पडेपर्यंत १००,००० डॉलर्सपेक्षा जास्ती त्यांना कर्ज झालेले असते. तेही आई-वडिलांच्या थोडातरी पैशाचा आधार असेल तर. शिवाय मुलं सर्व कॉलेजची वर्षे पार्ट-टाईम नोकरी करतातच.

विद्यार्थी व शिक्षक - चालक वर्ग यांचे नाते चांगले असते. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचा आपुलकीने विचार केला जातो. चांगल्या विद्यार्थ्यांना केवळ पैशाच्या अडचणीमुळे कॉलेज सोडावे लागणार नाही. स्टेट युनिव्हर्सिटीची फी खाजगी युनिव्हर्सिटीपेक्षा बरीच कमी असते. शिक्षणाचा दर्जाही त्यामानाने नाही तरी थोडा कमी असतो. तरी काही स्टेट युनिव्हर्सिटीज् सुद्धा नावाजलेल्या आहेत. जरी सर्व प्रकारचं शिक्षण यांतून मिळत असलं तरी काही कॉलेजस काही विशिष्ट विषयांकरता जास्त चांगली म्हणतो काही कॉम्प्युटरकरता चांगली असतात. काही लॉ (कायद्या) करता चांगली तर काही इंजीनिअरींग करता चांगली असतात. कुठचं कॉलेज कशाकरता चांगलं आहे याचीही माहिती आपल्याला मिळू शकते.

■ ■ ■

# शेती

अमेरिकन शेतजमीन ज्याच्या मोठ्या आकारामुळे व नैसर्गिकतेमुळे जगातील सर्वात श्रीमंत शेतजमीन मानली जाते. वाळवंट फक्त पश्चिमेकडे थोड्याशाच भागांत आहे. बाकी सगळीकडे भरपूर पाऊस आहे. midwestern भागांत मोठ्या प्रमाणावर शेती आहे. साधारण सध्या २२,७५,००० अमेरिकेत शेते आहेत. त्यापैकी ८५ टक्के "कसणाऱ्यांची जमीन" आहे. ज्यांच्याकडील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व खते आणि रसायने यांच्यामुळे अमेरिकन शेतकऱ्यास अनेकवार पिके स्वस्तात व मोठ्या प्रमाणावर करणे सहज शक्य आहे. ५० वर्षांपूर्वी शेतकरी साधारण १० माणसांचे पोट भरू शकत असे. आता तो ७५ माणसांचे भरू शकतो. आणि तरीही शेतकऱ्यांची संख्या प्रतिवर्षी कमी होत आहे. मात्र प्रत्येक शेतकऱ्याची साधारण मालकीची शेती (जमीन) वाढली आहे.

अमेरिकन शेतकऱ्यास संरक्षणासाठी व विकासासाठी कर्जे मिळतात.

शिवाय सरकारतर्फे चाललेल्या निरनिराळ्या शेतकीविषयक शोधांचाही शेतकऱ्यांना फायदा मिळतो.

■ ■ ■

# नोकरी / मुलाखती

नोकरीची मुलाखत (interview) कोणत्याही प्रकारच्या कामाबददल असू दे. त्याचे काही manners म्हणजे बोलण्या-चालण्याची सर्वसाधारण पद्धत ठरलेलीच असते. आता म्हणजे आफिसमध्ये शिरल्यावर प्रथम आनंदी स्मित व त्याबरोबर "Good morning" (जी वेळ असेल तशी) असे म्हणून सदिच्छा व्यक्त करणे आवश्यक असते. त्यापुढे How are you doing; today? (काय, कसं काय वगैरे) असा प्रश्न विचारला जातो. त्यावर I an fine, thank you and how about you? म्हणजे मी छान आहे. आभारी आहे. (चौकशी केल्याबद्दल) आणि आपण कसे काय आहात असा प्रति प्रश्न विचारला जातो. त्यावरचं साधारणपणे ठरलेले उत्तर म्हणजे Fine, thank you असेच असते. या प्रकारची प्रश्नोत्तरे फक्त मुलाखतीलाच नाहीत तर आपल्या ओळखीचं कुणीही भेटलं तरी आवश्यक आहेत. याहीपेक्षा जास्ती परिचय असेल तर अर्थातच इतरही चौकशी केली जाते. हे संभाषण सहजपणे केले जाते व त्याचवेळी हस्तांदोलनही होते. त्यामुळे अर्धे tension कमी होते. Application-Form हा Receptionist कडून आधीच भरलेला असतो. तो जी व्यक्ती interview घेते तिच्याकडून वाचला जातो. अमेरिकेत जगाच्या सर्व भागांतून आलेले लोक स्थायिक झाल्यामुळे त्यासंबंधी त्यांना असलेल्या माहितीप्रमाणे काही प्रश्न विचारले जातात. त्याचा नोकरीशी फारसा संबंध नसतो. पण प्रश्नोत्तराने त्यांना माणसाची साधारण कल्पना नक्कीच येते. सर्वांत प्रथम त्यांना आपल्या

नावाची मुळीच सवय नसते. त्याचे उच्चार ते अगदी वेगळे करतात. आपल्याला जितका त्यांच्या उच्चारांचा व बोलण्याच्या पद्धतीचा प्रश्न असतो, तितकाच त्यांनाही आपल्या उच्चाराचा प्रश्न येतो. त्याची कल्पना भारताचेच उदाहरण घेऊन देता येईल. मला हिन्दी उत्कृष्ट येत नसेल तरी बऱ्यापैकी येते. पण तरीही उत्तरप्रदेशातील लोकांनी बोललेले हिन्दी, दक्षिण भारतातील लोकांनी बोललेले हिन्दी, बंगाली, आसामी लोकांनी बोललेले हिन्दी या सर्वांचे बोलणे कळणे मला तरी जडच जाते.

या उच्चारांच्या अडचणींमुळे अमेरिकन लोक नेहमी मोठ्याने व स्पष्ट बोलायला सांगतात. सावकाशही बोलावे लागते. आवश्यक ती प्रश्नोत्तरे झाल्यावर नोकरीचे benefits तिथे मिळणाऱ्या सुट्ट्या, रजा वगैरे गोष्टींची माहिती दिली जाते. अर्थात Higher level वरच्या नोकऱ्यांना आणखीही लोकांशी बोलावे लागते. या सर्व गोष्टी त्यांची कामाची निकड, आपली जरुरी, आपला अनुभव, त्यांच्या अपेक्षा, आपण ज्या प्रकारचे काम करतो त्या प्रकारच्या कामाची एकूण गरज वगैरे अनेक गोष्टींवर ही नोकरीची निवड अवललंबून असते.

साध्या नोकऱ्यांकरता काही मोठ्या कंपन्यांमध्ये त्यांच्या स्वतःच्या चाचणी परीक्षा असतात. उदा., टायपिंग, शॉर्टहँड, बुक-किपिंग व क्लार्कच्या नोकरीकरिता इंग्लीश व गणिताची चाचणी असते. मोठ्या नोकऱ्यांकरता त्या डिपार्टमेंटच्या ऑफिसर्सबरोबरही मुलाखती होतात. १९६०-१९७० या काळात अमेरिकेत भरपूर नोकऱ्या होत्या. अगदी गेल्याबरोबर बहुतेक नोकरी मिळत असे. देश advanced प्रगत असल्याने कोणत्या प्रकारचे jobs आहेत, किती आहेत, याची साधारण माहिती मिळू शकते.

मला आणखीही असा एक अनुभव आला की टेबल कामाने सतत भरून ठेवणे, इकडे तिकडे गप्पांत वेळ काढणे, मग ओव्हरटाईम करणे वगैरे गोष्टी तिकडे चालत नाहीत. वेतन खूप असल्याने प्रत्येक माणसाच्या कामाचा उरक व झपाटा महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक माणूस सबंध दिवसात किती काम करतो, कसे करतो, वेळेवर करतो की नाही वगैरे गोष्टी कटाक्षाने पाहिल्या जातात. ऑफिसमध्ये वेळेवर येणे-जाणे. जेवणाच्या वेळेलाही वेळेवर जाणे-येणे, डिपार्टमेंटमध्ये सर्वांनी एकदम न जाता आपसात वेळ ठरवून जाणे अशा प्रकारची कामाची शिस्त राखली जाते. त्यामुळे कुणीही ग्राहक आल्यास अथवा फोन आल्यास त्याची काळजी घ्यायला

कुणीना कुणी जबाबदार व्यक्ती ऑफिसमध्ये हजर असते. ही शिस्त अमेरिकेतील आपल्या भारतीय लोकांच्या ऑफिसमध्येही आली आहे. फक्त सेवाज्येष्ठता किंवा पदवी यापेक्षा त्या माणसाचा एकूण कामाचा उरक व उत्पादकता यावर भर असतो.

नोकरीकरता मुलाखत सुद्धा वेगळी असते. एकच माणूस मुलाखत घेतो. तो इतके हसतमुखाने व सहज स्वागत करतो की, माझ्यासारख्या घाबरट बाईलाही त्याचे कधीच टेन्शन आले नाही. पण या सहज दिसणाऱ्या मुलाखतीत त्यांना हवी असणारी माहिती मात्र सफाईने ते काढून घेतात. आपल्याला त्याचा पत्ताही लागत नाही. अठरा वर्षांची असताना मी भारतात एक इंटरव्ह्यू दिला होता. क्लार्कच्या नोकरीसाठी मी अर्ज केला होता. भला मोठ्या टेबलाभोवती खूप माणसे प्रश्न विचारायला बसली होती. त्यावेळी बाहेरच्या जगाशी मी अनियमित होते. काही दिवसांपूर्वीच माझे लग्न झाले होते. नुकतीच टायफॉईडमधून उठले होते. एकूण खर्च उल्हासच होता. त्यातील एका ऑफिसरने मला प्रश्न विचारला की मी रोज वर्तमानपत्र वाचते का ? मी नम्रतापूर्वक नो सर म्हटले. त्यानंतर दुसऱ्याने विचारले की नाशिकमधून कुठची नदी वाहाते ? मी परत नम्रपणे "I don't know, Sir." असे उत्तर दिले. पुढे आणखी प्रश्न विचारायला कुणी धजले नाही. आणि माझ्या मुलाखतीचा निकाल मला कुणी न सांगताही समजला. एकंदरीत मला त्या नदीचे नाव त्यावेळी माहीत असते तरीही मी ते नक्कीच विसरले असते.

अमेरिकेत interview चा निकाल बहुतेकवेळा लगेच सांगतात. त्यात मिळणारे फायदे, पगार, नियम व अटी हे सर्व सांगितले जाते. ते प्रत्येक वेळी सांगितले जातेच. पण जर का अजून खूप इंटरव्ह्यू घ्यायचेच व नंतर निर्णय घेऊन तुम्हाला कळवू असे म्हटले तर समजा की मुलगी नापसंत म्हणण्याऐवजी पत्रिका जमत नाही असे म्हटलेले आहे. क्वचितच परत बोलावणे येईल.

अमेरिकेत किंवा कुणत्याही परदेशात नोकरी मिळाली की तुमचे तिथले पाऊल रुजले म्हणायला हरकत नाही. मग त्या रोपट्याचा वृक्ष होतो किंवा ते किती वाढतं अथवा वाढतच नाही हे जवळ जवळ सर्व तुमच्यावरच अवलंबून राहील. अर्थात प्रत्येक गोष्टीला नशिबाची साथ ही लागतेच पण बरेचसे तुमच्या कर्तृत्वावर, तुमच्या स्वभावावर, तुम्ही त्या जीवनाशी किती समरस होता यावर अवलंबून आहे. याचवेळी नशिबाचीही साथ असेल तर तो दुग्ध-शर्करा योगच होईल.

ऑफिस वेळ सर्वसाधारणपणे सर्व ठिकाणी ९ ते ५ मध्ये १ तास जेवणाची

वेळ, सोमवार ते शुक्रवार असे असते. म्हणजे आठवड्याचे ३५ तास कामाचे होतात. शनिवार, रविवार व Lunch time पगाराचे धरले जात नाहीत. आठवड्याला ३५० डॉलर पगार असेल तर १ तासांचा पगार १० डॉलर झाला. खाजगी कंपन्यांत ४० तासांपर्यंत कामाचे तास असू शकतात. ४० तासांवर काम झाल्यास दीडपट वेतन मिळते. ऑफिसव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणाऱ्यांच्या कामाच्या वेळा मात्र वेगवेगळ्या असतात. त्यांना मिळणाऱ्या रजेचे नियमही वेगळेच असतात.

मोठ्या शहरांत काम असेल तर हॉस्पिटलस सोडून फार क्वचित पार्किंगला जागा मिळते. त्यामुळे ट्रेन किंवा बसने कामाला जातात. पण शहराबाहेर कुठे नोकरी असेल तर मात्र स्वतःची गाडीच लागते. देशाच्या आकाराच्या मानाने माणसे खूप कमी आहेत. त्यामुळे बस स्टॉपवर अथवा ट्रेनस्टेशनवर पोचायलासुद्धा गाडीच लागते. बस किंवा ट्रेनसुद्धा महागच पडते. शिवाय त्याच्या वेळाही फारच कमी असतात. भयानक थंडीच्या दिवसांत त्यांची वाट पाहात उभे राहाणे अशक्यच म्हणजेच गाडी असणे आवश्यक होऊन बसते.

अमेरिकेत कायम स्वरूपाचे असे काही धरलेच जात नाही. फक्त दोन आठवड्यांची नोटीस देऊन कुठच्याही नोकरीचा शेवट होऊ शकतो. अगदी सरकारी नोकरीत सुद्धा. त्यामुळेच कामाची तत्परता कायम टिकून असते. ती न टिकून कुणालाच परवडणार नाही. कारण काम चांगले नाही म्हणून नोकरी गेली तर दुसरी नोकरी मिळणेही अतिशय कठीण जाते.

गाडी विकत घेणे हे इकडे थोडी कॅश (रोख रक्कम) व नोकरी असेल तर भाजी आणण्याइतके सोपे आहे. या गाड्या विकणाऱ्या कंपन्या व कर्जाची सोय करतात. बँकेकडून कर्ज मिळणेही फारसे कठीण नाही.

गाड्यांच्या किंमती अर्थातच ती गाडी कोणत्या प्रकारची आहे त्यावर अवलंबून असतात. नवीन कोरी गाडी पण अगदी बेसिक म्हणजे काहीच सुविधा नसलेली व छोटीशी गाडी साधारणपणे सात हजार डॉलरला मिळते. मग जसजशा सुविधा वाढवत जाल तसतशा किंमती वाढत जातात. वापरलेली जुनी गाडी अगदीच जुनी व वाईट कंडिशनमध्ये असेल तर ३००/४०० डॉलर्सना मिळू शकेल पण चांगल्या प्रकारे वापरलेली साधारण किंमतीची (१२/१३ हजार डॉलर्सची) तीन चार वर्षांची जुनी गाडी ४/५ हजार डॉलर्सपर्यंत सहज जाते. त्यामुळे जुनी गाडीही सर्वसाधारण माणसाला घेणे सहज शक्य होत नाही. फार जुन्या गाड्या

घेतल्या तर काहीना काही तक्रारी सुरू होऊन वेगवेगळे पार्टस बदलण्यात बरेच पैसे खर्च होतात.

गाडी घेतली की तिचा इंशुअरन्सही लगेच घ्यावा लागतो. याचा हप्ता गाडी कोणत्या वर्षीची त्याची आताची किंमत, चालवणारे कोण वगैरे गोष्टींवरून ठरविला जातो. पंचवीस वर्षांच्या आतील मुलगा व तो लग्न न झालेला असेल तर त्याला जास्तीत जास्त हप्ता भरावा लागतो. त्याच वयाची लग्न न झालेली मुलगी असेल तर तो मुलापेक्षा कमी हप्ता भरील. लग्न झाल्याबरोबर हप्ता कमी केला जातो. आधीच्या ॲक्सिडेंट रेकॉर्डचाही विचार केला जातो.

अमेरिकेत Social Security Number हा अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येकाला तो असावाच लागतो. त्याच्याशिवाय नोकरी मिळणार नाही. सर्व ठिकाणी सोशल सिक्युरिटीचे सरकारी ऑफिस असते. अमेरिकेत गेल्याबरोबर त्या ऑफिसला भेट द्यावी लागते व सोशल सिक्युरिटीसाठी अर्ज करावा लागतो. ही गोष्ट फारशी कठीण नाही. अगदी इंग्लीश फारसे येत नसेल तरी तिथले लोक ते समजू शकतात व सर्वतोपरीने मदत करतात. हा नंबर (एक लहानसे कार्ड) काही दिवसांनी मिळतो. कुठेही नोकरी मिळवताना त्याची आवश्यकता आहेच. तुमच्या पगारातून प्रत्येक वेळी हिशेबाप्रमाणे त्याकरता पैसे कापले जातात. व तुमच्या वर्गणीच्या प्रमाणात त्याच्या अन्य नियमांप्रमाणे सेवानिवृत्त झाल्यावर (म्हणजे वयाच्या ६५ व्या वर्षी) तुम्हाला दरमहा ठराविक रक्कम मिळणे सुरू होते. आवश्यक वाटल्यास आधीही हे 'पेन्शन' सुरू करता येते. पण पैसे कमी मिळतात. तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही राहिलात तरी चेकने ते पैसे मिळतील. पतीच्या मृत्यूनंतर त्याचे कमीत कमी ५५ महिन्यांचे हप्ते भरलेले असतील तर बायकोला दरमहा रक्कम मिळू शकते. अर्थात त्या अल्पशाच पैशावर अमेरिकेत माणसाला निर्वाह करता येत नाही. त्याच्या जोडीला आणखीही काही कामधंदा करावाच लागतो. ही सामाजिक सुरक्षितता योजना म्हणजे पेन्शन मात्र नव्हे. पेन्शन फन्डस् प्रत्येक कंपनीचे वेगळे असतात. ते असतातच असे नाही. नोकरी बदलली तरी हा आपला स्वत:चा पेन्शन अकांउंट चालू ठेवता येतो.

नोकरीच्या मुलाखतीच्या वेळी प्रश्न अगदी साधेच असतात पण सेन्स आफ ह्युमर (विनोदबुद्धी) असेल तर अमेरिकेत त्याची खूप वाहवा केली जाते. आपल्याकडे ऑफिसमध्ये बहुधा आडनावाने किंवा 'बाई' किंवा मिस्टर, मिसेस

अशा हाक मारतात. तसा औपचारिकपणा पाळत नाहीत. ताबडतोब पहिल्यावेळी एकेरी नावानेच बोलणे सुरू होते. इथे ते जास्त घरगुती नाते वाटते. उर्मटासारखं अजिबात वाटत नाही, कारण त्याअगोदरच मित्रत्वाने स्वागत झालेले असते. कधी कधी चहा, कॉफी सुद्धा विचारली जाते. मी ज्यावेळी प्रथम अमेरिकेत गेले त्यावेळी म्हणजे १९७२ मध्ये जेव्हा एम्प्लॉयमेंट एजन्सीमध्ये जात असे. तेव्हा कॉफी पॉट म्हणजे इलेक्ट्रीकचे कॉफी तयार करण्याचे भांडे सदा भरून तयारच असे. बाजूला साखरेच्या चौकोनी वड्या, दूधाची पावडरही तयार असे. कधी कधी दुसऱ्या बाजूला गरम पाण्याचे दुसरे भांडे, चहाची पिशवी व पेपरकप असत. 'you have to help yourself स्वतःची चहा/कॉफी स्वतःच जशी पाहिजे तशी तयार करून घ्या. नोकर माणसे ऑफिसमध्ये नाहीत. आपला कप आपणच तिथे ठेवलेल्या कचऱ्याच्या पेटीत टाकायचा. कागदी टॉवेल्सही जवळच असतात. काही आपल्या हातून सांडले तर त्या टॉवेलने पुसून कचरा पेटीत टाकून द्यायचे. रोज संध्याकाळी बहुतेक सर्व ऑफिसमध्ये स्वच्छता करण्यासाठी एक बाई येऊन ऑफिस स्वच्छ करून जाते. त्यावेळी कचऱ्याची पेटीही ती स्वच्छ करते. त्यात एक मोठी गार्बेज बॅग म्हणजे प्लॅस्टिकची पिशवी नीट लावून ठेवते. त्यामुळे कचऱ्याची पेटी म्हटल्यावर आपल्या नजरेसमोर जे दृश्य उभे राहाते तसे काही तिथे दिसत नाही. ही स्वच्छता करणारी बाई सुद्धा अतिशय स्वच्छ युनिफॉर्ममध्ये असते. मध्यम वर्गातील नाही तरी श्रीमंत लोकांकडे अशा बायका जाऊन आठवड्यांतून एकदा/दोनदा घर स्वच्छ करतात. या Cleaning ladies ना तासाप्रमाणे पैसे मिळतात. या duty मध्ये साधारणपणे स्वयंपाकघर, बाथरुम्स् स्वच्छ करणे. बाकी सर्व घरांचे Vaccum Cleaning म्हणजे गालीचे स्वच्छ करणे. (गालीचे स्वच्छ करायला एक मशिन असते. ते इलेक्ट्रिकचे असते. लांबलचक बायरसकट ते घरातील जिन्यावरून वरखाली नेणे हे फारसे सुखाचे काम नसते. तळघराचा जिना तर अगदीच अडचणीचा असतो. त्याचे वजनही बऱ्यापैकी असते. सामान्य घरांत ३ किंवा ४ बेडरुमस् असतात. त्यांचे आकार मात्र प्रत्येक घराचे वेगळे असतात. १ ॥ बाथरुमस् किंवा २ ॥ बाथरुम्स असतात. एका बाथरुममध्ये वॉश बेसिन, टब किंवा शॉवर किंवा दोन्ही व टॉयलेट (ज्याला आपल्याकडे कमोड म्हणतात.) असेल तर त्याला Full bathroom व नुसतेच टॉयलेट व बेसिन असेल तर अर्धी बाथरुम किंवा पावडर रुम म्हणतात. Toilet करता पाणी न वापरता Tissue paper वापरतात व

shower ची जागा प्लॅस्टीक पडदा किंवा काचेच्या दरवाज्याने बंद असल्याने बाकीची बाथरूम कोरडीच राहाते व म्हणून कागदी रुमालाने स्प्रे मारून स्वच्छ करता येते. बाथरुम्स् धुवायला जंतूनाशक स्प्रे मिळतात. ते मारून कागदी रुमालानी - peper towels नी त्या पुसून काढल्या जातात. खिडक्याच्या काचा व काचेचे टेबल किंवा अन्य फर्निचर पुसायलाही अशाच प्रकारचे स्प्रे मिळतात. स्वयंपाकघरात इलेक्ट्रीक किंवा गॅसच्या चार शेगड्या असतात. प्रत्येक घरात कमी जास्त असतील पण काही फडताळे (calinets) असतातच. Oven असतोच. रेफ्रिजरेटर असतोच. हे सर्व कमीत कमी असतेच. अगदी भाड्याने घेतलेल्या जागेतही हे असते. अमेरिकन पद्धतीच्या स्वयंपाकाला ओव्हन लागतोच. या आठवड्याच्या स्वच्छतेत या बायका (clening ladies) बहुधा हे सर्व स्वच्छ करतात.

हे काम करणारी माणसे मिळवून देणाऱ्या एजन्सीज असतात. या एजन्सीकडे या माणसांचे नाव-पत्ते वगैरे सर्व माहिती असते. आपल्याला खात्रीचे माणूस हवे असल्यास या एजन्सीकडून ते मिळू शकते. जरी महाग पडले तरी एजन्सी त्या माणसांकरता जबाबदार असते. अशा तऱ्हेच्या इतर एजन्सीज् बाकीच्या व्यवसायांतही असतात. उमेदवाराच्या ज्या काही चाचण्या (tests) घ्यायच्या असतात किंवा जी काही माहिती काढायची असते ते काम या एजन्सीज् करतात. एखाद्या कंपनीत हे काम करायला कुणी माणूस नसेल तर ते या एजन्सीजना बोलावतात व त्यांना त्यांच्या गरजा सांगतात. असा माणूस पुरविल्याबद्दल एजन्सीला कमिशन मिळते. सध्या नोकऱ्यांचे प्रमाण कमी झाल्याने या एजन्सीज् कमा झाल्या आहेत. काही ठिकाणी नोकरी मिळवून दिल्याबद्दल उमेदवारालाच त्या एजन्सीजना फी द्यावी लागते. मोठ्या कंपन्यात नफा करण्यासाठी त्यांची स्वतःची यंत्रणा असते. उमेदवाराची साधारण चाचणी घेऊन मग ज्या डिपार्टमेंटमध्ये उमेदवार हवा असेल त्या डिपार्टमेंटच्या सुपरव्हायझरकडे त्या उमेदवाराची रवानगी पुढच्या मुलाखतीकरता होते. वर्तमानपत्रांतही 'Classified' अशा कॉलममध्ये नोकरीच्या जाहिराती असतात. ते इतके मोठे असतात की अर्ध्या कॉलममध्ये ते न भागता अनेक पाने व अनेक रकाने त्यांनी भरतात. काहीजण त्यांचा टेलिफोन नंबर देतात व कॉल करण्याची वेळही देतात. कॉल करून अपॉइंटमेंट घेऊन मग मुलाखतीला जातात. काहीजण थोडक्यात आपली माहिती पाठवायला

सांगतात व त्यांना आवडलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावतात.

आपण कोणत्याही प्रकारचे काम करा. वक्तशीरपणा हा अतिशय महत्त्वाचा आहे. ५ मिनिटे आधी स्वत:च्या टेबलाशी हजर असणे हा चांगला गुण मानला जातो. व तीच उमेदवाराकडून अपेक्षा असते. नेमणुकीचे पत्र दिले जात नाही. सर्व तोंडीच ठरवतात. ओळखीची व हमी म्हणून दिलेली नावे कधी तपासली जातात, कधी नाही. डॉक्टर-इंजीनिअर्स वगैरे लोकांची प्रमाणपत्रे तपासली जात असतील पण साध्या नोकरीकरता ती तपासली जात नाहीत. शब्दांवर विश्वास ठेवतात. एक नोकरी सोडून दुसरी घ्यायची असेल तर दोन आठवड्यांची नोटीस द्यावी लागते. हे सर्वमान्य असल्याने कुणालाच त्याबद्दल काही समजून सांगावे लागत नाही. कुणाला नोकरीवरून काढून टाकायचे असले तरी त्या माणसालाही दोन आठवड्यांचीच नोटीस द्यावी लागते. एखादा माणूस ऑफिसर वगैरे महत्त्वाच्या हुद्द्यावर असेल व कंपनीच्या दुसऱ्या बातम्या / निर्णय या माणसाला आणखी कळू नयेत असे वाटत असेल तर त्या ऑफिसरला २ आठवड्यांचा पगार दिला जातो. व तोच दिवस त्या माणसाच्या कामाचा शेवटचा दिवस ठरतो.

■ ■ ■

# छंद

बऱ्याच अमेरिकन लोकांचा फिशिंग (मासे पकडणे) हा छंद आहे. सुटीच्या दिवसांत जिथें 'फिशिंग' करता येईल अशा ठिकाणी जातात. व तासन् तास फिशिंग करतात. कितीतरी जण आपल्या मुलांनाही (साधारण १४-१५ पर्यंत) घेऊनही जातात.

कँपिग करणे हा दुसरा छंद आहे. सबंध देशभर अनेक ठिकाणी कॅपची ठिकाणे आहेत. आपल्याला तंबू विकत घेता येतो किंवा भाड्यानें मिळतो. ज्या ठिकाणी ही कँपिंगची ठिकाणे आहेंत त्या ठिकाणी टॉयलेटस्, बाथरुम्स, वॉशबेसिनची सोय असते. भांडी घासायला वेगळी जागा असते. पाणी भरपूर असते. रिक्रिएशन पार्कस् जवळपासच असतात त्या ठिकाणी स्विमिंग पूल, रोलर कोस्टर वॉटर राईडस् स्काय राईडस् अशी अनेक गोष्टी असतात. कँपिंगच्या ठिकाणी गर्द झाडी असली तरी इलेक्ट्रीसिटीची सोयही असते.

शहरापासून लांब जाऊन, काळज्या, व्यथा दूर ठेऊन निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ तरी घालवायला अमेरिकन माणासांना फार आवडते. जवळच बार-स्वयंपाकाची सोयही असते. त्याला लागणारे कोळसे व ते पेटवायची साधने आपण आपल्या गाडीतून नेऊ शकतो किंवा जवळपासच तेही मिळायची सोय असते. नित्यास लागणाऱ्या ग्रोसरीची लहान दुकानेही या भागांत असतात. जवळपासच हौशी माणसांकरता अनेक प्रकारच्या बोटींची सोयही असते. काही

शिडावर चालणाऱ्या होड्या तर काही वल्हवायच्या होड्या तर काही मोटारबोटी असे खूप प्रकार असतात. निसर्गसुंदर ठिकाणी स्वच्छताही चांगली राखली गेल्यामुळे सर्वांनाच त्याचा पूर्ण आनंद उपभोगता येतो. या सर्व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याकरता मोठी पिंप, प्लॅस्टिकच्या पिशव्या घालून ठिकठिकाणी ठेवलेली असतात.

'समर'मध्ये (summer) आणखी एक आवडी ती गोष्ट म्हणजे बारबेक्यू करणे. घराच्या मागच्या दारात बहुधा 'पॅट्रिओ' बांधलेला असतो. त्यावर शेगडीचा स्टँड असतो. काही लोकांना तर मी आठवड्याचे पाच दिवस तरी मागच्या अंगणात जेवण करताना पाहिले आहे. अर्थात फक्त उन्हाळ्यात ! घराच्या तिथेच बाकं किंवा खुर्च्या टाकलेल्या असतात. टेबलही असते. तिथेच जेवण करतात.

उन्हाळ्यातही अतिशय आवडीची गोष्ट म्हणजे बोटीवरील (Cruise) (क्रूज) वर जाणे. हे क्रूज साधारणपणे आठवडाभराचे असतात. उन्हाळ्यात अलास्का, मेन, (Maine) वगैरे उत्तरेकडे जातात. व थंडीच्या दिवसात दक्षिणेकडील भागांत जातात. या बोटी अतिशय अवाढव्य असतात. त्यांच्या खोल्या हॉटेलमधील खोल्यांप्रमाणेच असतात. पंचतारांकित हॉटेलप्रमाणे सर्व सोयी या बोटीवर असतात. सिनेमा थिएटर असते. गॅम्बलिंग (कॅसिनो) करण्याची सोय असते. रात्री निरनिराळे करमणुकीचे कार्यक्रम असतात. पाश्चात्य पद्धतीचा नाच करण्याकरतां भरपूर सोय असते. जवळ जवळ रोज नवीन स्थळांना भेट दिली जाते. त्यावेळी बोट थांबते. मोठे डेक असते. त्यावर लोकांना चालण्याचा व्यायाम करायचा असल्यास करता येतो. खाणं, तर इतकं असत कि पहाटेपासून रात्री बारा वाजेपर्यंत जवळजवळ सतत खाद्य पुरवले जाते. सौंदर्यप्रसाधनेही इकडे मिळतात. ब्रिज खेळण्याची सोय असते. हे सर्व श्रीमंत जीवन उपभोगायला पैसे मात्र भरपूर द्यावे लागतात !

अमेरिकेन् लोकांना निरनिराळ्या प्रकारच्या गेम्सची सुद्धा खूप आवड आहे. बेसबॉल, बास्केट बॉल, हॉकी, फूटबॉल, बोलिंग बिलियर्डस्, टेबल टेनिस असे असंख्य खेळ खेळले जातात.

■ ■ ■

# शॉपिंग

शॉपिंग ही तिकडची एक नैमित्तिक बाब आहे. आपण कल्पनाच करू शकणार नाही इतकी मोठी डिपार्टमेंट स्टोअर्स व शॉपिंग मॉलस् तिकडे आहेत. ही स्टोअर्स अतिशय सुंदर सजवून ठेवलेली असतात. एका मॉल (mall) मध्यें अनेक स्टोअर्स असतात. एका स्टोअरमध्ये अनेक डिपार्टमेंटस् असतात. बायकांचे कपडे एका भागांत, पुरुषांचे दुसऱ्या भागांत, मुलींचें एका भागांत, मुलांचे एका-भागांत, तान्ह्या मुलांचे एका भागांत असे वेगवेगळे भाग असतात. फर्निचरच्या बाबतीतही तेच. मुलांचे फनिर्चर, मुलींचे फर्निचर, तान्ह्या मुलांचेपण फर्निचर असते. चपला तिकडे कमीच म्हणजे फक्त उन्हाळयात थोड्याशा वापरतात. बाकीच्या दिवसांत बूटच. हवामानाप्रमाणें त्यांचेही प्रकार बदलतात. तेही बायका-पुरुषांचे वेगवेगळ्या भागात मिळतात. बहुतेक सर्व ठिकाणी वेगवेगळ्या मापाप्रमाणें लावून ठेवलेले असतात. आपले आपणच ते घालून पाहायचे. काहीं मदत लागल्यास तिथल्या माणसाला विचारायचे. तो तप्तरतेने मदत करतो. या सर्व प्रकारात इंग्लिश नाही आले तरी चालते किंवा तुटपुंजे आले तरी काम भागून जाते. किंमती तिकडे लिहिलेल्याच असतात. त्यात घासाघीस करायची नाहीं. पसंत पडलं तर घ्या. नाही घेतलं तरी कुणी काहीं म्हणणार नाहीं. या मॉलमध्यें नेहमी जाण्याचे दुसरे कारण म्हणजे 'Window Shopping'. शो केसेसमधून व भल्यामोठ्या टेबलांवरून त्यांच्या किंमतीसकट वस्तू मांडून ठेवलेल्या असतात. कपडे हवामानाप्रमाणे बदलतात. अति थंडी व अति

उन्हाळा. शिवाय मध्यम हवामानाचे दिवसही थोडेसे असतातच. या भल्यामोठ्या स्टोअर्समधून असलेले खूप कपडे सिझन बदलला की तो सिझन परत येईपर्यंत ठेवणे व दुसरीकडे हलवणे अतिशय खर्चाचे असणे. म्हणून उरलेला माल सेलमध्ये किंमत कमी करूरन विकतात. काही लोक त्याचवेळी खरेदी करतात. सर्वसामान्य लोक तयार कपडेच घेतात. आपल्याकडील पद्धतीप्रमाणे Custom-made म्हणजे खास कपडे शिवून घेणे फार महागाचे पडणे.

मॉलमध्ये उगीच जाऊन बसणारी दुसरी माणसें म्हणजे वय झालेली किंवा एकटी-दुकटी राहिलेली. या मॉलमधून तापमान चांगले सांभाळलेले असते. अतिथंडीच्या दिवसांत हिटर असतांत व अति गरमीच्या दिवसांत एअर कंडिशनर असतांत. वयस्कर माणसांना तेही सोईचे पडते. नुसतं बसायलाही ठिकठिकाणी बाकं वगैरे असतांत. खऱ्या-खोट्या झाडांनी सुशोभित केलेले असतात. पाण्याची सुंदर कारंजी असतात. माणसे जाता-येतांना दिसतात. लहान मुलं हसताना, खेळताना, हट्ट करताना दिसतात.

स्वत:च्या नातवंडांचे सुख फार थोड्या लोकांच्या वाट्याला येते. मुलांचेच सुख विभक्त वा घटस्फोटीत जोडप्यांमुळे कमी तर नातवंडांचे काय. फक्त यांच कारणाने नाहीं तर नोकऱ्याही खूप लांब व रजा कमी हेही तितकेच महत्त्वाचे कारण आहे. लहान कुटूंब पद्धती, विभक्त कुटूंब पद्धती व नोकऱ्यांच्या निमित्ताने दुरावलेली मुले, मुली किंवा आई-वडील यामुळे येणारा एकाकीपणा आता भारतांतपण थोंडाफार जाणवू लागला आहे. फक्त गरम हवामान व भरपूर लोकसंख्या यामुळे त्याची तीव्रता जाणवत नाही इतकेच. जिथे एक किंवा दोन मुले आहेंत त्यांच्या मुलांना आता मामा, मावशी, आत्या ही नातीही हळूहळू विसरायलाच होतील. काही विशिष्ट वयानंतर आईवडिलांपेक्षा भावंड जरी भांडली तरी — जवळची वाटतांत. अर्थात् हे जरी झाले तरी खूप मुले होऊन देणे हा त्यावरचा इलाज नाहीच. हा एक फक्त अपरिहार्य परिणाम आहे इतकेच.

याच ठिकाणी रेस्टॉरन्ट वा रेस्टॉरन्टस् असतात. शनिवार/रविवारी शॉपिंगला बाहेर पडलेली कुटूंबे वा एखादाच माणूस बहुतेक खाऊन पिऊनच घरी येतात. इतक्या मोठ्या स्टोअर्समधून नुसत चालणंही पुरेसं होऊ शकतं. अमेरिकेसारखा हा सर्व अवाढव्य प्रकार आणखी कुठच्याही देशांत आढळणं कठीण आहे. खाण्या/पिण्याची व कपड्यांची मुबलकताही आणखी कुठे मिळणं कठीण आहे.

त्यामुळेच असेल कदाचित् पण वागण्या-बोलण्यात औपचारिकपणाही कमी आहे. अमेरिकन माणसाचा स्वभाव मनमोकळा असतो. हवं असलं तर हवं सांगतील. नको असलं तर नको सांगतील. आग्रहाच्या प्रश्नच नाही. त्यामुळे भारतात आल्यावर माझी बरेचदा गंमत होते. माझ्या ओळखीच्या कुणी मला पटकन् थोडा चहा पुढे केला किंवा विचारला तर तरी मी सहसा नाही म्हणत नाही. भारतात तशी पद्धत नाही. तो थोडा हावरटपणा वाटतो. पण चहा/ कॉफी ही गोष्ट इतकी मामुली समजली जाते की ती घेणं फारसं खर्चाचंही नाही व विशेष महत्त्वाचंही नाही. त्यामुळे या गोष्टी कुणी नाही म्हटल्या तरी कुणी आग्रह करणार नाही.

माझ्या चहाला पट्कन् 'हो' म्हणण्याने भारतात आल्यावर ते विचित्र दिसतं तस भारतातून जेव्हा आमच्याकडे पाहुणे येतात. तेव्हाही मला सांभाळून राहावं लागतं. आधी मला त्याची कल्पनाच आली नाही पण एकदा एक गंमतीशीर गोष्ट घडली.

आमच्याकडे फिलाडेल्फियाला माझी एक मैत्रीण जी नेहमी अमेरिकेतच राहाते, ती व तिचे कुटूंब राहायला आले होते. तिच्याबरोबर तिची बहीण व तिचे कुटूंब जे अमेरिकेत visit ला म्हणजे फिरायला म्हणून प्रथमच आले होते. तेही होते त्या दोघीही माझ्या भारतात असतानाच्या मैत्रिणी होत्या. सर्वांची रात्रीची जेवणे झाल्यावर पुरुषमंडळी थोडा वेळ गप्पा मारून झोपायला गेली. आमच्या सर्वांची मुलं समवयस्क असल्याने ती त्यांच्या खोल्यात खेळ /गप्पा/टेलिव्हीजन वगैरेंकरता गेली. आणि मग आमच्या तिघी मैत्रिणींच्या खास गप्पांना सुरुवात झाली. मी मध्येंच तोंडात टाकण्याकरता' म्हणून बटाट्याचे वेफर्स आणून ठेवले. आणून ठेवताना प्रथम माझ्या अमेरिकेतील मैत्रिणीपुढे ते पाकीट धरले. तिने सध्या नको म्हटले म्हणून नंतर भारतातून आलेल्या मैत्रिणीसमोर धरले. मोठ्या बहीणींने नको म्हटल्याने तिला हवे असूनही तिने नको म्हटले. ही गोष्ट त्यावेळी माझ्या लक्षातच आली नाही. तिने नको म्हटल्यावर मी त्या पुडीतले एक/दोन वेफर्स मला स्वत:ला काढून पाकीट तिघींच्या मध्ये ठेवले. मी स्वत:च घेतल्यानं भारतातील मैत्रिणीने बिचकत पुढे होऊन आपण सुद्धा घेतले. आणि माझ्या डोक्यात एकदम् प्रकाश पडला. मी तिला आग्रह केला नव्हता ! तेव्हापासून मी प्रत्येक पाहुण्यांना स्पष्ट करते की, मला कोणत्याही प्रकारचा खाण्याचा आग्रह चालत नाही व मला आग्रह करताही येत नाही. तरी कृपा करून मोकळेपणाने रहा. अगदी स्वत:चे घर समजून. काही माणसं जास्ती दिवस राहायला आली तर पहिल्याच दिवशी

स्वयंपाकघरातील सर्व कपाटे-डबे-रेफ्रिजरेटर त्यांना उघडून दाखविते व सांगते की जे लागेल ते व लागेल तेव्हा माझ्या विचारण्याची वाट न पाहाता मोकळेपणाने मागा व घ्या.

■ ■ ■



# प्रवास

अमेरिकेत प्रवास करणे खूप सोईचे असते. टेलिफोन सर्वच ठिकाणी असल्याने व्यवस्थित आखणी करणे खूप सोपे जाते. अगदी गर्दीच्या दिवसात प्रवास करायचा असेल (उन्हाळ्याची सुटी मे ते ऑगस्ट थॅक्स गिव्हिंग Thanks giving या सणाच्या वेळी व ख्रिसमच्या वेळी तर तिकीटे आधीच काढावी लागतात. हॉटेलचे रिझर्वेशन आधीच फोनवर करता येते. त्याकरता मदत पाहिजे असल्यास ट्रॅव्हल एजंट मदत करतात. मॉटेलस् हॉटेलपेक्षा बरीच स्वस्त असतात. दोन्ही ठिकाणी सर्व काही स्वच्छ असते. बहुतेक ठिकाणी T.V. असतो. शिवाय इतर सिनेमासुद्धा पाहाता येते. आंघोळीचे टॉवेल्स, हात पुसायचे नॅपकिन्स वगैरे भरपूर व स्वच्छ असतात. टिश्यू पेपर्स (कागदी रुमाल) टॉयलेट पेपर्स यांचाही पुरेसा साठा खोलीतच असतो. बहुतेक हॉटेल्समध्ये छोटी शाम्पूची बाटली, साबण, Hand-body moisturizar (हात मऊ राहाण्याकरता वापरायचे लोशन अशा आवश्यक वस्तू असतातच. पुष्कळशा हॉटेलस् / हॉटेल्समध्ये स्विमिंग पूलही असतो. बहुतेक खोल्यातून टेलिफोनही असतो. त्याचे पैसे मात्र (वापरल्यास) वेगळे भरावे लागतात. पण सोय असते. मोठ्या शहरांतील Five Star (फाईव्ह स्टार) हॉटेल्स पाहिली कि सर्व कल्पना यायला हरकत नाही. हॉटेल्समध्ये त्यांचे चांगल्यापैकी रेस्टॉरन्ट असते. मॉटेलसमध्ये कॉफी / ब्रेकफास्ट असतो पण Lunch / Dinner (दुपारचे व रात्रीचे जेवण) मात्र मिळत नाही. पण आजूबाजूला भरपूर रेस्टॉरन्टस् असतात. बाहेर जाऊन

खाता येते. काही हॉटेल्समध्ये Suites असतात सर्व कुटूंब vacation ला गेले की त्यांना हे बरे पडते. आत त्यांचे एक छानसे व छोटेसे स्वयंपाकघर असते. त्यात काही भांडी, कपबशा, प्लेटस्, लहानमोठे चमचे वगैरे सर्व आवश्यक सामान असते. टोस्टर, मायक्रोवेव्ह ओव्हन-रेफ्रिजरेटर सर्वकाही असते. डायनिंग टेबल खुर्च्या, Writing table सर्व कुटूंबाला लागणारी अंथरूण पांघरूण सर्व व्यवस्था असते. सर्व हॉटेल्स-मॉटेलस्मध्ये बेडस् व पांघरूण हे असतातच. ते सर्व रोज स्वच्छ केले जाते. (Cleaning Service) रोज टॉवेल्स बदलेले जातात व दुसरे परिटघडीचे ठेवले जातात. रोज नवीन साबण ठेवला जातो. काही सामान संपलेले दिसले तर दुसरे ठेवले जाते. या क्लिनिंगच्या बायकांना आपण हॉटेल सोडताना काही टीप (बक्षिसी) द्यायची असते.

माझ्या ओळखीच्या खूप अमेरिकन मित्रांनी अजून नायगारा धबधबासुद्धा पाहिला नाही. प्रत्येक टिकाणांत खूप अंतर पडतं. पूर्वेपासून पश्चिमेकडे ३००० मैलांच्या आसपास अंतर आहे. साधारणपणे दर १००० मैलाला एक तासाचा घड्याळांत फरक पडतो. म्हणजे पूर्वेकडून पश्चिमेकडे जाताना शेवटी ३ तासांचा घड्याळांत फरक पडतो. या सर्व ठिकामी Grayhound नावाची बस जाते. जर निरनिराळ्या ठिकाणी जायचे असेल तर त्याचे ठरलेले स्टॉप्स् व त्याचे ठरलेले वेळापत्रक असते. तीच पद्धत Am Tree म्हणून रेल्वेची सुद्धा आहे. माझ्या माहितीप्रमाणे भारतातही तशा तऱ्हेचे तिकीट काढता येते. फक्त लोकसंख्या खूप असल्याने गर्दी खूप व त्यामुळे जागा मिळणे खूप कठीण जाते. अमेरिकेपेक्षा भारतात रेल्वेचे तिकीट स्वस्त असते. स्वच्छतेची कल्पनाच आपल्याकडे पुष्कळ लोकांना नाही. पण त्याचे व्यवस्थित ज्ञान उतारूंना देण्याची रेल्वेने सोय केली व नियमांची अंमलबजावणी कडक झाली तर आपल्या रेल्वेचा मला खूप अभिमान वाटेल. त्याचप्रमाणे बसस्थानकेही स्वच्छ राखली गेली तर त्यांचीही सर्व्हिस भारतातही चांगली आहे. तिकडे गाडी (मोटार) भाड्याने मिळते. तशीच ती इकडेही मिळते. इकडे ती ड्रायव्हरसकट मिळते. तिकडे ती आपल्यालाच चालवावी लागते. स्वत:ची गाडी नसेल व सबंध कुटूंब एकदम प्रवास करणार असेल तर बहुतेक लोक हेच पसंत करतात, वेगवेगळ्या आकाराच्या व खूप तऱ्हेच्या सोयी असलेल्या गाड्या भाड्याने मिळतात. लहान मुलांकरता वेगळ्या खुर्च्या मिळतात. त्यातही तान्ह्या मुलांकरता वेगळ्या व बसणाऱ्या मुलांकरता वेगळ्या असतात. या खुर्च्या

गाडीच्या मागच्या सीटवर बांधायच्या. त्यावर मुलाला बसवायचे व पट्टा बांधायचा. म्हणजे अपघात झाला तरी साधारणपणे मुलं सुरक्षित रहातात. हे कायद्याप्रमाणे बंधनच आहे. आणि प्रत्येकजण हे कायदे पाळतातच. लोकसंख्या कमी असल्यामुळेच असेल कदाचित् पण मुलांच्या सुरक्षिततेला खूपच महत्त्व दिले आहे. मोटार ड्रायव्हींगकरतानासुद्धा आपल्या पुढ्यात School bus शाळेची बस असेल व ती मुलांना घेण्याकरता किंवा सोडण्याकरता थांबली असेल तर कोणत्याही परिस्थितीत मागच्या गाड्या पुढे जाऊ शकत नाहीत. मागच्या गाड्यांना ती बस सुटेपर्यंत थांबावे लागते व बस सुरू झाल्यावर मगच त्यांना जाता येते. शाळेच्या परिसरात आपण गाडी चालवत असाल, व ती शाळा भरण्याची, सुटण्याची किंवा मधल्या सुट्टीची वेळ असेल तर रस्त्यावर Flashing lights म्हणजे १५ मैल वेग मर्यादा दर्शवणारे लुकलुकणारे दिवे लागतात. नेहमीची शहरातली रस्त्याची गाडीची वेग मर्यादा ३५/४५ मैल असते. त्या तुलनेने १५ मैल म्हणजे किती हळू त्याची कल्पना येईल. शिवाय मुलांना रस्ता क्रॉस करून द्यायला स्पेशल पोलीस असतो. एखाद्या लेनमधील घरात मुले असतील तर लगेच रस्त्यावर सावधानतेच्या सूचना असतात. की सांभाळून गाडी चालवावी, मुले रस्त्यांत खेळत आहेत.

रस्ते सर्व ठिकाणी सुंदर बांधलेले आहेत. वाटेवर जिकडे तिकडे रेस्ट एरिया म्हणजे विश्रांती घ्यायला मोकळ्या जागा आहेत. काही जागा म्हणजे विश्रांती म्हणजे थोडावेळ थांबून पाय मोकळे करून पुढे जाण्यासाठी व काही ठिकाणी टॉयलेटसची सोय असते. भरपूर पाणीही असते. सर्व ठिकाणी स्वच्छच असते. हात पुसायला भरपूर व स्वच्छ पेपर नॅपकिन्स असतात. आरसे असतात. वॉश बेसिन्स असतात. स्वच्छ कचरा पेटी असते. काही ठिकाणी Coin Operated म्हणजे नाणे टाकून काही स्नॅक्स व कोका कोला, पेप्सी वगैरे थंड पेये मिळतात. तर काही ठिकाणी संपूर्ण जेवणाची सोय असते. यापैकी कुठच्या सोयी कुठे व किती अंतरावर आहेत यांची माहीती असणारे फलक महामार्गावर जिकडे तिकडे लावलेले असतात. एक Rest Area जवळ आली की समजा पाच मैलांवर आली आहे असा फलक असेल तर मधून मधून तिथेच दुसराही फलक आढळतो की दुसरी Area २७ मैलांवर आहे म्हणजे आपल्या गरजेप्रमाणे पुढच्या की याच विश्रांतीस्थानाला जायचे, हे आपण ठरवायचे. मोठ्या Rest areas ना पेट्रोल मिळायचीही सोय

असते त्याचाही फलक रस्त्यांवर उजव्या बाजूला असतो.

भारताच्या उलट दिशेने हे driving असल्याने sign boards उजव्या बाजूला असतात. रस्त्यांची माहिती देणारे फलक अगदी समोर व ठळक अक्षरात असतात. म्हणजे रस्त्याचा नंबर त्याची दिशा व तो कुठच्या गावाकडे जातो यांची सर्व माहिती या मोठ्या sign boards वर असते. शिवाय पुढे जे कोणते महामार्ग आडवे येतात ते किती अंतरावर आहेत, त्यांचे नंबर, त्यांच्या दिशा व ते कुठच्या गावाकडे जाणारे आहेत ही संपूर्ण माहिती या सूचना फलकांवर असते. निघण्यापूर्वी ट्रॅव्हल एजन्सीमध्ये जाऊन आपल्याला पाहिजे त्या ठिकाणांचे सविस्तर नकाशे मिळतात. तिथे काम करणाऱ्या मुली हे काम इतके सुंदर व सफाईदार करतात की मला त्यांचे नेहमीच कौतुक वाटते. एकदा त्यांना तुम्हाला कुठच्या ठिकाणी, म्हणजे एक किंवा अनेक, ते सांगितल्यावर त्या पटपट नकाशे काढून जाड रंगीत पेनाने आपल्याला कुठचा Route (रस्ता) घ्यायचा आहे तो सर्वांत सोईचा व सर्वात जवळचा रस्ता सांगतात. अजून अमेरिकेत मैलातच अंतर मोजतात व पौंडात वजन मोजतात. हे महामार्ग हजारो मैल दूर पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण अशा दिशेने पसरले आहेत माहामार्गाच्या क्रमांकावरून तो उत्तर-दक्षिण जातो की पूर्व-पश्चिम जाते हे सांगता येते सम क्रमांक म्हणजे (even numbers) महामार्ग क्रमांक ४० किंवा ९० नेहमी पूर्व-पश्चिम असाच जाणारा असेल व Odd number म्हणजे विषम क्रमांक, उदा., महामार्ग क्रमांक १ किंवा ९५ हे नेहमी दक्षिणोत्तर जाणारेच असतील.

आपल्याला जायच्या नेमक्या ठिकाणी हे महामार्ग जातातच असे नाही. त्यामुळे मधूनमधून आपल्याला ते बदलावे लागतात. ते कुठे बदलावे लागतील याची माहिती आपण घरीच काढून ठेवलेली बरी असते. माहिती नकाशावरून आपल्यालाही काढता येते. सुरुवातील कुणा मित्रमंडळींची किंवा प्रवास कंपन्यांची रमदत घेता येते. हे महामार्ग खूप मोठे असतात. गाड्यांचे स्पीडही ५५-६० मैल तर काही स्टेटस मध्ये ६५-७० मैलांपर्यंत असतात. एका बाजूने साधारणपणे तीन lanes धावपट्ट्या असतात. कॅलिफोर्नीयासारख्या मोठ्या स्टेटस् मध्ये एका बाजूने ६ व दुसऱ्या बाजूने ६ अशा असतात. सर्वात डावीकडची लेन Overtake करायला म्हणजे आपल्या पुढच्या गाडीला मागे टाकून पुढे जायचे असेल तर वापरतात. साधारणपणे सर्वांनी मधल्या लेनमध्यें गाडी चालवायची ओव्हरटेक सर्वात डाव्या लेनमध्ये करून झाल्यावर परत मधल्या लेनमध्ये गाडी आणणे

आवश्यक आहे. सर्वात उजवीकडची लेन ही slow म्हणजे हळू चालवणाऱ्याकरता व exit घेणाऱ्यांकरता आहे. या slow लेनमध्ये सुद्धा ४५ मैलांपेक्षा कमी वेगाने जाता येत नाही. आपल्याला आपला महामार्ग बदलायचा असेल तर कुठचातरी exit म्हणजे या महामार्गातून बाहेर पडायला वेगवेगळे रस्ते असतात. ते रस्ते त्या विशिष्ट गावाला जाणाकरता असतात आणि दुसऱ्या महामार्गाला जोडणारेपण असतात. त्या सर्व गोष्टी सूचनाफलकांवर लिहिलेल्या असतात. त्याच महामार्गावर पण बरोबर उलट बाजूला जागचे असेल तरीही exit घेऊनच जावे लागते. तिथल्या तिथे U turn म्हणजे गाडी वळवून दुसऱ्या बाजूला जायला परवानगी नाही. हे सर्व नियम काटेकोरपणे पाळले जातात. पोलीसांच्या गाड्या ठिकठिकाणी उभ्या असतात. पुष्कळ वेळा झाडात 'लपलेल्या' असतात. त्यांच्याकडे रडार डिटेक्टर दुसऱ्या गाड्यांचा स्पीड चेक करायला असतो. त्यावरून कुठची गाडी ठरल्या लिमिटच्यापेक्षा जास्त वेगाने जाते हे त्यांना कळते व त्यावरून ते ती गाडी पकडू शकतात. गाडी किती जास्त वेगाने आहे त्या प्रमाणात दड आकारला जातो. वेगवेगळ्या नियमभंगांकरता वेगवेगळे दंड आहेत. दारू पिऊन drive करायला बंदी आहे.

हे असे नियम पाळणारे पोलीसच आपल्याला ररस्त्यात काही अडीअडचण आल्यास मदत करायलापण तितकेच तप्तर असतात. ॲक्सिडेंटच्यावेळी तर करतातच पण इतरही काही अडचणी आल्या तरी मदत करतात. यात दुसरी अडचण मुख्यत्वे येऊ शकते ती खराब हवामानामुळे. थंडीच्या दिवसांत अचानक हवा खराब होऊन बर्फ पडू शकतो. बर्फामध्ये गाडी चालवणे कठीण होते ते Icy condition होते तेव्हा. Icy condition म्हणजे समजा थंडीच्या दिवसात नुकताच पाऊस पडून गेला व रस्ते वाळायच्या आतच जर तपमान freezing point म्हणजे ० सेल्सीअस च्या खाली गेलं तर रस्त्यावरील पाण्याचं एकदम बर्फ तयार होत. हे इतकं पातळ असतं की ते सहज दिसत नाही व लक्षातही येत नाही व त्यावरून गाड्या घसरतात. कधी कधी अशाच खूप गाड्या घसरून एकमेकांवर जाऊन आदळतात. बहुतेक सर्वांच्या गाडीमध्ये रेडिओ असतो. खूप लांब ड्राईव्ह करायचे असल्याने तीही एक जरुरीचीच गोष्ट होऊन बसली आहे. रेडिओवर हवामानातल्या अचानक बदलाची माहिती तर देतातच पण महामार्गावर वाहतुकीला काही अडथळे असले तरी त्याचीही माहिती देतात. त्यामुळे आपल्याला अगोदरच कल्पना येऊ

शकते. याशिवाय रेडिओ नसला तरी emergency signs म्हणजे कोणत्याही प्रकारच्या अचानक अडचणींचे फलकही flashing lights म्हणजे चमकत्या प्रकाशात ठिकठिकाणी लागलेले दिसतील. म्हणजे परिस्थितीच्या गांभीर्याची कल्पना सर्वांना वेळेवरच दिली जाते.

याच प्रकारची मदत महामार्गावरच नाही तर शहरातल्या साध्या रस्त्यांवरसुद्धा मिळू शकते. फक्त फलकांच्या ऐवजी, पोलीस, पोलीस गाड्या हे स्वतःच रस्त्यावर ठिकठिकाणी दिसतात. आमचे घर फिलाडेल्फिया शहराच्या बाहेर आहे. एकदा ख्रिसमस्‌च्या दिवशी मी न्यूयॉर्कहून ट्रेनने परत येत होते. आमच्या घराच्या समोरच तीन मिनिटांच्या चालण्याच्या अंतरावर रेल्वे स्टेशन होते. प्रत्यक्ष अंतर कमी असले तरी रस्ता चांगलाच उताराचा आहे. शिवाय बर्फ पडल्यामुळे घसरण्याची शक्यता बरीच. स्टेशनपासून मुख्य रस्त्यावर कशीबशी चढत येत होते. रस्त्याच्या पलिकडच्या बाजूला गॅस स्टेशनवर (पेट्रोल पंपावर) एक पोलिसाची गाडी उभी होती. पोलीसाच्या लक्षात माझे हाल आल्याबरोबर त्याने गाडी माझ्याजवळ आणली व मला गाडीतून घरी सोडतो असे सांगितले. मी त्याच्या कर्तव्यतत्परतेबद्दल अक्षरशः हेलावून गेले. मग मी त्याला माझे घर समोरच्याच गल्लीत असल्याचे सांगितले. तरी त्याचे मनःपूर्वक आभार मानून व नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन पुढचा चढ चढू लागले.

शहरात रोज ऑफिसला जाताना-येताना बस किंवा ट्रेन किंव दोन्ही वापरावे लागते. शिवाय शहराच्या बाहेर राहून शहरात कामाला येताना स्टॉपपर्यंत किंवा स्टेशनपर्यंतही कार लागते. या बसमध्ये कंडक्टर नसतो. बसस्टॉपवर बस थांबली की ड्रायव्हर त्याच्याजवळच्या कंट्रोलने (एक बटण असते) दरवाजा उघडतो. एका वेळी एक माणूस आत शिरून प्रवासाचे योग्य भाडे ड्रायव्हरजवळच्या पेटीत टाकून मग आत जाऊन बसतो. पैसे सुटेच टाकावे लागतात. ड्रायव्हर पैशाची देवाण-घेवाण करत नाही. काही ठराविक रेल्वे स्टेशनवर सुट्या पैशांऐवजी टोकन्स (Tokens) मिळतात त्याची किमत ठरलेली असते. ही टोकन्स्‌ एकदम आपल्याला जमतील तशी घेऊन ते एक टोकन एका वेळेला टाकणे नेहमी प्रवास करताना तरी नक्कीच सोपे पडते. सर्व माणसं व्यवस्थित आत चढल्याशिवाय ड्रायव्हर दरवाजा बंद करत नाही. त्यामुळे धक्काबुक्कीचा प्रश्न येत नाही. बसचे भाडेही एक टोकन हेच असल्यामुळे बसच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत कुठेही बसलात तरी

हिशेबाचा प्रश्न येत नाही. बसमध्ये एक bell (घंटा) असते. ज्याची दोरी प्रत्येक प्रवाशाच्या हात पुरेल अशीच असते. ज्या स्टॉपला आपल्याला उतरायचे त्याआधी ही बेल वाजवायची की ड्रायव्हरला त्याची कल्पना येते. असं सर्व शिस्तबद्ध चालतं.

बस स्टॉपवरून एक आठवण झाली. ती जितकी मजेशीर तितकीच थोडीशी अंतर्मुख करणारी आहे. मी एक दिवस ऑफिसमधून घरी येत होते. संध्याकाळची सात-साडेसातची वेळ होती व थंडीचे दिवस असल्यामुळें पूर्ण काळोख झाला होता. फिलाडेल्फितील तो बसस्टॉप होता. साधारण ऑफिसची वेळ म्हणजे ९ ते ५ ही टळून गेली होती त्यामुळे बसेस खूप उशिराने येत होत्या. एक वाट चुकलेल उंदराच पिलू अचानक कुठूनतरी आलं व माझ्या पायाभोवती फिरू लागलं. माझ्या किंचाळण्याने भेदरून ते तिच्या पायापाशी गेलं. मी तिला जे सांगितलं तर तिचीही माझ्यासारखीच परिस्थिती झाली. त्यानंतर ते एका मुलीच्या पायापाशी गेलं. एक मिनिट ती गोल फिरत राहिली. किंचाळत होतीच व ते पिलूही तसच भेदरून पण तिच्या भोवतीच फिरत राहिलं. तेवढ्यात बस आली. परत काहीतरी नवन वाटून कि काय कोण जाणे पण पिलू बसखाली धावलं. मला व त्या मुलीला दोघींनाही ती बस नको होती. ती मुलगी (साधारणपणे २०-२५ वर्षाची असेल) त्या उंदराच्या पिलाला घाबरून पळत होती, तीच आता ते बसखाली सापडणार म्हणून घाबरली व खाली वाकून मांजराला वगैरे जसं आपण ईऽ ईऽ करून बोलावतो तशी त्या पिलाला बोलवू लागली. पिलू अर्थातच आलं नाही व बसच्या चाकाखाली चिरडून गेलं. ती मुलगी खूप हळहळली. मनोमन मलाही वाईट वाटलेच पण तरीही त्या मुलीविषयी एक विलक्षण जवळीक वाटली. वय, रंग, धर्म, जात, देश सर्व काही पार करून आपण सर्व किती सारखीच असतो याची एक आगळीच प्रचीती आली.

रेल्वेसुद्धा रोजच्या प्रवासाला अतिशय सुखकर असतात. कलकत्त्याची Subway जर कुणी पाहिली असेल तर त्याचप्रमाणे अमेरिकेत सबवे पद्धत आहे. जमिनीखालून ट्रेन्स धावतात. ट्रेनमधील लाऊडस्पीकरवर पुढच्या ट्रेनचं नाव सांगितलं जातं. गाड्याचे दरवाजे गाडी चालू असताना बंदच असतात. गाड्या व बसेस उन्हाळ्यांत वातानुकूल (air conditioned) व थंडीत Heated उबदार केलेले असतात. त्यामुळे ऑफिसच्या वेळांत जरी गर्दी असली तरी जाणवत नाही. शहरात धावणाऱ्या ट्रेनकरता टोकन मिळते. रेल्वे स्टेशनातच ती विकत मिळतात.

एका वेळी एक टोकन मशिनमध्ये टाकले की स्टेशनात शिरताना असणारे फिरत्या दट्ट्यांचे कुलूप उघडते व आत प्रवेश मिळतो. तुम्हाला एकच स्टेशन जायचे असो वा १० स्टेशन्स जायचे असो. तिकीट म्हणजे एक टोकन. त्यामुळे तिकीटचेकर नाहीच सबंध शहरभर रेल्वेचे जाळे असते. रेल्वेचा नकाशा मिळतो कुठची ट्रेन कुठे जाते हे दाखवण्याकरता ती नकाशात वेगवेगळ्या रंगाने रंगवलेली असते. त्यावरून आपल्याला कुठची ट्रेन घ्यायची आहे, ती कुठे बदलायची वगैरे माहिती सहज कळते. ही ट्रेन बदलायची सोय स्टेशनमध्येच असते. त्याकरता स्टेशनच्या बाहेर यायची जरुरी नसते. आणि म्हणून एकाच टोकनमध्ये शहरात कुठेही जाता येते. टोकन विकत घेण्याकरता लागणारी ऑफिसच्या वेळेची गर्दी टाळायची असेल तर जास्ती टोकन्स घेऊन ठेवता येतात. त्यामुळे आपल्याकडे दिसणाऱ्या रांगा तिकडे अतिशय क्वचित् किंबहुना दिसतच नाहीत. सर्व प्रवासी एकाच वर्गाने जातात. लेडीज् कंपार्टमेंट नाही व फर्स्ट क्लास पण नाही. प्रत्येक कंपार्टमेंटमध्ये ती ट्रेन कोणती स्टेशनस् घेते त्याचा नकाशा काढलेला असतो व गाडीच्या कुठच्या बाजूला स्टेशन येईल ते सुचविलेले असते. त्यामुळे प्रवासी तशा तयारीत असतात. सर्व प्रवासी उतरल्याशिवाय दरवाज लागणारच नसल्यानें परत ढकलाढकलीचा प्रश्नच येत नाही. कुणीही दारात अडकले तर दरवाजा लागणार नाही व दरवाजा लागल्याशिवाय गाडी सुरू होणार नाही.

■ ■ ■

# म्हातारपण

मला वाटतं म्हातारपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलं तरी एकच असते. याबाबतीतील परस्परविरोधी उदाहरणे दोन्ही ठिकाणी मला पाहायला मिळाली. त्यामुळें भारत व अमेरिका अशी तुलना न करता मी फक्त अमेरिकेविषयी लिहिणार आहे.

अमेरिकेत पूर्वी एकत्र कुटूंबपद्धती होती की नाही याबद्दल मला जरा शंकाच आहे. पण नसावी असेच वाटते. जागच्या मुबलकतेमुळे असेल कदाचित् पण सध्यातरी एकत्र कुटूंब अजिबात नाहीत. जरी मी अमेरिकन असा उल्लेख केला तरी तिथे सर्व देशांतून आलेली माणसे आहेत. माझ्या पाहाण्यात आलेल्या अमेरिकन कुटूंबांत इटालियन लोक बरीच कुटूंबवत्सल दिसली. माझी एक जवळची अमेरिकन मैत्रिण आहे. तिची आजी मूळची इटालियन आहे. तिचे आई-वडील ती ५-६ वर्षाची असताना ॲक्सिडेंटमध्ये वारले. त्यानंतर तिच्या आजीने अतोनात काबाडकष्ट करून तिला व तिच्या जुळ्या बहिणीला वाढवले आणि तिनेही (मैत्रिणीनें) आपल्या आजीला कधीही अंतर दिले नाही. तिची आजी ९३ वर्षाची होऊन गेली. तिची आजी गेल्यावर आपल्या सावत्र सासूचेही सर्व काही केले. अर्थात् सर्वच ठिकाणी असे पाहायला मिळते असे नाही. खूप वृद्ध नर्सिंगहोम मध्ये राहातात. पण जेव्हा खरोखरच स्वतःचं स्वतः करायला असमर्थ होतात, तेव्हाच ते तेथे जातात. या नर्सिंगहोमची महिन्याची किंमत खूप मोठी असते. व त्यांची

व्यवस्थाही चांगली असते.

अमेरिकेच्या उत्तर भागात थंड हवामान असल्यामुळे सेवानिवृत्त अमेरिकन फ्लारिडा, टेक्सास वगैरे गरम हवेच्या ठिकाणी जाणे पसंत करतात. जाताना बहुतेक नवरा-बायको दोघेही जातात. आजारपण किवा म्हातारपणाच्या वेळी त्यांच्यातील एक कुणीतरी तब्येतीने चांगले असेल तर ते दुसऱ्याची सेवा करते. काहीतरी गंभीर आजार असेल तर मग हॉस्पिटल किंवा नर्सिंग होममध्ये ठेवावे लागते. त्याच्यातील एक दगावल्यावर दुसरा-दुसरी बहुधा पुनर्विवाह करतात. या वयात एकट्याने काळ व्यतीत करणे केवळ अशक्य आहे. या लग्नाला त्यांची मुलं-मुलीसुद्धा येतात. माझ्या एका मैत्रिणीच्या वडिलांनी आपल्या आजारी बायकोची अनेक वर्षे सेवा केली भरपूर पैसाही खर्च केला व ती गेल्यावर वर्षभरात दुसरे लग्न केले. त्यांच्या घरातही ते सर्वांना पसंत पडले नाही तरी माझ्या मैत्रिणीला ते आवडते. वडिलांनी त्यांच्या आयुष्याची अनेक वर्षे बायकोची सेवा करण्यात घालवल्यावर तिच्या मताने त्यांनाही आयुष्यात थोडा आनंद उपभोगायचा अधिकार आहे. मला ती मैत्रीण व तिचे वडील, दोघेही चांगल्यापैकी माहीत होते कारण पूर्वी दोघेही माझ्याच ऑफिसमध्ये काम करत होती. त्यामुळे मला तिचे म्हणणे १०० टक्के पटले.

म्हाताऱ्या माणसांची मुला-बाळांची जबाबदारी संपलेली असते. त्यामुळे या वयात ती लोक खूप मजा करतानाही दिसतात. सर्वसाधारण अमेरिकन माणूस ६५ वर्षापर्यंत नोकरी करतो. आता ही मर्यादा इच्छा असेल तर ७० वर्षांपर्यंत नेली आहे. तब्बेतीत हे लोक साधारणपणे ८५-९० वर्षांपर्यत चांगलें असतात. मुळातच मुलं-मुली, नातवंड यांच्याजवळ कमी राहिल्यामुळं नर्सिंगहोममधले दिवस खूपच वाईट असतात असं मला वाटत नाही. स्वच्छता, सोई, व खाणंपिणं तर कुणालाच तिकडे कमी नाहीं., जवळ जवळ सर्वच ठिकाणी नवरा-बायको दोघंही काम करत असल्यामुळे व घरात कुणीही नोकर-माणूस ठेवणं परवडत नसल्याने (सर्वसाधारण लोकांना) नर्सिगहोमशिवाय दुसरा पर्यायही नाही. थिएटरमध्ये नाटकांना जाणं श्रीमंतांनाच परवडू शकतं. तिकिटांचे दर वाढतच असतात. सध्या न्युयॉर्कसारख्या मोठ्या शहरी कमीत कमरी तिकीट ५०-७५ डॉलर्स आहे व ते स्टेजपासून इतके दूर असते की अक्षरश: दुर्बिण घेऊन बसावे लागते. पुढच्या रांगेतील तिकिटे १५०-१७५ डॉलर्सपर्यंत जातात. शिवाय जाण्यायेण्याचा खर्च वगैरे धरून दोघांनी नाटकाला जायचा खर्च साधारणपणे ४००-४५० डॉलर्सपर्यंत जातो. ६५-७०

वर्षांपर्यंत नोकरी केल्यानंतर या लोकांना ते परवडू शकते. वय कितीही झालं तरी तरुण-तरुणींचा उत्साह राखणे हे तिकडे कौतुकास्पद समजलं जात. डान्स करणं या समाजात सर्वसामान्यच आहे. हा दोघांचा नाचसुद्धा करणं म्हणजे करावही आहे, तीही एक कला आहे. पुष्कळ जणांनी त्याचं शास्त्रोक्त शिक्षण घेतलेलं असतं. शाळांतून प्रौढ लोकांसाठी जे संध्याकाळचे खास शिक्षण देण्यात येते त्यात या नाचाचेही एक शिक्षण असते. हौशी प्रौढ लोक. ऑफिसमधून घरी येऊन जेवण करून या प्रकारचे अनेक कोर्सेस असतात ते घेतात. कुणी नवीन भाषा शिकायला, कुणी शिवण शिकायला, गायन, वादन शिकायला असे अनेक कोर्सेस असतात त्याला जातात. T. V. चे अनेक चॅनलस् असतात व २४ तास असतात. ते सर्व ठिकाणी म्हणजे नर्सिंगहोममध्ये सुद्धा असतात. ही म्हातारी माणसं भरपूर सोशल वर्क सुद्धा करतात अपंगाकरता, आंधळ्यांकरता, हॉस्पिटलमध्यें, रेडक्रॉससाठी प्रत्यक्ष (फुकट) काम करणाऱ्या अनेक वृद्ध बायका तुम्हाला दिसतील. काही बायका आपल्या नातवंडांचे "Baby sitting" करतानाही मी पाहिल्या आहेत. पण ते केलं तरी रहातात वेगळीच.

दुसरा या लोकांचा अतिशय आवडता छंद म्हणजे. गोल्फ खेळणे. याकरता आवश्यक असणारी गरम हवा त्यांना फ्लॉरीडासारख्या ठिकाणी मिळते. संबंध दिवसभर उन्हाळ्यात खेळू शकतात. टेनिस्, स्विमिंग हेही त्यांना पसंत असते. सिनेमाला जाणंही पुष्कळ लोक पसंत करतांत. थिएटरमध्यें सिनेमाला जाणं व तोच सिनेमा घरी टी. व्ही. किंवा कॅसेटवर बघणं यांत बराच फरक आहे. हल्लीच मी काही सिनेमे पाहिले व मला आश्चर्यच वाटलं. अमेरिकेला गेल्यावर थिएटरमध्यें सिनेमाला जायचं मी जवळ जवळ बंदच केलं होतं. तिकडे 'सेन्सॉर' म्हणून काही प्रकरा आहे कि नाही याचीच मला आता शंका येते 'ब्ल्यु मुव्हीज'मध्ये सेन्सॉर दृश्ये समजू शकता येतील, पण या साध्या सिनेमांतून सुद्धा Senior Citizens ना कन्सेशनमध्ये तिकीटे मिळतात (बहुधा ५० टक्के) बस व ट्रेनमध्यें सुद्धा अगदी गर्दीची — म्हणजे सकाळ व संध्याकाळची ऑफिसची वेळ सोडून — बाकीच्या वेळी फुकट प्रवास करता येतो. त्यांना मेडिकेअर म्हणजे फुकट औषधपाणी मिळते. अनेक ठिकाणी त्यांना अशा सोयी उपलब्ध आहेत. जेव्हा घरचे काम करणे कठीण होते तेव्हा ते विकून ज्याला भारतात ओनरशिप म्हणतात — अमेरिकेत त्याला 'कॉन्डोमोनियम' किंवा थोडक्यात म्हणून नुसते 'कॉन्डो" म्हणतात. शा ठिकाणी

राहायला जातात. पाहिजे असल्यास आठवड्यातून एकदा क्लिनिंग लेडीला बोलावता येते. घरात जिना/जिने चढउतार करायला लागतांत. तेही कान्डोमध्ये सोपे जाते.

इतकं सगळं झालं तरी म्हातारपणी वाटणारा विशिष्ट एकाकीपणा येतोच. सगळ्यांनाच पुन्हा लग्न करता येतेच असे नाही. सर्वांनाच मुलं असतातच असं नाही. असली तरी विचारतीलच असंही नाही. पण साधारणपणे लांब राहाणारी मुलं आई-वडिलांना निदान शनिवार/रविवार टेलिफोन वरून चौकशी करतात. जवळपासच्या गावात राहणारी मुलं मधून मधून येऊन त्यांच्या कामात मदत करतात त्यांना हवं नको ते विचारतात. ग्रोसरी आणूनही देतात. याबाबतीत काही भाग नशिबाचा आहे, हे नक्कीच !

■ ■ ■

# निग्रो जीवन

अमेरिकेंत नीग्रोंना Black (काके) म्हटले जाते. त्यांचा मुद्दाम अपमान करायचा असेल तर 'नीगर' म्हणतांत. का ते माहीत नाही. पण या शब्दाने ते खूप रागावतात, दुखावतात.

हे काळे लोक जवळ जवळ ८-९ पिढ्या अमेरिकेतच आहेत. गोरे युरोपियन्स अमेरिकेंत आल्यावर त्यांच्या ताब्यात भल्या मोठ्या जमिनी आल्या (Ranch) तिथे एवढे काम कोण करणार. म्हणून आफ्रिकेतून या काळ्या लोकांना पळवून, गुलाम म्हणून आणले. अनेक वर्ष त्यांना काही शिकूही दिले नाही. Alex Haley या लेखकाने "Roots" नावाची गोष्ट लिहिली या काळ्या माणसाने आफ्रिकेत आपला मूळचा गाव शोधून काढला. कुंटा किंटे नावाच्या एका काळ्या मुलाला सात पिढ्यांपूर्वी अक्षरशः जनावरांना जाळे टाकून पकडतात तसं पकडलं व बोटीने अमेरिकेत आणलं. त्याला अर्थात इंग्लीश बोलता येत नव्हतं. खाणाखुणा करून त्याला त्याचं नाव बदलायला सांगितलं. तो कबूल होईना. सर्वांसमक्ष त्याला झाडावर टांगून चाबकाने फोडून काढलं. गोष्ट इथून सुरू झाली. त्याने पळून जायचा प्रयत्न केला तर शिकारी कुत्र्यांचा उपयोग करून त्याला पकडून त्याचा एक पाय कापला की जेणे करून तो पळून जाऊ नये. त्याला एका डॉक्टरने बरे केले. पण त्याच डॉक्टरने (White) या गुलामांना शिकू दिले नाही. शिकायचा प्रयत्न केला तर त्यांना दुसऱ्या कुणाला विकले जाईल असे बजावले. तशा तऱ्हेने विकले गेलेही. ही किंवा अशाच तऱ्हेची ५-६ पिढ्यांची कहाणी जवळ जवळ सर्व "काळ्या लोकांची (अमेरिकेत) आहे. आता त्यांची गुलामगिरी संपली आहे. सरकारने त्यांना सर्व समान हक्क दिले आहेत.

# अध्यक्षीय निवडणूक

अमेरिकेंत दोन राजकीय पाट्यी आहेत. एक रिपब्लीकन् व दुसरी डेमोक्रॅटीक. दोन्हीही पाट्र्यांमध्यें सिनेटरस् असतांत ते लोकांनी निवडून दिलेले असतांत. याच दोन्ही पाट्य़ी आपल्या पार्टीतर्फे कुणाला प्रेसिडेन्टच्या निवडणुकीकरता उभे करायचे ते ठरवतात. एकापेक्षा जास्ती नावं आली तर त्यांची आपसांत प्रथम चुरस होते. अमेरिकेतील वर्तमानपत्रांनाही खूप स्वातंत्र्य असते. प्रत्येक उमेदवाराविषयी तिकडचे पत्रकार खडान् खडा माहिती मिळवतात. व ती प्रसिद्ध करायला जराही कचरत नाहीत. चारित्र्य शुद्ध नसेल तर ते अक्षरश: चव्हाट्यावर आणणार. याबाबतीत Watergate प्रकरण सर्वांना माहीत असेलच. तिकडचे दूरदर्शन सुद्धा तसेच आहेत. त्याच्यावरचे 'Talk show' आता खूपच वाढले आहेत हे शोज् सर्वप्रकारच्या लोकांना पडद्यावर आणून त्यांचे प्रॉब्लेम्स् लोकांपुढे स्पष्ट मांडतात. त्या शोच्या वेळीं जमलेल्या लोकांना या लोकांशी स्पष्ट बोलता येते. काही शोजना आपल्यालाही टेलिफोनवरून बोलता येते. विचारता येते. इतकी वर्षे अमेरिकेत राहूनही मीसुद्धा अजून आश्चर्याने थक्क होते. इतकं सर्व मोकळपणाने बोलले जाते. मात्र त्यातील काही लोकांना शक्य असेल तर मदतही दिली जाते. व काहीजणांची पब्लिककडूनच चांगली कानउघडणीही केली जाते. एकंदरीत अमेरिकन माणूस बराच निर्भिड असल्याने प्रेसिडेन्टच्या उमेदवाराला सर्व परीक्षांतून जावे लागते. त्यातून तावून-सुलाखून बाहेर पडल्यावर पार्टीचा एक उमेदवार निश्चित होतो. दोन

पार्टीचे दोन उमदेवार व एखाद्या माणसाला स्वतंत्रपणे निवडणूक लढवायची असेल तर तसेही करता येते. मग दोन महिने दोघही उमेदवारांची ठिकठिकाणी प्रकट मुलाखत (डिबेट) होते. दोघांनाही एकाच स्टेजवर दोन बाजूला उभे करून प्रश्न विचारतात त्या बाबतीतील त्यांच्या कल्पना, अंदाज व त्याबद्दलची तरतूद हे सर्व त्यांनी सांगायचे. त्यांची उत्तरे दूरदर्शनवर सर्व जनता पाहात असते. अशाने सामान्य जनतेलाही त्यांची, त्यांच्या विचारांची ओळख होते. अनेक ठिकाणी भाषणे, संभाषणे करून एक प्रेसिडेन्ट इतके दमलेले मी पाहिले आहेत; की निवडणुकीचा निकाल लागला त्यावेळी त्यांना जागे राहाणेही जमत नव्हते. हे सर्व झाल्यावर जनता स्वत: देशाचा अध्यक्ष निवडते. दर चार वर्षांनी ही निवडणूक होते व एक अध्यक्ष जास्तीत जास्त ८ वर्षे काम करू शकतो. त्यामुळे वंशपरंपरागत पुण्याई इकडे काम करत नाही. स्वत:च पुण्य स्वत:च व तेही कर्तबगारीने कमवावे लागते. केवळ नशिबाने नाही.

अमेरिका हे लोकशाही राज्य आहे. इथें सर्वांना संधी दिली जाते. नशिबाचा भाग थोडा व कर्तबगारीचा भाग जास्त आहे. इथेही बरं आहे, वाईट आहे. सज्जन आहेत, दुर्जनही आहेत. गोरे आहेत, गव्हाळी आहेत व काळे आहेत. या ना त्या मार्गाने माणसांचा ओघही चालूच आहे. संधी मिळाल्याचा आनंद आहे, तसाच न मिळाल्याचं नैराश्यही आहे. आणि तरीही विश्वासाने व अनुभवाने हे सांगू शकते की ज्यांचा स्वत:वर, स्वकष्टांवर, स्वत:च्या प्रामाणिक पणावर व स्वत:च्या बुद्धी किंवा कलेवर विश्वास आहे. अशा लोकांच अमेरिका स्वागतच करील. ती वेळ कधी येईल हे कदाचित सांगता येणार नाही. अमेरिका सतत बदलत आहे. बदलत आली आहे व बदलत राहाणार आहे. सर्व क्षेत्रात अनेक नवीन शोध सतत लागतच असतात. त्या सर्वांवर जितकं होईल तितकं डोळसपणे लक्ष ठेवलं व मुख्य म्हणजे कुपमंडूक वृत्ती न ठेवता 'हे विश्वचि माझे घर' हा आपल्या कवि केशवसुतांचा आदेश डोळ्यांसमोर ठेवला तर यशाचा सूर्य लवकरच दृष्टिपथात येईल यात शंका नाही.

■ ■ ■

क्र. ७७५
२७७६२
२२।१२।८६

REFBK-0027772
REFBK-0027772